**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४७८/२००७**

**१) श्री मधुकर हरीभाऊ कोडापे, शिपाई**
**आयुक्त कार्यालय, नागपूर**
**सेवासंलग्न जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.)**
**नागपूर विभाग, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (सा.प्र.)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००७ रोजी माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागविलेली दिसून येते-

" आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : माझी बदली दिनांक २५ जून २००४/सेवासंलग्न २ सप्टेंबर, २००४ त्यासंबंधात असलेल्या माहिती बाबत. जि.अ. नागपूर यांचे आस्थापनेवर प्रथम बदली करण्यात आली. नंतर सेवासंलग्न दाखविले त्याबाबतची माहिती. कोणत्या कालावधीची माहिती आवश्यक आहे- वरीलप्रमाणे. आवश्यक असलेल्या दस्तऐवजाचे वर्गीकरण- १) दि. २३ मार्च, ९८ चे शासन परिपत्रकाची २) मा.महाराष्ट्राचे राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश दिनांक १६ जानेवारी, २००४ ची प्रत. ३) ज्या कारणास्तव माझी बदली केली व नंतर

सेवासंलग्न करण्यात आले त्या कारणाची प्रत ४) दि. २९.६.२००४ ला निवेदन सादर केले त्या निवेदनावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची प्रत. ५) निवेदने जी कार्यालयात सादर केली त्या प्रत्येक निवेदनावर कार्यालयाने जी कार्यवाही केली त्या कार्यवाहीची टिपणीची प्रत ६)माझी व श्री बारापात्रे शिपाई यांच्या आपआपसात सेवासंलग्न ज्या केल्या त्यास मा. आयुक्तांची मंजूरी असल्यास त्या टिपणीची प्रत ७) जुलै व ऑगष्ट, २००४ या दोन महिन्याचे वेतन ८/९ महिन्यांचे नंतर कां काढण्यात आले त्या कारणाची प्रत. ८) वरील कार्यालयातील कर्मचा-यांची कनिष्ठ कार्यालयात सेवासंलग्न करण्यात येत असल्याची प्रत. " सदरची माहिति व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३.२.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी अर्जदारानी मागीतलेली माहिती तयार असून त्याबाबत आपणास एकुण १७ पानांचे रुपये ३४/- या कार्यालयात जमा करुन आपण मागणी केलेली माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. व त्या अनुषंगाने तारीख निरंक असलेल्या पत्राप्रमाणे मुद्या क्रमांक ७ ते ८ च्या संदर्भामध्ये खुलासा मागविला असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मध्ये नमूद माहितीची व्याख्येकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. कोणत्याही मुद्यांवर खुलासा देणे ही बाब माहितीच्या व्याख्येत नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. मुद्या क्रमांक १ ते ६ ची माहिती सोबत जोडलेली आहे. १) शासन परिपत्रक ३ मार्च, १९९८ ची प्रत २) मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांनी प्रख्यापित केलेले आदेश दिनांक १६.१.२००४ ची प्रत ३) आपल्या विनंती अर्जावर वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीच्या टिपणीच्या प्रती (१२) अशी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ९.३.२००७ रोजी ४ मुद्यांवर निर्णय दिलेला दिसून येतो व त्यावर अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे शासनास अहवाल पाठविला नसल्यामुळे सदरच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिली नाही, असे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये कारणे देतांना मुद्या क्रमांक २ व ३ बाबत आयुक्तांची मंजूरी/स्वाक्षरी नाही, परंतु मला कळविले की, आयोगाच्या निर्देशान्वये आपली सेवा श्री बारापात्रे (शिपाई) यांच्या जागेवर सेवासंलग्न करण्यात आलेली आहे. मुद्या क्रमांक १ प्रमाणे मा. आयुक्तांची मंजूरी/स्वाक्षरी नाही, मात्र मला कळविले की, मा. आयुक्तांचे मान्यतेने बदली केली होती, हे त्यांचे म्हणणे टिपणीतील पृष्ठ क्रमांक २४ पाहाता चुकीचे व दिशाभूल करणारे आहे. तसेच दिनांक २२.७.२००० चे पत्रावर टिपणीत नमूद करुन लेखी शासनाने कळविले असल्यामुळे शासनास लेखी अहवाल पाठविणे अपेक्षित आहे. दूरध्वनीवरुन कळविलेले आहे, अशी मोघम माहिती मला पूरवून माझे समाधान केलेले नाही, अशी कारणे त्यांनी दिलेली आहेत.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या स्वरुपात असतील त्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज इं. माहिती उपलब्ध असेल त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे हे "माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येमध्ये अंतर्भूत आहे. कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत प्रश्न उपस्थित करुन जन माहिती अधिकारी यांचे मत विचारणे हे अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी हा त्या निर्णय प्रक्रियतील अधिकारी असेलच असे नाही. व त्यामुळे त्या निर्णयातील कारण मिमांसा ही जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित करणे हे अधिनियमाच्या तरतूदींच्या संज्ञेत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.३.२००७ रोजी जो दिलेला ओ तो स्वयंस्पष्ट दिसत असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहिती ही उपलब्ध झालेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यांच्या बदलीची जी कार्यवाही झालेली आहे ती कार्यवाही व उपलब्ध झालेली माहिती याबाबत त्यांना शंका असल्यास त्याबाबत त्यांनी स्वतंत्रपणे संबंधीत अधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे तक्रार

दाखल करणे हे संयुक्तिक राहील. व त्यामुळे अपीलकर्ता यांना आहे त्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली आहे, या कारणास्तव सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे व दिनांक १४.२.२००७ च्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती आहे त्या स्वरुपात उपलब्ध झालेली असल्यामुळे व तसे त्यांनी मान्य केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक २.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १४९/२००७**
**तक्रार क्रमांक १६३/२००७**

**१) श्री अशोक उदाराम पाठराबे**
**रा. ६/५, विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॅालोनी**
**पाचपावली नागपूर -१७**

**तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
**महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र,**
**व्ही.एन.आय.टी. परिसर, नागपूर-११** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक २.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी (प्राप्त दिनांक २४.४.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत. तक्रारदार यांनी पुन्हा तीच तक्रार, तक्रार क्रमांक १६३/२००७ दिनांक २०.९.२००७ रोजी दाखल केलेली आहे. व त्यामुळे ती तक्रार सुध्दा एकत्रित करण्यात आलेली आहे.

२. तक्रारदार यांनी दिनांक २०.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून डॅा.अे.के. सिन्हा यांना L.T.C. Claims in r/o MRSAC Employees, माहितीचा कालावधी १९९० ते २००७ या कालावधीच्या प्रमाणित प्रती मागीतल्या आहेत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. वास्तविक प्रथम अपील दाखल केल्यानंतर दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे

तक्रार दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये गैरतक्रारदार यांनी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशाप्रमाणे पत्र क्रमांक MRSAC/FG/५१६, दिनांक २३.३.२००७ द्वारे अर्जदारास दस्तऐवजाचे शुल्क भरण्याबाबत सूचित करण्यात आले. सदर पत्राची यु.पी.सी.(डाक सेवेची पावती ) दिनांक २७.३.२००७ रोजीची प्रत त्यांनी दाखल केलेली आहे. परंतु, तक्रारकर्त्यांनी प्रथम अपीलामध्ये सदरची दिनांक २३.३.२००७ ची प्रत मिळाली नाही असे सांगितले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.४.२००७ रोजी देण्यात आला आहे. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक २३.३.२००७ रोजी रुपये १२३०/- भरणा करण्यास कळविले होते व त्यांनी तो भरणा केलेला नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारिज करण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अपीलाच्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही प्रकारे पत्र मिळाले नव्हते. व त्यानंतर मात्र त्यांनी दिनांक १५.७.२००७ रोजी रुपये १२५०/- भरलेले आहे. व त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. दिनांक २०.९.२००७ रोजी जी तक्रार दाखल केलेली आहे, त्या तक्रारी मध्ये सुध्दा त्यांना माहिती ही विनामुल्य मिळावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना त्यांना सदरच्या अभिलेख्याचे निरीक्षण करावयाचे होते, परंतु ते नाकारलेले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. तक्रारदार यांनी सदरच्या दिनांक २३.३.२००७ च्या पत्राबध्दल पोस्टामध्ये सुध्दा चौकशी केलेली दिसून येते व पोस्टाने सुध्दा सदरच्या पत्राच्या विवरणाबध्दल कोणत्याही प्रकारे याबध्दल माहिती देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता हे त्याच संस्थेतून बडतर्फ झालेले कर्मचारी आहेत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

३.  तक्रारीमध्ये अपीलकर्ता यांनी माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक ममाअ-२००४/प्र.क्रं.६६/०४/५, दिनांक २२.६.२००४ मध्ये या कलमा संबंधात असा खुलासा करण्यात आलेला आहे की, कलम २० मध्ये नमूद केलेली शास्ती स्वेच्छा निर्णयानुसार नसून ती बंधनकारक आहे. तसेच वरील बाबतीत राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ मध्ये आहे. तक्रारदार यांनी ज्या परिपत्रकांचा उल्लेख केलेला आहे ते परिपत्रक

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ च्या अंतर्गत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा अधिनियम हा केंद्रिय अधिनियम असून दिनांक १२.१०.२००५ रोजी अंमलात आलेला आहे. त्यामुळे सदरच्या परिपत्रकामध्ये कलम २० च्या संदर्भामध्ये कोणताही अशा प्रकारचा खुलासा असणे शक्य नाही. व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा दिनांक ११.१०.२००५ रोजी निरसित करण्यात आलेला आहे. व एका अधिनियमाच्या प्रमाणे निर्गमित केलेले परिपत्रक हे दूस-या अधिनियमास लागू होत नाही. कलम २० प्रमाणे शास्ती ही आयोगाची खात्री झाल्यावरच लादावयाची असते. व आयोगाची खात्री ही त्याध्ये दिलेल्या कारणांवरुन आयोगास करावी लागते. माहिती जाणूनबुजून विहित मुदतीत दिली नाही किंवा माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आली आहे, माहिती नष्ट करण्यात आलेली आहे इ.चा आयोगास विचार करावा लागतो. अपीलकर्ता हे पूर्वी त्याच संस्थेत सेवेत होते म्हणजे सुशिक्षित असून पण त्यांना अधिनिमाच्या तरतूतींची माहिती नसतांना सुध्दा ते त्या अधिनियमाचा आधार घेऊन शास्ती लादण्याकरीता विनंती करतात त्यावरुन त्यांचा हेतू स्पष्ट होतो. तसेच तक्रारदार तीच तीच तक्रार आयोगापुढे पुन्हा पुन्हा दाखल करत असल्यामुळे तक्रारदार हे अधिनियमाचे तरतुदीचा गैरवापर सुध्दा करीत आहेत हे आयोगास म्हणणे भाग आहे.ज्याअर्थी, दिनांक २३.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध आहे,ती उपलब्ध करुन घेण्याकरीता खर्च कळविलेला आहे, त्यावरुन ही माहिती जाणून बुजून देण्याची टाळाटाळ केलेली नाही किंवा ती माहिती नष्ट केलेली नाही वगैरे .. .. मात्र, माहिती विलंबाने दिली असल्यास जरी शास्ती असली तरी त्यावरील कारणांचा विचार करावा लागतो. तसेच सदरची माहिती ही विलंबाने दिली असल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी सुध्दा तरतूद आहे. माहिती विलंबाने देण्याबाबत गैरतक्रारदार यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे. "एकुण १७ वर्षाचा जूना रेकार्ड व त्याचा आवाका मोठा असल्यामुळे तसेच प्रशासकिय कर्मचा-यांचा अभाव, वारंवार वीज खंडीत होणे आणि कार्यालयीन कामात ब-याच तासांकरता होणा-या लोडशेडींग असतांनासुध्दा माहिती पाठविण्यात आली." व त्यामुळे सदरच्या माहिती करीताचे पत्र दिनांक २७.३.२००७ रोजी दिलेले असल्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ

केलेली नाही. परंतु विलंब असल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. रुपये १२५०/- हे अर्जदार यांना परत करणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत रुपये १२५०/- हे परत करण्यात यावे. तसेच रजिस्टर पोस्टाचा खर्च परत करण्यात यावा व तशी पोच तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावी.

२) तक्रार क्रमांक १६३/२००७ ही त्याच अर्जाचे संदर्भात पुन्हा केलेली असल्यामुळे ती खारीज करण्यात येत आहे.

३) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक २.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४८१ /२००७**

**१) श्री शंकर चेतुमल गुलानी**
**प्लॉट नं.२९, वसनशाह चौक जवळ**
**जरीपटका, नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**नागपूर महानगर पालिका, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अति.उप आयुक्त (१) (कर आकारणी विभाग)**
**नागपूर महानगरपालिका,** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व त्यांचे वकील श्री एस.डी. कल्याणी हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी " Official information about tax payments in between १९९० and March २००६. Receipt wise and date wise Tax payments made by the owner in respect of Municipal Corporation House No.३४५६/G/११४, Ward No.५७; Kukreja Nagar, Jaripatka, Nagpur " माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.१.२००७ रोजी देण्यात आला आहे. परंतु, सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांचे दिनांक २५.९.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने व अपीलकर्ता यांनी माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता हे माहिती घेण्याकरीता ३० दिवसांत गेले होते, असे त्यांनी तोंडी सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी व त्यांचे बरोबर असलेले अधिकारी यांनी माहिती घेण्यास अपीलकर्ता आले नव्हते असेही सांगितले. परंतु, असे असले तरी, सदरच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक ४.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना " माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अधिनियम ३ अन्वये वार्ड क्रमांक ५७, घर क्रमांक ३४५६/जी/११४च्या कराच्या पावती संदर्भात मागितलेल्या माहितीनुसार कार्यालयात उपलब्ध असलेल्या रेकार्डनुसार वार्ड क्रमांक ५७, घर क्रमांक ३४५६/जी/११४ च्या कराची असून २००१ पासून चालू आर्थिक वर्षापर्यंत कर भरलेला नाही. यापूर्वीचा रेकार्ड शोधायला वेळ लागेल तो जसा शोधला जाईल तसे लगेच आपणास कळविण्यात येईल," असे अति.उपायुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना पत्र क्रमांक ४९/अे.डी.नुसार कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.२००६ रोजी प्राप्त झालेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या घराच्या बध्दलची नस्ती मिळत नसल्यामुळे पुन्हा ती शेधून देण्यासाठी संधी द्यावी, असा निर्णय दिलेला असून अपील हे निकाली काढण्यात आलेले आहे. अपीलाचा निर्णय देताना सदरचा निर्णय हा दोनही पक्षकारांच्या उपस्थितीत सुनावणी घ्यावयाची असते व सुनावणी घेतल्यानंतर कारण मिमांसा देणारा असा निर्णय देवून आदेश सुध्दा पारित करावयाचे असते. असा युक्तिवाद अपीलकर्ता यांचे वकीलांनी केला असून प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक, प्रथम अपीलाची तरतूद ही अधिनियमात करावयाचा उद्येश असा आहे की, अपीलकर्ता यांना मागीतलेली माहिती ही त्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावर उपलब्ध व्हावयास पाहिजे व त्याप्रमाणेच प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय असावयास पाहिजे. परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय आहे तो हा जन माहिती अधिकारी यांच्या पत्राप्रमाणे उत्तर दिलेले आहे, त्याचप्रमाणे तो निर्णय असल्यामुळे त्यास प्रथम अपीलाचा निर्णय मात्र म्हणता येत नाही. दिनांक ४.११.२००६ च्या उत्तराच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सन २००१

पासून कर भरण्याच्या संदर्भामध्ये संगणकीकरण करण्यात आलेले आहे. परंतु, त्यापूर्वीची माहिती ही एकत्रित नाही. तसेच घर क्रमांक ३४५६/जी/११४, वार्ड क्रमांक ५७ च्या संदर्भामध्ये नस्ती ही शोधूनही मिळत नाही व म्हणून दिनांक १३.४.२००७ रोजी वरील संदर्भामध्ये कळविण्यात येते की वार्ड क्रमांक ५७, घर क्रमांक ३४५६/जी/११४ या मालमत्तेबाबत सन २००१ पुर्वी कर भरल्याच्या पावतीची प्रत मागणी केलेली असून हा अभिलेख या कार्यालयात शोध घेवून सुध्दा उपलब्ध होत नसल्याने आपणास देता येणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी. त्यावर २००१ मध्ये कर भरणा केला आहे या संदर्भामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाने कसा निर्णय दिला याबाबत विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, रिव्हॅयाल्युएशन ज्या वेळेस होते त्या वेळेस सर्व घरमालकांना नोटीसेस पाठविल्या जाते व त्या रिव्हॅयाल्युएशनच्या नोटीसमधून कर भरण्याच्या संदर्भात माहिती मिळते व त्यावरुनच २००१ पासून संगणीकरण करण्यात आले आहे. व त्यामुळे त्याचे उत्तर देण्यात आले आहे. असे असले तरी नागरिकांकडून कर घेतांना त्याबाबतचे अभिलेख हे अद्यावत करुन जतन करणे आवश्यक असते व हा सर्वसाधारण समज सुध्दा आहे व त्याप्रमाणे महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने तशा प्रकारचे अभिलेखे जतन करणे आवश्यक होते.

४. सदरच्या घराच्या संदर्भामध्ये असेसमेंटची नस्ती आहे, परंतु असेसमेंट नस्तीमध्ये कर भरण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा दस्तऐवज नस्तीत नसते, असे त्यांनी सांगितले. मात्र, २००१ नंतरची माहिती ही संपुर्ण उपलब्ध आहे असेही त्यांनी सांगीतले. सदरच्या नस्तीबध्दलचा शोध पुर्वी घेतला होता, त्याबध्दलची टिपणी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी दाखविली. परंतु, प्रश्न पुन्हा माहिती उशिरा/विलंबाने उपलब्ध करुन देणे हा दिनांक १३.४.२००७ च्या पत्रातील उत्तराचा विचार केल्यास असे दिसून यते की, कर भरलेल्या पावतीची प्रत मागणी केलेली आहे. व अपीलकर्त्यांचा अर्ज सुध्दा रिसिटवाईज व डेटवाईज टॅक्स पेमेंट मागीतले आहे व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपीलकर्ता यांनी रिसिट नंबर व तारीख दिल्यास त्यांना रिसिटच्या संदर्भामध्ये छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येऊ शकतील. परंतु रिसिट नंबर किंवा तारीख नसल्यास लाखो घराच्या कराच्या पावती पुस्तकामधून रिसिट किंवा रिसीट डेट शोधणे हे शक्य होणार नाही. यावरुन एकुणच पुर्वी

अपीलकर्ता यांच्या घराची नस्ती ही तयार केलेली तरी दिसत नाही व १९९० पूर्वी तशी कोणत्याही प्रकारची नस्ती तयार केलेली दिसत नाही. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याकरीता राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारची पूर्वलक्षी प्रभावाने अभिलेख्याच्या संदर्भात आदेश देण्याची अधिकारिता नाही. मात्र, अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज दिनांक २५.९.२००६ रोजी दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने कलम ७ (१) प्रमाणे माहिती ही ३० दिवसांत उपलब्ध करुन द्यावयाची असते. मात्र, व्यक्तीशः माहिती मागीतली असल्यामुळे ३० दिवसांत अर्जदाराने सुध्दा माहिती घेण्यास जावयास पाहिजे होते. अपीलकर्ता हे वर नमूद केल्याप्रमाणे माहिती घेण्यास गेले असे त्यांचे म्हणणे असले तरी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती घेण्यास आले नाही, असे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, तसे जर असेल तर त्यांनी दिनांक ४.११.२००६ च्या संदर्भात माहिती द्यावयाचे आवश्यक नव्हते. व तरीसुध्दा माहिती सदभावनेने दिली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तसेच अपीलकर्ता यांनीच २००१ पासून कर भरलेला नसल्याने व तो त्यांना भरावा लागु नये म्हणून त्यांनी माहितीचा अर्ज सादर केलेला दिसतो असेही त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहिती ही विलंबाने दिली आहे हे सत्य असल्याने विलंबाने दिली हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. माहिती ही ३० दिवसांत द्यावयास पाहिजे, अर्थात ती दिनांक २५.१०.२००६ पर्यंत द्यावयासा पाहिजे होती. परंतु, ती दिनांक ४.११.२००६ रोजी दिलेली असल्यामुळे एकुण ९ दिवस विलंब झालेला दिसून येतो. व ९ दिवसांच्या विलंबाकरिता संबंधीत जन माहिती अधिकारी हे मात्र दोषी आढळून येतात. व त्याकरीता संबंधीत जन माहिती अधिकारी यांना कलम २० प्रमाणे शास्ती लादणे हे संयुक्तिक राहील. परंतु, पुन्हा असे की, कलम २० (१) या परंतुकाप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकुण घेण्याची संधी देणे हे आवश्यक आहे. आज हजर असलेले प्रथम अपीलीय अधिकारी हे स्वतः त्यावेळेस अति. उपआयुक्त होते, असे त्यांनी सांगितल्यामुळे शास्ती बध्दल त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील

हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व सदरची माहिती ही ९ दिवस विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे रुपये २५०/- प्रत्येक दिवसाकरीता शास्ती दिलेली असल्यामुळे एकुण शास्ती ही रुपये २२५०/- लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली ही संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून वसुल करण्यात यावी व तसा अहवाल ३ महिन्यांचे आंत आयोगास सादर करण्यात यावा.

२) प्रथम अपीलाचा निर्णय हा सुध्दा संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे किंवा अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे न दिलेला असल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्य तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे व त्याबाबत त्यांना ताकिद देण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सदरच्या निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक ३.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०८५/२००७**

**१) सौ. निर्मला भाऊराव नगरकर**
**रा.वडगांव पोलीस चौकी जवळ, पेट्रोलपंपासमोर**
**नागपूर रोड वडगांव वार्ड, पो.ता.जि. चंद्रपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**पोंभूर्णा, जिल्हा चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
**घोसरी, ता. पोंभूर्णा, जिल्हा चंद्रपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २०.२.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु सदरचा अर्ज हा विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेकडे नोंदवहीत नोंद नसल्यामुळे व सदरचा अर्ज उपलब्ध होत नाही असे त्यांनी सांगितले असल्यामुळे त्यांना ॲफिडेव्हीट दाखल करण्यास सांगीतले व त्याप्रमाणे आज ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. अपीलकर्ती गैरहजर आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे वरिष्ठ लिपिक हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो.

" आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- १) संबंधीत व्यक्तीच्या नांवे ९.६.१९९५ ला मौजा फुटाणा मोकासा भुमापन क्रं.४९६ आराजी हे ०.६८ भार नोंद आहे. २) कु. कविता पिते भाऊराव

नगरकर हे नांव कसे नोंद केले, यांचे स्पष्टीकरण द्या. ३) आपण ही ७/१२ वर हेराफेरी काय कशी केली. ४) सन १९८२ दि. २१.१२.९२ ला दयाल लिंगू वनकर यांनी रजिस्ट्री कोणत्या आधारे केली त्यांना हा अधिकार आहे काय ५) मुळ रजिस्ट्रेशन भाऊराव नगरकर यांचे नांव नसतांना संबंधीत (कु. कविता) चे नांव कसे दाखल केले यांची माहिती द्यावी. ६) पेर पत्र दरवर्षी मालकाचे नांवे कां नोंद करीत नाही यांची माहिती द्यावी. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले व सदरच्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय न दिल्यामुळे दिनांक ५.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ती यांचा दिनांक १८.१२.२००६ चा अर्ज विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचे म्हणण्याप्रमाणे त्यांच्याकडे असलेल्या अभिलेख्यामध्ये किंवा दस्तऐवजामध्ये सदरचा अर्ज दिसून आलेला नाही. तसेच आवक जावक नोंदवहीमध्ये सुध्दा त्याबध्दलची नोंद नाही व त्यामुळे त्यांना ॲफिडेव्हीट करावयाचे आदेश दिले होते व त्याप्रमाणे आज त्यांनी ॲफिडेव्हीट सादर केलेले आहे. व आवक नोंदवहित किंवा त्यांच्या कार्यालयीन दस्तऐवजामध्ये सदरच्या अर्जाची प्रत उपलब्ध नाही, असेच शपथपत्रावर दिलेले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलाच्या आवक नोंदवहीत नोंद आहे. तसेच दिनांक ६.११.२००६ ला अपीलकर्तीस सुध्दा पोस्टाने पत्र रवानगीची नोंद जावक नोंदवहीत आहे. तसेच संबंधीत लिपिकाच्या कार्यविवरण पंजिमध्ये नोंद आहे. तथा अपीलकर्तीस पाठविलेल्या पत्राची कार्यालयीन प्रत कार्यालयात शोधली असता आढळून आली नाही, असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून खुलासा, आवक-जावक नोंदवहिच्या छायांकित प्रती व कागदपत्रे दाखल झाले आहे. अपीलकर्ती ही सुध्दा दोनही तारखांना सुनावणीस गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी संपुर्ण माहिती तयार केली आहे व माहितीचा कालावधी पहाता जन माहिी अधिकारी त्या कालावधीत ग्राम विकास अधिकारी नसल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन

देण्यास टाळाटाळ केली किंवा जाणून बुजून माहिती दिली नाही असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ती यांचे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १८.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती हा निर्णय मिळाल्यापासून २ दिवसांचे आंत अपीलकर्ती यांच्या अर्जात दिलेल्या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ती व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४८५/२००७**
**अपील क्रमांक १४८६/२००७**

**१) श्री राजन दि. भूसारी (क.लि.)**
**प्राचार्य, अरुणराव कलोडे विद्यालय,**
**खामला, नागपूर-२५**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संस्था सचिव, प्राचार्य, अरुणराव कलोडे विद्यालय,**
**खामला, नागपूर-२५**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका**
**प्राचार्य, अरुणराव कलोडे विद्यालय,**
**खामला, नागपूर-२५** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये अपील क्रमांक १४८५/२००७ व अपील क्रमांक १४८६/२००७ अशी दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. परंतु, मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी प्राचार्य, अरुणराव कलोडे विद्यालय, खामला, नागपूर-२५ व संस्था सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी, प्राचार्य, अरुणराव कलोडे विद्यालय, खामला, नागपूर-२ हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४८५/२००७ मध्ये दिनांक २२.१.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना " शाळेत मला भेटावयास येणा-या माझ्या वैयक्तिक व्यक्तीकडून माझ्या विरुध्द आपल्या कार्यालयाने लिहून घेतल्याबाबत तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांकडून माझ्या विरुध्द लिहून घेतल्याबाबत ची कागदपत्रे आवश्यक. व माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद आहे." सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी

माहितीच्या अधिकारात आपण दिनांक २२.१.२००७ ला दिलेल्या अर्जाचे अवलोकन करावे. यात मागीतलेली माहिती अत्यंत मोघम स्वरुपाती असल्यामुळे ती माहिती आपणास उपलब्ध करुन देणे शक्य नाही, असे कळविलेले दिसून येते. परंतु, दिनांक ६.२.२००७ रोजीच अपीलकर्ता यांनी सदरच्या पत्रास आक्षेप घेणारे पत्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी संस्था सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय संस्था सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपील क्रमांक १४८६/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००७ रोजी डॅाक्टर रेखा म्हैसाळकर, आमच्या फॅमिली डॅाक्टर यांना आपल्या कार्यालयामार्फत आपण पाठविलेल्या माहितीची /पत्राची प्रत व्यक्तीशः आवश्यक आहे, असे नमूद करुन माहिती मागीतलेली आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दिनांक १२.२.२००७ रोजी संस्था सचिव, प्राचार्य अरुणराव कलोडे विद्यालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचे विरुध्द भ्रष्टाचाराच्या संदर्भामध्ये मा. लोकआयुक्त यांचेकडे तक्रारी केलेल्या असल्यामुळे व त्या संदर्भात मा. लोक आयुक्त यांचेकडे झालेल्या चौकशीमध्ये तसे सिध्द झालेले आहे असे अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या दिनांक ५,७,२००६ च्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी सचिव, साईबाबा लोक सेवा संस्था द्वारा संचालित प्राचार्य अरुणराव कलोडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांना दिलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते. तसेच दिनांक २७.११.२००६ च्या मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संस्था सचिव यांना दिलेल्या पत्रावरुन सिध्द होत आहे तसेच दिनांक २९.३.२००७ रोजी शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना दिलेल्या पत्रावरुन सुध्दा सिध्द होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हे अपीलकर्ता यांना त्रास देण्याच्या उद्येशाने त्यांच्या विरुध्द शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व त्यांच्याकडे आलेल्या व्यक्ती

यांचेकडून तक्रारी अर्ज लिहून घेत असते व त्याचा वापर त्यांच्या सेवेच्या संदर्भामध्ये करीत असते असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे वरील दोनही अपीलामध्ये जी माहिती अपीलकर्ता यांनी मागीतली आहे त्याबध्दल मोघम आहे असा आक्षेप जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला दिसून येत असला तरी अपीलकर्ता यांचे विरुध्द शिक्षक किंवा शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचेविरुध्द लेखी तक्रारी दिलेल्या असल्या तरी त्याप्रमाणे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. परंतु तशा प्रकारची तक्रार दिलेली नसेल तर त्याप्रमाणे उत्तर देणे आवश्यक राहील. तसेच डॉ. रेखा म्हैसाळकर यांना जर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्ता यांच्या विरुध्द पत्र दिलेले असेल तर त्या पत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. परंतु जर तशा प्रकारच्या तक्रारी दिल्या नसतील तर त्याबध्दल सुध्दा अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अर्जदाराने कलम ६ (१) प्रमाणे माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केल्यानंतर त्या अर्जाच्या संदर्भामध्ये जे योग्य असेल ते उत्तर ३० दिवसांत देणे हे बंधनकारक आहे. कोणत्याही प्रकारे आलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये उत्तर न देणे हे माहिती नाकारण्यासारखे होते व त्याबाबत कलम २० प्रमाणे शास्ती आकाराली जावू शकते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे दोनही अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४८५/२००७ व १४८६/२००७ हे दोनही अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या अनुक्रमे दिनांक २२.१.२००७ व ८.१.२००७ च्या अर्जामधील मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४८७/२००७**

**१) सौ. राजकिरण श्यामसुंदरजी अग्रवाल**
**रा. राजाभाई भवन, विविकानंद नगर,**
**तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**पोलीस अधीक्षक, भंडारा**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**तुमसर, जिल्हा भंडारा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. श्री डी.बी. रावलानी हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल झाली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा एस.डी.पी. ऑफिस, तुमसर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते. " Complaint against Pawan Patiram Sarve, R/o Shriram Nagar, Tumsar for fraudulent sale of land and cheating. माहितीचा कालावधी From the year २००२ to till the date. माहितीचे वर्णन- Progress report in the above said inquiry matter. " अशी माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषांगाने दिनांक २८.७.२००६ रोजी " सौ. राजकिरण श्यामसुंदरजी अग्रवाल यांनी सन २००२ मध्ये गैरअर्जदार पवन ऊर्फ पतीराम सार्वे विरुध्द जमीन खरेदी मध्ये धोकेबाजी केल्यासंबंधाने

दिलेल्या रिपोर्टची पाहाणी केली असता अर्जदाराच्या रिपोर्टवरुन गैरअर्जदार सार्वेवर कोणत्याच प्रकारचा गुन्हा दाखल झाला नाही. तसेच त्यांच्या अर्जाबाबत कोणत्याही प्रकारची नोंद दिसून येत नाही. माहिती व्यक्तीशः देण्यात येत आहे " असे उपविभागीय पोलीस अधिकारी, तुमसर यांनी कळविलेले दिसते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००६ रोजी पोलीस अधिक्षक, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा दिनांक ७.१०.२००६ रोजी अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी " उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने आपणास माहितीचे अधिकार अंतर्गत आपण अपील अर्ज सादर केला आहे. त्या अनुषंगाने दिनांक २८.११.२००३ ची तक्रार अर्जाची स्टेशन डायरी नोंद सत्यप्रत सोबत जोडली आहे," असे अपीलकर्ता यांना कळविलेले असून अपीलकर्ता यांना सदरचे पत्र दिनांक १२.१०.२००६ रोजी मिळाल्याची पोच दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ६.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.७.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ९.७.२००६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, तुमसर यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तुमसर यांना "अर्जदार यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या सदराखाली सन २००२ मध्ये गैरअर्जदार पवन ऊर्फ पतीराम सार्वे विरुध्द जमीन खरेदीमध्ये धोकेबाजी केल्यासंबंधात दिलेल्या रिपोर्टची चौकशी अंती त्यावर केलेल्या कारवाई संबंधी काय प्रगती आहे याबाबतची माहिती मागीतली आहे. ती माहिती त्यांना पुरविणे असल्याने ३ दिवसांत सदर माहिती आमच्या कार्यालयी सादर करावी " असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक २०.७.२००७ रोजी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तुमसर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे अहवाल पाठविलेला दिसून येतो. व त्यावरुनच दिनांक २८.७.२००६ चे उत्तर हे अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जातच तारीख दिलेली नसल्यामुळे व माहितीचा कालावधी २००२ तो आजपर्यंत असा दिलेला असल्यामुळेच कदाचित उत्तर देताना २००२ मध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल नाही, असे उत्तर दिलेले दिसून येते. मात्र पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केलेला

असल्यामुळे व त्यात संपुर्ण तपशिल दिलेला असल्यामुळे दिनांक २९.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (गृह), भंडारा यांनी " आपण सदर तक्रार दिनांक २८.११.२००३ ला पोलीस स्टेशन, तुमसर येथे दिली होती. सदर तक्रारी संबंधात चौकशी कागदपत्रांची मागणी केली आहात. मुंबई पोलीस अधिनियम, १९५९ अन्वये पोलीस नियमावली भाग-२, पृष्ठ १५, नियम २६२ क्रं.२१ (११) (२५) अन्वये २ वर्षाच्या मुदतीची असल्याने आपल्या तक्रारीची कागदपत्रे कालबाहय करण्यात आली आहे. याबाबत कृपया आपण माहितीच्या अधिकारातील कलम ४ चे अवलोकन करावे. आपण दिनांक २८.११.२००३ ला दिलेल्या तक्रारीची स्टेशन डायरी सान्हा क्रं.५८/०३ अन्वये नोंद करण्यात आली असून त्याबाबतची माहिती या कार्यालयाचे पत्र क्रमांक माहितीचा अधिकार/१३९/२००६,दिनांक ७.१०.२००६ अन्वये आपणास पुरविण्यात आलेली आहे," असे कळविलेले दिसून येते. तक्रारीची कागदपत्रे कालबाहय करण्यात आल्याच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी दिनांक ११.४.२००५ रोजी मुदतबाहय रेकार्ड कालावधी २ वर्षे पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तुमसर यांनी पोलीस अधिक्षक, भंडारा यांचेकडे जमा केला आहे असे दिसून येते. व त्यामुळेच सदरची तक्रार ही शोधून मिळत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

३. असे असले तरी अपीलकर्ता यांचे वकील यांनी अपील क्रमांक ११८०/२००७ मध्ये श्री श्यामसुंदर सत्यनारायण अग्रवाल जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, तुमसर यांचे विरुध्द दाखल केलेल्या अपीलाचा निर्णय हा आयोगाचे निदर्शनास आणलेला आहे. अपीलकर्ता यांनी जी तक्रार दिनांक २८.११.२००३ रोजी पोलीस निरीक्षक, तुमसर यांचेकडे दिली होती त्या संदर्भातच चौकशी करीता पोलीस निरीक्षक यांनी ज्या दुय्यम निबंधक तुमसर यांना दिलेल्या पत्राची प्रत मागीतलेली होती. यावरुन सदरच्या प्रकरणी चौकशी सुरु झालेली होती असे निदर्शनास आणले. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक ११.३.२००८ रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधकाच्या कार्यालयात आल्यानतर सदरच्या पंजिबध्द कराराची प्रत पोलीस स्टेशन मध्ये पाठविण्यात आली आहे, असे उत्तरवादी यांनी सांगितले. व त्यावरुनही सदरच्या प्रकरणी चौकशी सुरु नसेल तर पत्रव्यवहार सुरु आहे, असे त्यांनी सांगितले. परंतु, मुळ तक्रार ही पोलीस स्टेशन मध्ये नसल्यामुळे त्याबाबतची पुढील चौकशी

करता येत नाही, असेही उत्तरवादी यांनी सांगितले. व त्यामुळेच उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहीती ही गैरहेतूने लपविलेली आहे, असा निष्कर्ष काढता येत नाही.

४. आजही अपीलकर्ता यांनी मागिल तक्रारीचा संदर्भ किंवा प्रत देऊन तक्रार दिल्यास त्याबाबतची पुढील चौकशी करता येईल, असे उत्तरवादी यांनी सांगितले. व दिनांक २८.११.२००३ ची तक्रार आहे असे गृहीत धरुन चौकशी करणे शक्य होईल. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सुध्दा तक्रार देण्याचे मांन्य केले आहे. परंतु, सदरच्या प्रकरणी उत्तरवादी यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती त्यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरची अपील ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती ती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी उत्तरवादी यांनी मान्या केल्याप्रमाणे दि. २८.११.२००३ चे तक्रारीचे संदर्भात तक्रार दाखल करावी व न्याय मिळवून घ्यावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ५.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४८८/२००७**

**१) श्री अशोक मोहनलाल मेश्राम,**
**रा. विनोबा नगर तुमसर, ता.तुमसर, जि. भंडारा**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलातील कागदपत्रे दाखल केलेली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

" माहितीचा तपशिल - १) ६.१०.२००५ ला तहसिल कार्यालय तुमसर येथे श्री तरोणे व कुंभलकर यांनी मारपीट करुन शासकिय महत्वाचे रेकार्ड केस काढली त्याबाबतचा तुमसर यांनी अहवाल सादर केला त्याबाबतची संपुर्ण माहिती. २) श्री खाडीलकर २) श्रीमती शिंगाडे ३) श्री ढोबळे यांचे काळात दिवस कार्यालयातून गहाळ श्री जी.आर. लांजेवार होते त्याबाबत तिनही वेळा तीनही तहसिलदारांनी कार्यवाहीचे प्रस्ताव पाठविले होते. त्याबाबत झालेली कार्यवाही व मा. तहसिलदार यांनी पुन्हा कामावर कसे परत घेतले त्याबाबत सविस्तर माहिती. ३) श्री कुंभलकर तह. कार्यालय, तुमसर यांची कालबध्द पदोन्नती शासनानी नाकारली ती केव्हा पासून नाकारली व पदोन्नती नाकरल्या नंतर मंजूरी कालबध्द पदोन्नतीप्रमाणे केव्हा पर्यंत वेतन देण्यात

आले व नाकारल्या पदोन्नतीप्रमाणे केव्हा पर्यंत बोनस देण्यात आले. ४) मा.रविंद्र कोतले तहसिलदार तुमसर यांचे विरुध्द आपणाकडे चौकशी आहे. केव्हा पासून सुरु आहे व त्यावर झालेली कार्यवाहीची माहिती. ५) यावूर्वी भंडारा येथील तहसिलदार मा. वैद्य साहेब यांनी अंदाजे २ महिन्यापूर्वी तलाठी सभेत शिविगाळ केल्याबाबत तलाठयाचे अनेक धरणे व आंदोलन झालेल्या बाबत केलेली कार्यवाहीची माहिती. ६) शासकिय कर्मचा-यांचे बदल्या व टेबल बदल किती दिवसांत झाले यांची माहिती देवून तहसिल कार्यालय, तुमसर येथे एका टेबलावर किती दिवसापासून कामे करीत असून एकाच मुख्यालयात कोण किती दिवस कामे करीत आहे, सविस्तर माहिती. टिप-माहिती न्यायालयाकरीता पाहिजे असल्यामुळे प्रमाणित करुन देण्यात यावी. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००६ रोजी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक ८.६.२००६ ला अपूर्ण माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी दिली. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांनी निवासी जिल्हाधिकारी, भंडारा यांना दिनांक ८.६.२००६ रोजी निवासी उप जिल्हाधिकारी, भंडारा यांचेसोबत आपली प्रत्यक्ष झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे माहिती पुरविण्यात येत आहे. " १) मुद्या क्रमांक १ नुसार छायांकित प्रती देण्यात येत आहे. २) मुद्या क्रमांक २ नुसार मागणी केलेला रेकार्ड उपलब्ध नाही. ३) मुद्या क्रमांक ३ ची माहिती तहसिलदार, तुमसर यांचेकडून घ्यावी. ४) मुद्या क्रमांक ४ नस्ती कार्यवाही करीता मा. जिल्हाधिकारी भंउारा यांचेकडे सादर करण्यात आलेली आहे परत मिळताच मागितलेली माहिती पुरविण्यात येईल. ५) मुद्या क्रमांक ५ : श्री वैद्य प्रभारी तहसिलदार यांनी तलाठयांना केलेल्या शिवीगाळ प्रकरणी तलाठी संधटनेचे पदाधिकारी व मा. जिल्हाधिकारी यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार मौखीक समझौता झालेला आहे. ६) मुद्या क्रमांक ६: कर्मचा-यांच्या बदल्या हया शासन निर्णयाचे अधिन राहून केल्या जातात." असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती त्यांना विलंबाने उपलब्ध करुन

दिली. तसेच मुद्या क्रमांक १ मध्ये कार्यवाहीचा अहवाल दिलेली नाही. मुद्या क्रमांक ३ ची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असते तरी दिली नाही. मुद्या क्रमांक ४ मध्ये अजूनपर्यंत माहिती पुरविण्यात आलेली नाही. मुद्या क्रमांक ६ मध्ये शासन निर्णयाच्या छायांकित प्रती देण्यात आलेल्या नाहीत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबध्दल माहिती सांगितली. संबंधीत जन माहिती अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी यांनी सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे ते दोषी आढळून येतात. व त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे हे आवश्यक ठरते. तसेच माहिती उपलब्ध करुन देताना सुध्दा ती अपूर्ण अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ते सुध्दा दोषी आढळून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे. वास्तविक प्रथम अपील दाखल झाल्यानंतर दोनही पक्षकारांना उपस्थित करुन सदरच्या प्रथम अपीलाच्या प्रमाणे माहिती उपलब्ध झाली होईल अशा प्रकारे कारण मिमांसा देणारा निर्णय द्यावयाचा असतो. परंतु सदरच्या प्रकरणी प्रथम अपीलाची दखलच घेतल्या गेल्याचे दिसून येत नाही. व ही अतिशय गंभीर बाब आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ नुसार कार्यवाही झालेली असल्यास त्याबध्दलच्या अहवालाच्या छायांकित प्रतिच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक ३ बध्दलची माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असल्यास छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भामध्ये कर्मचा-यांच्य बदल्यांच्या संदर्भात शासन निर्णय किंवा अधिनियमाच्या छायांकित प्रती हया अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ही सर्व माहिती त्यांना विनामुल्य देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.३.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्याबध्दल तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबध्दलचे त्यांचे म्हणणे आयोगास १५ दिवसांचे आंत सादर करण्यात यावे अन्यथा सदरची शास्ती कायम केली जाईल.

३) सदरच्या शास्तीच्या संदर्भामध्ये विद्यमान निवासी उप जिल्हाधिकरी यांनी संबंधीत तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी यांना सदरच्या निर्णयाबाबत अवगत करावे.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ५.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४९०/२००७**

**१) श्री मो.गौस कुरेशी**
**रा.सरदार नगर, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हे विनाअनुमती गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते. " Issue certified copy, if you authority have received any order or instruction of the then, Collector Mr. Rajivji Mittal in the matter of removal of encroachment of Bholaram Dhonuji Lanjewar over the Gat No.९८५, Tah. Tumsar, Dist. Bhandara as mentioned in para no. ३ of the filed affidavit, which has prepared by yourself authority. (Copy of Affidavit enclosed herewith). माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. संदर्भ in concern of contempt petition No. ८९/०५, jagdishchandra v/s Collector, Bhandara. माहितीचा कालावधी - from January २००४ to till date. असे वर्णन दिलेले आहे.

३.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहित उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दिनांक २८.८.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ११.९.२००६ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवण्यात आलेली दिसते. त्यानंतर दिनांक ३.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना स्मरणपत्र पण दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. व तसा खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केलेला दिसून येतो.

४.  अपीलकर्ता यांचे दिनांक १०.७.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.९.२००६ चे पत्र तहसिलदार, तुमसर करीता सही करुन अपीलकर्ता यांना पाठविलेले दिसते. सदर पत्राची प्रत किंवा उल्लेख अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या मेमोमध्ये सुध्दा केलेला नाही. सदर पत्राची प्रत ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली आहे. तसेच दिनांक २६.७.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना तहसिलदार यांनी पत्र पाठविलेले आहे व दिनांक ८.९.२००६ रोजी सुध्दा पत्र पाठविले आहे. परंतु अपीलकर्ता सुध्दा सदरचा पत्रव्यवहार आयोगाच्या निदर्शनास आणत नाही असे दिसते. यावरुन अपीलकर्ता सुध्दा प्रामाणिक नाही व संबधीत तहसिलदार सुध्दा प्रमाणिक दिसत नाहीत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केले आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आदेश

१)  अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.७.२००६ अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२)  संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे शास्ती कां

लादण्यात येऊ नये याबध्दलचा खुलासा त्यांनी १० दिवसांचे आंत आयोगास सादर करावा. संबंधीत तहसिलदार यांनी सदरचा निर्णय विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांना अवगत करावा.

३) संबंधीत जन माहिती अधिकारी व तहसिलदार यांनी १० दिवसांत खुलासा न केल्यास त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्यात येईल.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ५.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४८९/२००७**

**१) श्री प्रमोद नामदेव सोनकुसरे**
**मु.पो.कोदुर्ली, ता. पवनी, जिल्हा भंडारा**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, पवनी ता. पवनी, जिल्हा भंडारा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००६ रोजी तहसिलदार, पवनी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून " अतिक्रमण हटविण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या प्रमाणित प्रती, दिनांक १५.५.२००६ ते देय तारखेपर्यंत. माझे पत्र दिनांक १५.५.२००६ अतिक्रमण पाडण्यासाठी मी आपल्या कार्यालयात दिनांक १५.५.२००६ ला अर्ज केला होता. १) माझ्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या (दैनंदिन) प्रमाणीत प्रती २) ही कार्यवाही किती दिवसात पुर्ण व्हायला पाहिजे होती ३) ही कार्यवाही आतापर्यंत का करण्यात आली नाही ४) कार्यवाही करीता कोणकोणत्या कागद पत्राची आवश्यकता आहे ५) दोषी अधिका-यांवर कोणती कार्यवाही होईल याची लेखी माहिती देण्यात यावी. ही माहिती स्वत: घेवून जाणार " असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले, असे अपीलकर्ता यांनी सांगितले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २६.९.२००६ रोजी ठेवण्यात आली होती, असे दिनांक २०.९.२००६ चे पत्रावरुन दिसते. परंतु, सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.९.२००६ रोजी नोटशिटवर खालीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

" माहितीच्या अधिकारात अर्जदारानी गैरअर्जदार यांचे अतिक्रमण आहे ते काढण्यात यावे अशी मागणी केली हे माहितीचे अधिकारांतग्रत येणार नाही. त्यांना हा विषय लोकशाही दिनांत देण्याबाबत सूचना केली. प्रकरण नस्ती करण्यात येते. तहसिलदारांनी त्याप्रमाणे अर्जदारास कळवावे व अहवाल सादर करावा - अतिरिक्त जिल्हाधिकारी." व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.८.२००६ च्या पत्रानुसार सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, कोदुर्ली यांचेकडून अहवाल मागविण्यात आला होता. त्यांनी दिनांक २९.८.२००६ नुसार अहवाल दिला. व दिनांक १५.९.२००६ रोजी अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे. अर्जात ही माहिती स्वतः घेवून जाणार असे नमूद केल्यानुसार अर्जदारास कार्यालयाचे पत्र दिनांक ८.८.२००६ नुसार या कार्यालयात उपस्थित राहाण्याकरीता पत्र दिले होते. अर्जदार हे उपस्थित झाले नाही. त्यामुळे त्यांना दिनांक १५.९.२००६ नुसार कार्यालयात उपस्थित राहाण्याबाबत पत्र दिले. परंतु, तरीसुध्दा ते उपस्थ्ति झाले नाही. यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, दिनांक ३०.९.२००६ रोजी ते कार्यालयात उपस्थित झाले होते. अर्जदाराच्या मुळ अर्जाच्या संदर्भात, सचिव ग्रामपंचायत, कोदुर्ली यांनी या कार्यालयाचे पत्र दिनांक २१.९.२००६ नुसार अहवाल मागविण्यात आला त्यानुसार सचिव, ग्रामपंचायत, कोदुर्ली यांचे अहवालानुसार सरपंच श्री मनोहर आकरे, मधुकर वैरागडे, श्री भूरे यांनी ग्राम पंचायत सदस्य यांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण केले नाही असे नमूद केले आहे. परंतु अर्जदार स्वतः उपस्थित झाले नाही. त्यामुळे माहिती पुरविण्यात आली नाही असा त्यांनी खुलासा केला आहे.

५. अर्जदार यांनी अर्ज दिनांक १५.५.२००६ नुसार सरपंच व ग्राम पंचायत सदस्य यांनी केलेल्या ग्राम पंचायत जागेवर अतिक्रमण कायदेशिर कार्यवाही करुन हटविण्यात यावे, असे नमूद केले आहे. परंतु, अर्जदार यांनी सचिव, ग्राम पंचायत कोदुर्ली यांना दिनांक २४.४.२००६ ला माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज केला. त्यात त्यांनी कोदुर्ली गावातील व्यक्तींनी केलेल्या अतिक्रमणाची माहिती व कार्यवाहीबाबत माहिती मागीतली होती. त्यानुसार सरपंच, ग्राम पंचायत कोदुर्ली यांनी त्यांचे पत्र क्रमांक १९, दिनांक १.५.२००६ नुसार अर्जदारास कळविले की, बेकायदेशिर अतिक्रमण केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले नसल्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर कार्यवाही करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. मुळातच अर्जदार यांना वरील विषयांकित माहिती सचिव, ग्रामपंचायत कोदुर्ली यांचेकडून मिळाली आहे. अर्जदार यांनी या कार्यालयातून मागीतलेली माहिती अन्य विभागाशी संबंधीत (ग्राम पंचायत कोदुर्ली यांचेशी संबंधीत) असल्यामुळे त्यांच्याकडून विचारणा करण्यात आली होती. अर्जदार यांनी सुध्दा दिनांक १२.१०.२००६ ला अपील केले. त्यात अ.क्रं. ७ मधील अपीलाचे कारण मध्ये नमूद केल्यानुसार अर्जदाराने दिनांक ३०.९.२००६ ला नकलेकरीता अर्ज केल्यानुसार या कार्यालयाचे नकलनवीस शाखेने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण सप्टेंबर २५, २००१ मधील अनुसूची अ मधील अक्र १० (दोन) नुसार प्रति कागद १०/- रुपये प्रमाणे दोन कागदाचे २०/- रुपये हे शासकिय पावती देवून स्वीकारले आहे. त्यामुळे अर्जदाराकडून घेतलेली रक्कम शासन नियमानुसार बरोबर आहे. जर अर्जदारास माहितीच्या अधिकारा अंतर्गत कागदपत्रांची मागणी करावयाची होती तर त्यांनी नियमाप्रमाणे रक्कम चालानद्वारे खजिना दाखल करावयास पाहिजे होती. अर्जदार यांना जी माहिती पाहिजे होती ती या विभागाशी संबंधीत नसल्यामुळे सचिव ग्रामपंचायत कोदुर्ली यांचेकडून मागविण्यात आली. ग्रामपंचायत जागेवरील अतिक्रमण हटविण्याचे अधिकार त्यांचे अधिकार क्षेत्रातील आहे. परंतु अर्जदाराचे अर्जानुसार अतिक्रमण हटविण्यात यावे. परंतु ग्रामपंचायत कोदुर्ली यांचे अहवालानुसार अतिक्रमण झालेलेच नाही त्यामुळे अतिक्रमण हटविण्याचा प्रश्नच उदभवत नाही व अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. अर्जदाराला सविच ग्रामपंचायत कोदुर्ली यांनी दिनांक १.५.२००६ लाच माहिती दिली आहे. तसेच अर्जदाराने नकलेचा अर्ज

देवून त्यांना पहिजे असलेली माहिती दिनांक ३०.९.२००६ ला नेली आहे. असा तहसिलदार पवनी यांनी खुलासा दाखल केला आहे. सदरचा खुलासा हा स्वयंस्पष्ट आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या स्तरावर माहिती उपलब्ध असेल त्या स्तरावर जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतूद आहे. जेणेकरुन कलम ७(१) प्रमाणे माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन देता येईल. परंतु, सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी जो दिनांक १५.५.२००६ ची तक्रार अर्ज केला आहे त्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती विचारलेली आहे. परंतु सदरच्या तक्रारीचा विषय हा तहसिलदार यांचे अधिकार कक्षेत येत नाही तो संवर्ग विकास अधिकारी यांचे कक्षेत येतो व त्यामुळे मुळचा दिनांक १५.५.२००६ चा अर्ज हा गट विकास अधिकारी यांचेकडे करावयास पाहिजे होता. त्यामुळेच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यास विलंब झालेला दिसून येतो. मात्र, अपीलकर्ता यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता माहितीचा खर्च म्हणून रुपये २० हे अतिरिक्त शुल्क घेतलेले दिसून येते. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ प्रमाणे छायांकित प्रती रुपये २/- प्रति पृष्ठ घेणे आवश्यक असते व त्यामुळे २ पृष्ठांकरीता अपीलकर्ता यांचेकडून रुपये ४ हे घेणे संयुक्तिक होते. अपीलकर्ता यांना पुन्हा जी माहिती जिल्हाधिकारी यांचेकडे तहसिलदार यांनी दिली ती पुर्वीच दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ५.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४९३/२००७**

**१) श्री महेश चैतराम पाली,**
**रा. धरमपेठ टांगा स्टँड, धरमपेठ**
**प्लॉट नं. ३६६, नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर विभाग,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय समाज कल्याण अधिकारी,**
**सदर, नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रेही दाखल केली नाही व सुनावणीस हजरही नाहीत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००६ रोजी विभागीय समाज कल्याण अधिकारी , नागपूर यांचेकडे १) गडारिया या समाज जातीचे आता पर्यंत किती वैद्य प्रमाणपत्र देण्यात आले. आणि किती अवैद्य झाले आणि अवैद्य करण्याचे कारण कोणते होते. जी. आर प्रमाणे सविस्तर माहिती देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्त्ीशः धेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.२.२००६ रोजी, सन २००१ पासून खालीलप्रमाणे गडरिया जातीचे सेवाविषयक ४ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी एक प्रकरण कार्यवाहीत असून

अवैद्या तीन प्रकरणे वैद्य ठरविण्यात आली आहेत.

१. क्रं.सी-२९८- श्री संतोष सुखराम कश्यप - वैध

२. क्र.एमयु-९६१- श्री सोहनलाल बाबुलाल निखार - कार्यवाहीत आहे

३. क्र.एसएन-२३५०- श्री विजय नंदलाल हरणे- वैध

४. क्र.एसयु-२४५८- श्री जियलाल पाली-वैध

वरीलप्रमाणे माहिती आपल्या संदर्भिय अर्जानुसार देण्यात येत आहे.

सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १२.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २७.९.२००६ रोजी संधोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर यांनी गडरिया जातीच्या उमेदवारांना भटक्या जमाती प्रवर्गातील प्रमाणपत्र दिल्याबाबत श्री संतोष सुखराम कश्यप, श्री सोहनलाल बाबुलाल निखार, श्री विजय नंदलाल हरणे व श्री जियालाल पाली यांच्या बध्दल माहिती कळविण्यात आली असे दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी, विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय, सदर, नागपूर यांना दिनांक १०.२.२००६ रोजी माहिती मागीतली होती. माहिती देण्यात आली. परंतु, माहिती बरोबर दिली नाही, मग दिनांक १२.९.२००६ रोजी अपील करण्यात आले. अपील करुनही माहिती बरोबर दिली नाही व काही माहिती लपविण्यात आली. म्हणून संबंधीत अधिका-यांकडून माहिती मिळवून देण्याची कृपा करण्यात यावी व आमचा वेळ खराब केला, चुकीची माहिती दिली म्हणून संबंधीतावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत तक्रार.

५. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात गडरिया, गडेरिया या जाती वेगवेगळया आहेत असे नमूद केलेले दिसून येते. तसेच दिनांक ६.५.२००८ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करुन गडारिया, गडरिया हया दोनही वेगवेगळया जाती आहे व त्याकरीता वेगळे शासन निर्णय आहे, अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र केलेले आहे. व त्यावरुन त्यांनी दिनांक १०.२.२००६ च्या अर्जामध्ये गडारिया

जातीची माहिती मागीतली असताना त्यांना दिनांक २४.२.२००६ च्या अर्जामध्ये गडरिया जातीची माहिती दिलेली असल्यामुळे सदरची माहिती चुकीची आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज केलेले आहेत व त्यांना अनेक अर्जाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आयोगाकडे दिनांक ३.५.२००८ रोजी खुलासा करतांना सुध्दा संशोधन अधिकारी यांनी दिनांक १०.२.२००६ च्या अर्जाचा उल्लेख केलेला नाही. किंवा दिनांक २४.२.२००६ रोजी जे उत्तर दिलेले आहे, त्याचाही उल्लेख केलेला नाही. मात्र, १२.९.२००६ रोजीचे अपील हे अर्ज समजून दिनांक २७.९.२००६ रोजी त्यास जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. तसेच अर्जदार श्री महेश चैतराम पाली यांनी संबंधीताकडे आजपावेतो अनुक्रमो दिनांक ९.११.२००६, २१.७.२००६, ८.२.२००७, २०.२.२००८ असे नियमितपणे माहिती मागविलेली आहे. संबंधीतास त्यांनी अनुक्रमे दिनांक ३१.७.२००६/२१.११.२००६/२५.१.२००७/२०.१.२००७ व दिनांक १५.३.२००७ ला वेगवेगळी माहिती विहीत मुदतीत पाठविलेली आहे. अर्जदार श्री महेश चैतराम पाली यांनी समितीच्या कार्यालयात हजर होऊन ब-याचदा कार्यालयीन नस्तीचे स्वत: अवलोकन केलेले आहे. मात्र अवलोकनातून माहिती घेवून परत माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन माहिती मागविलेली आहे. समितीने आपले जात पडताळणीचे काम सांभाळून अर्जदारास उपलब्ध असलेली माहिती पाठविलेली आहे, असा खुलासा केलेला आहे. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांनी केलेल्या इतर अर्जाचे छयांकित प्रती व त्यावरील उत्तराच्या छायांकित प्रती पुरावा म्हणून दाखल केलेल्या आहेत.

६. अपीलकर्ता यांना माहिती चुकीची दिली आहे हे गडारिया, गडरिया, गडेरिया या तीन वेगवेळया जाती असल्यामुळे सकृत दर्शनीच दिसून येत आहे. माहिती चुकीची दिली असल्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु, अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक १२.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. अधिनियमाचे कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपील हे जन माहिती अधिकारी यांनी निर्णय दिल्यापासून ३० दिवसांचे आंत दाखल करावयाचे असते. त्यानंतर सुध्दा दिनांक १२.९.२००६ च्या अपीलाच्या संदर्भात दिनांक २७.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी राज्य माहिती

आयोगाकडे मात्र अपील हे दिनांक ४.४.२००७ रोजी म्हणजेच अपील ९० दिवसात दाखल करावयाचे असते, त्यापेक्षाही जास्त कालावधीत दाखल केलेले आहे. तसेच अनेक अर्जांच्या माध्यमातून माहिती मागून पाहाणी करुन त्यातून पुन्हा माहिती मागणे हाच अपीलकर्ता यांचा उपक्रम दिसतो व त्यामुळे सुध्दा अपीलकर्ता यांची दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतची विनंती ही मान्य करता येत नाही.

असे असले तरी माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश अधिनियमाचा असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.२.२००६ च्या अर्जाप्रमाणे त्यांना "गडारिया" या समाज जातीची मागीतलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

वास्तविक, संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, हे जर खरोखरच संशोधन अधिकारी असतील तर अशा प्रकारची घोडचुक होण्याचे काहीही कारण नव्हते. त्यांना निश्चितच गडारिया, गडेरिया, गडरिया या जातीतील फरक हा माहिती असावयास पाहिजे व तसा तो त्यांनी मान्य सुध्दा केलेला आहे. यावरुन अर्ज काय आलेला आहे हा अर्ज वाचला जात नाही, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १२.९.२००६ रोजी दाखल केलेले असताना सुध्दा त्या प्रथम अपीलाची दखल ही अर्ज म्हणून घेतलेली असून संशोधन अधिकारी यांनीच उत्तर दिलेले आहे. अधिनियमाच्या कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी हे नियुक्त केलेले आहे. परंतु, सदरच्या प्रकरणामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा अपीलाचा निर्णय दिलेला आहे असे दिसून येत नाही. कदाचित, प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचे ज्ञान आहे असे दिसून येत नाही. त्यांनी आधी अधिनियमाच्या तरतूदींचे ज्ञान करुन घेणे आवश्यक आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपीलाच्या सुनावणीस येताना कोणत्याही प्रकारची तयारी करुन न येता जन माहिती अधिकारी येतात व प्रथम अपीलीय अधिकारी कोणत्याही प्रकारची दखल आयोगाच्या नोटीसची घेत नाही, याबध्दल मात्र त्यांना सक्त ताकिद देणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्ता यांना चुकीची माहिती दिलेली

असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १.२.२००६ (१०.२.२००६) च्या अर्जामध्ये गडारिया या समाजाच्या जातीची मागीतलेली माहिति विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी हे आयोगापुढे सुनावण्ीस येताना कोणत्याही प्रकारची तयारी करुन येत नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कोणत्याही तरतूदींची दखल घेत नसल्यामुळे त्यांना सक्त ताकिद देण्यात येत आहे व सदरची नोंद त्यांच्या गोपनिय अहवालामध्ये घेण्यात यावी व तसा अहवाल त्यांचे वरिष्ठांनी आयोगाकडे पाठवावा.

३) सदरच्या निर्णयाची प्रत ही आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी,

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ६.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१/२००७**

**१) श्री राजेश नारायणराव नितनवरे**
**रा.कुकडे ले आऊट, प्लॉट नं. ११५**
**पो. पार्वतीनगर, नागपूर-२७**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार, हिंगणा,जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा, तहसिल कार्यालय, हिंगणा यांचेकडे खालीलप्रमाणे ६ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

" आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- १) ऑक्टोबर २००३, नोव्हेंबर, २००३ व डिसेंबर, २००३ या महिन्यातील मस्टरच्या सत्याप्रतिलीपी. २) शासकिय धान्य गोदाम, हिंगणा येथे नियमानुसार धान्य ठेवण्याची क्षमता १५० मेट्रीक टन (१५०० क्विंटल) आहे हे खरे आहे काय? ३) डेली अहवाल (दैनिक पत्रक) दिन. २२.१०.२००३ ते १०.११.२००३ ४) T.P. (दि. २२.१०.२००३ ते १०.११.२००३ ) ५) J अहवाल (ऑक्टोंबर ०३ ते नोव्हेंबर, २००३) ६) श्री एस.एन.ठाकरे, माजी गोदामकिपर यांच्या म्हणण्यानुसार जर चार्ज हस्तांतरण झाले असेल तर त्यावेळेस हमालांनी आगाऊ (जास्तीचे) काम केल्याचे देयक व त्यावेळेस गोणी किती उपलब्ध झ ाल्या किंवा किती वापरण्यात आल्या. टिप- (वरील माहितीकरीता या आधी दोनदा अर्ज केलेले

आहेत) माहिती पोस्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष (हस्तांतरणाने): प्रत्यक्ष (हस्तांतरणाने). माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन: न्यायालयीन व विभागीय चौकशी प्रकरणात आवश्यक असल्यामुळे. " सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.८.२००७ रोजी संबंधीत विभागाकडून प्राप्त माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. त्यामध्ये मात्र ऑक्टोबर, २००३, नोव्हेंबर, २००३ व डिसेंबर, २००३ या महिन्यातील मस्टरच्या सत्य प्रतिलीपी उपलब्ध करुन दिलेल्या नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २०.१०.२००७ रोजी अपीलार्थीस व जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आदेश देण्यात आले होते, असे उपविभागीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु, तरी सुध्दा संपुर्ण माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात तहसिलदार हिंगणा यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सादर करतांना हजेरी पट हे वर्ग ड मध्ये येत असल्यामुळे हा रेकार्ड स्थायी नसल्यामुळे एक वर्षाच्या वर ठेवता येत नाही. परंतु रेकार्ड रुम मध्ये शोध घेतला असता तो निदर्शनास न आल्यामुळे अर्जदाराने माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर, २००३ ची मागणी केली ती पुरविता येणे शक्य नाही. सदर प्रकरणाचा संपुर्ण रेकार्ड पोलीस स्टेशन हिंगणा येथे जमा असून सदर प्रकरण ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट यांचेकडे न्यायप्रविष्ठ आहे. अपीलकर्ता यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन हिंगणा यांच्या दिनांक २०.२.२००७ रोजी दिलेल्या पत्रावरुन सुध्दा सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे दिसून येते.

४. असे असले तरी, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, ऑक्टोबर २००३ पासून ते २००७ पर्यंत मस्टरचे एकच रजिस्टर होते. परंतु उत्तरवादी यांचे असे म्हणणे आहे की, दरवर्षी मस्टर नवीन तयार केले जाते व एका वर्षाच्या कालावधी नंतर ते नष्ट केले जाते. त्यामुळे ऑक्टोंबर, २००३ पासून ते डिसेंबर, २००७ पर्यंत एकच रजिस्टर मस्टर होते, हे म्हणणे खरे नाही. तसेच सदरच्या मस्टर रजिस्टरचा संपुर्ण गोडाऊनमध्ये व कार्यालयात शोध घेतला असता सुध्दा तो मिळाला नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मी विशिष्ट दिवशी रजेवर

होतो व त्या दिवशीच मला चार्ज दिला असे दाखवून माझे विरुध्द कार्यवाही करण्यात आली आहे. व त्यामुळे त्यांना मस्टर रजिस्टरची आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले प्रमाणे मस्टर रजिस्टरचा शोध घेतला असता तो मिळून येत नाही, तरी सुध्दा अपीलकर्ता यांना सदरच्या मस्टरची आवश्यकता असल्यामुळे पुन्हा एकवेळ सदरच्या मस्टर रजिस्टरचा शोध घेणे हे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता हे त्यांच्या कार्यालयामध्ये सेवारत असल्यामुळे अपीलकर्ता यांनी स्वतः नायब तहसिलदार यांचे बरोबर संपुर्ण गोडाऊनमध्ये व संपुर्ण तहसिल कार्यालयामध्ये ज्या ज्या ठिकाणी अभिलेखे असतील त्या त्या ठिकाणी शोध घेण्यास त्यांना अनुमती देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे त्यांचे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांचा माहितीचा अर्ज दिनांक ३०.७.२००७ मधील मुद्या क्रमांक १ प्रमाणे मस्टर रजिस्टरचा शोध घेण्याकरीता नायब तहसिलदार यांची नियुक्ती करण्यात यावी व सदरचे नायब तहसिलदार यांचे बरोबर अपीलकर्ता यांनी स्वतः संपुर्ण कार्यालयात व गोडाऊन मध्ये ऑक्टोंबर, २००३, नोव्हेंबर, २००३ व डिसेंबर, २००३ या महिन्यातील रजिस्टरचा शोध घ्यावा.

२) अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केल्याप्रमाणे सदरच्या नायब तहसिलदार यांचे बरोबर शोध घेण्यास सहकार्य करावे.

३) सदरचे मस्टर रजिस्टर मिळाल्यास त्यातील दस्तऐवजाच्या प्रमाणित छायांकित प्रती हया अपीलकर्ता यांना विनामुल्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ६.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक१४९४/२००७**

**१) श्री पवन कोटेचा**
**एल.ॲन्ड टी. लिमिटेड, रामदासपेठ**
**नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक**
**भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर**
**जूने सचिवालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अधीक्षक, भूमी अभिलेख, सिव्हील लाईन, नागपूर**

**४) नगर भूमापन अधिकारी क्रं.१, २, ३ नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी नगर भूमापन कार्यालयामध्ये माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" Please provide details of :१.When was The on line mutation system in Your office implemented ? The work was awarded to which party and on what basis? Was any tendering process followed or work was awarded on ad hoc basis? Please provide specific information related to justification in starting the system in the present form and choosing the particular vendor ? Who was running the said system ? Is the system

still being operational? Has appropriate authority involved ie Settelment Commissioner etc have given approval for same if yes then give date of approval. If no then give reason for allowing private operator to start the service. If it has been discontinued then date as to when it has been discontinued and reason for discontinuance.

२. What was the revenue charged from citizen,? What was the revenue sharing arrangement between the operator implementing the said system and revenue department under whatever capacity ie thru Setu, thru Jihadhikari Sanstha or directly with revenue office or with City Survey Office.

३. The amount collected from citizen till date since inception and The share of respective partner.

४. Amount collected by Setu Samiti/Revenue Department or with City Survey Office in whatever capacity from this process deposited under what head and on what date.

५. If any amount is recoverable with party ie private operator then what action has been taken in this case till now. What action is being initiated against private operator and in charge officer by the Collector Nagpur as Revenue department head and as President Jihadhikari Setu Sanstha or by City Survey Office."

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ८.१२.२००६ रोजी मुद्या क्रमांक १ ते ५ प्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, सदरच्या माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.५.२००७ रोजी देण्यात आलेला आहे.

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती दिनांक ८.१२.२००६ रोजी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे दिनांक २२.१२.२००६ रोजी सुध्दा त्यांच्या दिनांक १५.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांच्या दिनांक १९.१२.२००६ च्या पत्रान्वये दिनांक ८.१.२००७ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, असे दिसून येते. पुन्हा त्यांना दिनांक २१.१२.२००६ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु, अपीलकर्ता हे सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीस त्याना उपस्थित राहण्याकरीता नोटीस काढून सुध्दा ते सतत गैरहजर राहात असल्यामुळे प्रथम अपील प्रकरण हे काढून टाकण्यात आलेले दिसते. आजही अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व त्यामुळे एकतर अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे त्यांचे समाधान तरी झालेले असावे किंवा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यात स्वारस्य नसावे हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष योग्य असा वाटतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता हे विनाअनुमती गैरहजर आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा ते गैरहजर होते. परंतु त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात यत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ६.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५०७/२००७**

**१) श्री गुणेश्वर ईसनजी फुंडे**
**संत तुकाराम हायस्कुल, टी.बी.टोली**
**गोंदिया, ता.जि. गोंदिया.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष**
**बहुउद्येशिय नाजुक शिक्षण प्रसारक संस्था, रामनगर, गोंदिया**
**पत्ता-श्री एल.ए.पटले(सचिव), दिनदयाल वार्ड, रामनगर, गोंदिया.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**संत तुकाराम हायस्कुल, टी.बी.टोली, गोंदिया. जि. गोंदिया.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १३.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये पुन्हा द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००६ रोजी माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार दिनांक १३.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ४११/२००७ ची दिनांक १२.९.२००७ रोजी सुनावणी होऊन अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येवून त्यांच्या माहितीच्या अर्जामधील दिनांक १०.११.२००४ च्या कार्यकारणीतील पदाधिका-यांच्या सभेचा ठराव, इतिवृत्त नोंदवही (ठराव पुस्तीकेची प्रमाणित प्रत) त्यांना निर्णय प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिलेला होता. त्यानुसार त्यांना निर्णयाप्रमाणे माहितीच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या होत्या. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, बहुउद्येशिय नाजूक शिक्षण प्रसारक संस्था, गोंदिया यांना श्री एस.एम.रायपुरकर (सहशिक्षक) यांची मुख्याध्यापक पदावर पदोन्नती करण्याबाबत कार्यकारणीतील पदाधिका-यांच्या सभेचा ठराव दिनांक १०.११.२००४ ला

घेतला त्याच्या इतिवृत्त नोंदवहीची (ठराव पुस्तीकेची) प्रत दिली नाही. माहिती खोटी दिली. संस्थेच्या कार्यकारणीतील पदाधिका-यांच्या सभेचा ठराव दिनांक १०.११.२००४ असा माहितीचा विषय व स्वरुप नमूद केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे निर्णय दिलेल्या अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु तशी तरतूद अधिनियमामध्ये नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे तक्रार म्हणून स्विकारुन त्याची सुनावणी घेणे आवश्यक ठरते. अपीलकर्ता यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या दिनांक १७.९.२००७ माहितीच्या छायांकित प्रती आयोगाच्या निदर्शणास आणल्या. त्याबाबत त्यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १०.११.२००४ रोजी जी ठरावाची प्रत दिलेली आहे, त्यात खोडतोड केलेली आहे. व दिनांक १०.११.२००४ ची पुन्हा एक वेगळी छायांकित प्रत त्यांना दिलेली आहे. त्याबाबत मुख्याध्यापक यांनी कार्यकारीणीच्या सभा व संस्थेच्या सभा अशा दोन वेगवेगळया ठरावाच्या छायांकित प्रती आहे. तसेच शिक्षणाधिकारी यांचेकडे सुध्दा जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाच्या छायांकित प्रती सुध्दा सादर केलेल्या आहेत. अपीलकर्ता यांचे खोडतोड बध्दलचे म्हणणे हे तपासून पाहाण्याकरीता उत्तरवादी यांचेकडील मुळ ठरावाच्या इतिवृत्त नोंदवहीची तपासणी केली. त्यात पारित केलेल्या ठरावाचीच प्रत दिलेली आहे, असे दिसून येते. खोडतोड जरी असली तरी तशीच प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्याबध्दल किंवा ठरावातील विसंगतीबध्दल जर तक्रार असल्यास त्यांना योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे किंवा न्यायालयाकडे त्याबाबतची तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. राज्य माहिती आयोगास अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे उपलब्ध असलेल्या माहितीच्याच छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याचा अधिकार आहे. त्या निर्णयातील गुणवत्तेच्या संदर्भात केणत्याही प्रकारचे आदेश करण्याचे अधिकार आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील

तथा तक्रार हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील तथा तक्रार त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १३.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १५३/२००७**

**१) श्री देविदास अभिमान नंदागवळी**
**२) श्री विष्णू नरहरिसा मालोकर**
**३) श्रीमती कलम चंपतराव पखाले**
**द्वारा समता नगर, पिल कॅालनी जवळ,**
**कौलखेड, अकोला.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,**
**अकोला.**
**३) जन माहिती अधिकारी**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय,**
**राज्य परिवहन महामंडळ, अकोला.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक १४.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ११.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार श्री देविदास अभिमान नंदागवळी व श्रीमती कमल चंपतराव पखोले हे हजर आहेत. श्री विष्णु नरहरिसा मालोकार, तक्रारदार हे गैरहजर आहे.

२. तक्रारदार यांनी दिनांक १८.७.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" आ**वश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : १) खास प्रलंबित का ठेवण्यात आली सविस्तर जवाब व तपशिल वरील कालावधीत राष्ट्रीय व राज्यस्तरिय स्पर्धेत भाग घेतल्याची रजा का दिली नाही. २) दि.सन १९९७ ते २००३ कालावधीत रा.प.म. कडून विविध खेळ व स्पर्धेत उदा. नाटक, कॅरम, क्रिकेट, कुस्ती, कब्बडी, हॅालीबॅाल, शरिर सौष्ठव इत्यादि खेळात भाग घेतला त्यांना महामंडळाकडून किती खेळाडूंना त्याबाबत किंवा खास रजा देण्यात आली हया विषयी

संपुर्ण तपशिलासह माहिती देण्यात यावी. ३) महामंडळाकडून वरील निर्देशित कालावधीत ज्या ज्या खेळाडूंनी स्पर्धकांना राज्यस्तरिय व राष्ट्रीय स्तरावर भाग घेतला त्यांची नांवे व कालावधी तपशिल माहिती देण्यात यावी. ४) १९९७, १९९८, १९९९, २००० ते २००१, २००२, २००३ हया कालावधीत किती खेळाडूंना खास रजा देण्यात आली हया बाबत माहिती देण्यात यावी. " तसेच दिनांक २१.६.२००६ रोजी श्री विष्णु नरहरीसा मालोकार यांनी सुध्दा तीच माहिती मागीतलेली दिसून येते. पुन्हा दिनांक १.९.२००६ रोजी श्रीमती कमल चंपतराव पखाले यांनी सुध्दा तीच माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या पत्राचे अनुषंगाने दिनांक ८.७.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच श्री मालोकार यांचे पत्रात सुध्दा दिनांक ४.७.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व दिनांक १.९.२००६ च्या पत्राप्रमाणे सदरचा अर्ज कार्तिकी महादेव शहारे उप खंड अभियंता, मंगळूरपीर यांचेकडे दाखल केलेला दिसून येतो. व त्यामुळे आज हजर असलेले उत्तरवादी यांचेकडे सदरच्या पत्राची नोंद नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सदरच्या पत्राने तक्रारदाराचे यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी सदरच्या प्रकरणी तक्रारदार श्री देविदास अभिमान नंदागवळी यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. परंतु, श्रीमती कमल चंपतराव पखाले यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु तीनही अर्जदारांनी एकच तक्रार मात्र राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली आहे.

३. तक्रारदार यांच्या दिनांक १८.७.२००६ च्या अर्जाचे ऐवजी तक्रारदार यांनी दिनांक २१.७.२००६ रोजी अर्ज दाखल केला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्या अर्जाची प्रत त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली नाही. दिनांक १८.६.२००६ च्या अर्जास माहिती अधिकारी यांनी दिनांक २.१२.२००५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज करुन याच माहितीची मागणी केलेली होती. व त्या संदर्भात या कार्यालयाचे पत्र क्रमांक रा.प./विना/अ/प्रशा/माअ/६१०८, दिनांक २८.१२.२००५ नुसार आपणास कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे त्याच संदर्भात आपण पुन्हा मागणी केलेली असल्याने ती पुन्हा पुरविण्याची गरज वाटत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यावरुन दिनांक २७.१२.२००५ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत यापुर्वी

आपल्या खेळाकरीता खास रजेबाबत माहिती मागीतली असता ती कां देण्यात आली नाही तथा इतर कर्मचा-यांना विविध खेळाकरीता दिलेल्या खास रजेबाबत माहिती कोर्ट कामाकरीता मागीतलेली आहे. याबाबत आपणास कळविण्या येते की, यापूर्वी आपणास खात्याचे नियमाचे अधिनि वेळोवेळी खेळाकरिता दिनांक १६.१२.९६ ते २१.१२.९६, दि. १२.१२.९७ ते १७.१२.९७, दि. ४.१२.९८ ते ७.१२.९८, दि.१२.२.९९ ते १६.२.९९, दि. २६.११.९९ ते २९.११.९९ व दि. १३.१.२००० ते १९.१.२००० अशा खास रजा मंजूर करण्यात आलेल्या आहेत. ज्या प्रकरणी आपण पुर्व परवानगीशिवाय परस्पर खेळाकरीता रजा उपभोगून नंतर उशीरा अर्ज सादर केला व आगार वयवस्थापकांच्या शिफारस विना असलेल्या अर्जावरील रजा नामंजूर करण्यात आलेल्या आहेत. इतर कर्मचा-यांच्या खेळाकरीता खास रजेची बाब ही अन्य कर्मचा-यांचे सेवा अभिलेखाशी संबंधित असलेले माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार ती आपणास देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. व तीच माहिती मागीतलेली असल्याने त्यांना तसे उत्तर देण्यात आलेले दिसून येते.

४. तक्रारदार श्री देविदास नंदागवळी यांच्या करीताच श्री विष्णू नरहरिसा मालोकार यांनी सुध्दा तीच माहिती माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक यांचेकडे मागीतलेली दिसून येते. व त्यामुळे आपले उपरोक्त संदर्भात अर्जाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण सदर अधिनियमाअंतर्गत श्री डी.ए. नंदागवळी यांचे खास रजेबाबत तथा इतर कर्मचा-यांच्या राष्ट्रीय स्तरावर भाग घेतल्याच्या तपशिलाची मागणी केलेली आहे. श्री डी.ए. नंदागवळी यांनी यापूर्वी मागणी केल्यानुसार त्यांच्याशी संबंधीत माहिती असल्याने वरील बाबीसंबंधी त्यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रशा/६१८८, दिनांक २८.१२.२००५ नुसार माहिती देण्यात आली आहे. सदरच्या माहितीचा आपल्याशी संबंध येत नाही. तसेच सार्वजनिक कामकाजाशी संबंध येत नाही. त्याचप्रमाणे सदरची माहिती अन्य कर्मचा-यांच्या सेवा अभिलेखाशी संबंधीत असल्याने व्यापक लोकहिताच्या दृष्टीने ती आपणास देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. श्रीमती कमल पखाले यांचा दिनांक १.९.२००६ चा अर्ज हा मुळात माहिती अधिकारी म्हणून कार्तिकी महादेव शहारे, उपखंड अभियंता विभागीय कार्यालय, मंगळूरपीर, अकोला यांचेकडे केलेला दिसून येतो. व त्यामुळे आज हजर असलेले उत्तरवादी श्री व्ही.के.ठाकूर, विभागीय

कर्मचारी वर्ग अधिकारी हे माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे सदरचा अर्ज प्राप्त नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जे माहिती अधिकारी नियुक्त केलेले असतात त्यांच्याकडेच माहितीचा अर्ज सादर करणे आवश्यक असते. कोणत्याही अधिका-याकडे माहिती अधिकारी म्हणून अर्ज सादर करुन माहिती उपलब्ध होत नाही. व त्या अधिका-यास जबाबदार सुध्दा धरता येत नाही. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अधिनियमाचे कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा नियुक्त केलेले आहे. व त्यामुळे प्रथम अपील सुध्दा हे कोणत्याही उच्च पदस्थ अधिका-यांकडे दाखल करुन त्याचा निर्णय मिळत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कलम ६ (१) प्रमाणे ज्या व्यक्तींनी अर्ज केलेला असतो त्याच व्यक्तींनी प्रथम अपील दाखल करावयाचे असते व द्वितीय अपील सुध्दा दाखल करावयाचे असते. तीन वेगवेगळया व्यक्तींच्या अर्जाच्या संदर्भामध्ये एकच तक्रार अपील अशी तरतूद अधिनियमात नाही. माहितीचा अधिकार, २००५ हा अधिनियम मुळातच पारित करण्याचा उद्येश असा आहे की, एकदा अधिनियमाचा आधार घेतल्यावर माहिती ३० दिवसांत उपलब्ध झाली पाहिजे व त्यामुळे संबंधीत माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडेच अर्ज सादर करणे आवश्यक असते. अन्य अधिका-यांकडे अर्ज दाखल केल्यास कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध होईलच याबाबत शक्यता नसते. सदरच्या तीनही अर्जांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तीनही व्यक्तींनी श्री नंदागवळी यांचे रजेबाबत माहिती मागण्याचा उपक्रम केलेला दिसतो. वास्तविक, दिनांक २७.१२.२००५ चे पत्र हे स्वयंस्पष्ट आहे. सन १९९६ ते २००० पर्यंत श्री नंदागवळी यांना नियमाप्रमाणे वेगवेगळया खास रजा मंजूर केलेल्या आहेत. व त्या प्रमाणे त्यांनी पुर्वपरवानगीशिवाय रजा उपभोगली असल्यास त्या प्रमाणे त्या रजा नामंजूर केलेल्या आहेत असे स्पष्ट केलेले आहे. असे असताना सुध्दा योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे किंवा न्यायालयाकडे तक्रार न करता त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा वापर करुन १९९६ पासून इतर खेळाडू कर्मच्या-यांच्या संदर्भामध्ये माहिती मागण्याचा हा उपलक्रम केलेला दिसून येतो. सन १९९६ ते २००० या कालावधीत ज्याअर्थी त्यांना रजा मंजूर केलेल्या होत्या त्याअर्थी १९९८ ते २००० च्या कालावधीमधील इतर खेळाडूच्या संदर्भामध्ये

माहिती मागण्याची काही आवश्यकता नव्हती. मात्र त्यांनी रजेचा अर्ज सुध्दा दिला नसतांना रजा उपभोगून झाल्यावर व ती नामंजूर झाल्यावरच त्यांना पुर्वी मंजूर झालेल्या रजेच्या कालावधीतील इतरांच्या मंजूर रजाबाबत माहितीची आवश्यकता भासली व विविध व्यक्तींनी विविध अर्जाच्या माध्यमातून तीच ती माहिती अशा प्रकारे माहिती मागीतल्यावर माहिती मागीतली तर त्यांच्या नामंजूर झालेल्या रजेच्या संदर्भात वेगळा निर्णय होईल, असा समज दिसून येतो हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा उद्येश हा सार्वजनिक व्यापक हिताकरीता माहिती मागण्याचा आहे. मागीतलेल्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित दिसून येत नाही. व स्वहिताकरीता सदरची माहिती त्यांनी व त्यांच्या वतीने ज्यांनी मागीतलेली आहे ती मागीतलेली दिसून येते व हा अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा गैरवापर आहे. दिनांक २७.१२.२००५ च्या पत्रामध्ये स्वयंस्पष्ट केलेले असून सुध्दा जर अशा प्रकारे माहिती मागितलेली असेल तर सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची अवश्यकता नाही. व त्याबात उत्तरवादी यांनी दिलेली उत्तरे ही योग्य आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१)** तक्रारदार यांना त्यांच्या वेगवेगळया अर्जाच्या माध्यमातून त्यांना दिनांक २७.१२.२००५ च्या पत्राचे अनुषंगाने स्वयंस्पष्ट अशी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

**२)** निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १४.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५१२/२००७**

**१) श्री ताराचंद अंताराम मुलमुले**
**रा.समता कॅालनी, नागभिड**
**पो.ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संवर्ग विकास अधिकारी, पंचयत समिती, नागभिड**
**जिल्हा चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्राम पंचायत कार्यालय, नागभिड**
**ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १४.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी राज्य जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, नागभिड यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. " **हव्या असलेल्या माहितीचा तपशिल** : अर्ज दिनांक २७.३.१९९६, दि. ९.११.२००२, दि. २९.११.२००४ आणि ११.११.२००५ १) बांधकामावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार ग्रा.पं.ला आहेत काय. २) बांधकामा संबंधीत तक्रारीचे संबंधात मौका चौकशी करुन तक्रारीचे निराकरण करणे ग्रा.पं.चे कर्तव्य आहे काय. ३) दि. २७.३.१९९६ चे अर्जासंबंधाने कोणती कार्यवाही केले. ४) प्लॉट क्रं. ६ (सहा) आणि ७ (सात) सलग असल्याने प्लॉट क्रं. ६ आणि ७ ची सरहद् ठरवितांना प्लॉट क्रं. ६ (सहा) चे कब्जातील क्षेत्र विचारात घतले जाते काय. ५) प्लॉट क्रं. ६ (सहा) चे खरेदी प्रमाणे क्षेत्र किती आहे आणि कब्जात किती जागा आहे. ६) दोन प्लॉटचे सिमारेषेवर

किंवा दुस-याचे कब्जातील व मालकीचे जागेत जीना कम कंपाऊंड वालचे बांधकाम करता येते काय ७) गैरअर्जदाराचे गैरकृत्यामुळे आणि ग्रा.पृंचे अकार्यक्षमतेमुळे अर्जदाराचे बांधका अपूर्ण राहीले त्यास जबाबदार कोण आहेत ८) समता कॅालनीत प्रामुख्याने अनुसूचित जातीची वसाहत आहे काय ९) अनुसूचित जातीचे प्रभागातील इमारतीवर गृहकर आकारता येते काय १०) मालमत्ता कर दोन प्रकारे आकारता येतो काय उदा. ग्रा.पं. आकारलेला कर आणि राजस्व विभागाकडून आकारलेला ग्रा.पं.कर ११) अपूर्ण बांधकामावर बांधकामाचे दराने आकारणी करता येते काय १२) आकारलेला बांधकामाचा कराचा दर आणि क्षेत्र १३) बांधकामाचे दराने आकारणी केल्यास किती टक्के आकारणी कमी करावी लागते आणि तशा प्रकारे केले आहे काय १४) कर आकारणी संबंधीत तक्रार अर्जावर किती दिवसाचे आंत कार्यवाही करावी लागते १५) ६० (साठ) दिवसाचे आंत सदर अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यास काय गृहीत होते १६) ६० (साठ) दिवसांचे आंत माहिती पूरविली नसल्याने नियमानुसार करात सुधारणा कां करण्यात आली नाही. १७) वरील प्रकारे सुधारणा न करता मागणी बिल आणि मागणी लेख तामील करणे न्यायोचित आहे काय १८) दि. २७.३.१९९६ आणि दिनांक ९.११.२००२ चे अर्जासंबंधाने मोक्का चौकशी कां करण्यात आली नाही. त्यामुळे अर्जदाराचे मकाण अपूर्ण असल्याने संभाव्य परिणामास कोणास जबाबदार धरण्यात येईल." सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागभिड यांचेकडे दिनांक १५.१२.२००६ रोजी प्रथम अपीली दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १०.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांना १८ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे खालीलप्रमाणे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

" आपले नोटीसचे अनुषंगाने मी अपीलार्थी प्रतिज्ञालेख लिहून देतो की, राज्य जन माहिती अधिका-यांनी माहितीची मागणी फेटाळले. तसेच प्रथम अपीलीय अधिका-यांनी चुकिची व दिशाभूल करणारी माहिती पूरविले. त्यांनी माझे अर्जात माहितीचा कालावधी या सदरात नमूद केलेल्या अर्जाचा विचार केलेला नाही हे त्यांनी पूरविलेल्या मुद्या क्रं. १,३,५,७ आणि १८ चे माहितीवरुन स्पष्ट होते. त्याचबरोबर त्यांनी राज्य जन माहिती अधिका-यांकडून माहितीची सिध्दता केले नाही हे त्यांनी दिलेल्या माहितीवरुन सिध्द होते. त्यांनी मुद्या क्रं. ४ ची दिलेली माहिती टाळाटाळ करणारी व दिशाभूल करणारी आहे. वास्तविक प्लॅाट क्रं. ६ चे क्षेत्र विचारात घेतल्याशिवाय प्लॅाट क्रं. ६ आणि ७ ची सरहद ठरविता येत नाही. मुद्या क्रं. १२ अन्वये ग्रा.पं. ठरावाची प्रत आणि कर आकारणी यादी पूरविणे आवश्यक होते. त्यांनी ती पूरविले नाही. मुद्या क्रं. १३ चे संबंधात दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. वास्तविकता महाराष्ट्र ग्रा.पं.कर व फी नियम १९६० चे नियम क्रं.९(२) मध्ये एकुण कर निर्धारणातून १० टक्के कर वजा करण्याची तरतूद आहे. मुद्या क्रं. १६ आणि १६ ची माहिती दिशाभूल करणारी आहे. वास्तविकता महाराष्ट्र ग्रा.पं.कर व फी नियम १९६० मधील तरतुदीन्वये दोन महिन्याचे आंत पंचायत आकारणीत सुधारणा करण्यास चुकली असेल तर आकारणीत सुधारणा झाल्याचे गृहीत होते. मुद्या क्रं. १७ व १८ ची दिलेली माहिती टाळाटाळ करणारी व दिशाभूल करणारी आहे. सदरची माहिती देण्यापूर्वी त्यांनी मुद्या क्रं. १८ वर नमूद केलेला अर्ज ग्रा.पं.कडून मागणे आवश्यक होते. तसे त्यांनी केले नाही.

मी मागीतलेली माहिती विशेषकरुन प्रश्न रुपात असली तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १० अन्वये मिळणे आवश्यक तथा न्याय आहे. त्याचबरोबर उत्तरवादीनी माहितीची मागणी फेटाळल्यामुळे त्यांचेवर शास्तीची कारवाई होणे आवश्यक तथा न्याय आहे. तसेच ग्राम पंचायतच्या अकार्यक्षमतेमुळे झालेल्या माझ्या नुकसानीची भरपाई करण्याचा आदेश होणे आवश्यक तथा न्याय आहे. करिता प्रतिज्ञालेख लिहून दिला आहे."

अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.११.२००६ च्या अर्जामध्ये त्यांनी पुर्वी दिनांक २७.३.१९९६, ९.११.२००२, २९.११.२००४ व दिनांक ११.११.२००५ च्या अर्जाच्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये १७ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळै जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे अधिनियामाच्या कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती ही मागीतलेली नसतांना त्यांनी माहिती मागीतली आहे अशा पध्दतीने सदरच्या माहितीतील मुद्यांची उत्तरे दिली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून प्रथम अपील सादर केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून माहिती ही ग्राम पंचायत स्तरावरच असल्यामुळे ग्रामसेवक यांना सुध्दा उपस्थित करुन संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कारण मिमांसा देणारा निर्णय द्यावयास पाहिजे होता. परंतु तसे न करता त्यांच्या प्रथम अपीलात दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मोघम अशी उत्तरे दिलेली दिसून येते व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन करुन आपले कर्तव्याचे पालन केलेले नाही व त्यामुळे त्यांना सक्त ताकिद देणे आवश्यक ठरते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.११.२००६ च्या अर्जामध्ये दिलेल्या अर्ज दिनांक २७.३.१९९६, ९.११.२००२, २९.११.२००४ व ११.११.२००५ च्या अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती व १७ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती ही (जन माहिती अधिका-यांचे अभिप्राय किंवा मत येईल असे प्रश्न वगळून) माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे दिनांक १०.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० (३) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये १०००/- (रुपये एक हजार) शास्ती ही

लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी वसुल करुन त्याप्रमाणे आयोगाकडे ३ महिन्यांत अहवाल सादर करावा.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यांत यावी.

**दिनांक १४.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,ाागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १५८/२००७**

**१) श्री प्रेमदास रेकाजी राठोड**
**बी-८, लिबर्टी एनक्लेव्ह, जेपीनगर रोड**
**मालवीयनगर, खामला, नागपूर -४४००२५**

**तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकरी**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिाांक १५.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ११.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ चे कलम, १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दिनांक ३.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे पाच मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु, त्यातील महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्यांची सुरक्षा हा विषय गृह विभागाकडेच असल्यामुळे सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध होण्यासाठी गृह विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला होता. परंतु त्याप्रमाणे दिनांक २८.१२.२००६ रोजी तक्रारदार यांना अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना उद्येशून लिहिलेल्या आपल्या दिनांक ३ ऑागष्ट, २००६ च्या अर्जामधील मागीतलेल्या माहितीपैकी (ड) येथे राज्याच्या मंत्रीमंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्यांच्या सुरक्षेवर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (त्र) मधील वर्जित प्रयोजनात मोडत असल्याने ती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु, त्यापूर्वीच तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदरच्या संदर्भामध्ये मुंबई येथील कार्यालयात सुध्दा तक्रार दिनांक ३०.११.२००६ रोजी दाखल केली होती व त्यानंतर नागपूर येथे राज्य माहिती आयोगाचे कार्यालय सुरु

झाल्यानंतर सदरची तक्रार दाखल केली होती. तक्रारदार यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दिनांक ५.१०.२००७ रोजी सुनावणी घेतली होती, असे गैरतक्रारदार तथा माहिती अधिकारी यांनी सांगीतले व तसा खुलासा आयोगाचे कार्यालयात आज दाखल केला आहे. तक्रारदार यांच्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी इतरही तक्रारी दाखल केलेल्या होत्या. त्या तक्रारींच्या संदर्भात सुनावणी हेऊन निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये तक्रारदार यांनी निरनिराळया सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत माहिती ही एकत्रित करुन मागितलेली असल्यामुळे ती विहित मुदतीत देणे हे शक्य नाही व त्यामुळे या माहितीच्या संदर्भामध्ये विलंब झालेला दिसून येतो. त्यातही राज्य जन माहिती अधिकारी यानी जो खुलासा दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे आहे-

" सर्वप्रथम मी आपणास सनम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अर्जदार श्री प्रेमदास रेकाजी राठोड यांनी माझ्याशी संबंधित सुरक्षा या मुद्याबाबत माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्यामुळे राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे दिनांक ३०.११.२००६ रोजी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरील सुनावणी होण्यापूर्वीच दिनांक २८.१२.२००६ रोजी अर्जदारास मी उत्तर दिले आहे. या तक्रारीवरील सुनावणी मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ५.१०.२००७ रोजी ठेवली होती. त्यावेळी तक्रारदार श्री प्रेमदास रेकाजी राठोड हे सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. या सुनावणीच्यावेळी श्री राठोड यांना उत्तर दिल्याची बाब मा. माहिती आयुक्तांच्या निदर्शनास आणली होती. मा. माहिती आयुक्तांनी सुनावणीच्यावेळी, श्री राठोड यांनी आता तक्रारीत उपस्थित केलेले दोन्ही मुद्दे-उत्तर देण्यास झालेला विलंब आणि माहिती नाकारल्याची बाब यावर माझा लेखी खुलासा व म्हणणे ऐकून घेतले. याबाबत माहिती देण्यासाठी काही पर्याय उपलब्ध आहेत का याबाबतही मा. माहिती आयुक्तांनी सखोल चर्चा व विचारविनिमय केला आहे. त्यामुळे त्यांच्या आताच्या तक्रारीतील देनही मुद्दे त्याचवेळी निकाली निघाले आहेत. त्यामुळे एकाच मुद्यावर दोनवेळा सुनावणी घेणे न्यायोचित होणार नाही हा मुद्याही कृपया विचारात घ्यावा. अर्जदार श्री राठोठ हे जर त्या सुनावणीस उपस्थित राहीले असते तर त्यांना त्यावेळी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळाली

असती परंतु त्यांनी सुनावणीस अनुपस्थित राहून ही संधी घालवली आहे. कृपया या बाबीचाही विचार व्हावा अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

असे असले तरीही आपल्या आदेशाचे पालन करुन मी माझा खुलासा पुढीलप्रमाणे सादर करीत आहे-

२. अर्जदार श्री राठोड यांचा मूळ अर्ज सामान्य प्रशासन विभागकडे प्राप्त झालेला होता. त्यातील मुद्या क्रं. ड, ज्यामध्ये महाराष्ट्र मंत्रीमंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्यांच्या सुरक्षा, परिवहन व दूरध्वनी/मोबाईल यावर त्यांनी शपथ घेतल्यापासून ते आजवर करण्यात आलेल्या खर्चाची माहवार व मुद्यानिहाय माहिती अर्जदाराने मागितली होती. त्यापैकी मंत्रीमंडळातील सदस्यांच्या सुरक्षेवरील खर्चाची माहिती माझ्याशी संबंधित आहे. सदर अर्जाची प्रत सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक २९.८.२००६ रोजी माझ्याकडे प्राप्त झाली.

३.मंत्रीमंडळातील सदस्याची सुरक्षा किंवा कोणत्याही अतिमहत्वाच्या व्यक्तीस दिलेली सुरक्षा ही गुप्त स्वरुपाची व संवेदनशील बाब समजली जाते. मागील काही वर्षामध्ये राज्यात व देशात घडलेल्या विविध दहशतवादी घटना, बॅाम्बस्फोट इत्यादी विचारात घेता, अतिमहत्वाच्या आणि मंत्रीमंडळातील सदस्यांसारख्या उच्चस्तरीय व्यक्तींना दिलेल्या संरक्षणासंदर्भातील कोणतीही माहिती सामान्य नागरिकास उघड करण्यापूर्वी, ज्या प्राधिका-यांकडून सदर संरक्षण देण्याबाबत वेळोवेळी सूचना व गुप्त संदेश प्राप्त होत असतात, त्यांचे अभिप्राय घेणे मला आवश्यक वाटले. येथे हेही स्पष्ट करण्यात येते की, व्यक्तीगत संरक्षण ही अत्यंत संवेदनशील बाब असून केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने राज्य तसेच केंद्र शासनातील मंत्रीमंडळाचे सदस्य, उच्च पदस्थ व अतिमहत्वाच्या व्यक्ती (उदा. मा. राष्ट्रपती, मा. पंतप्रधान, मा. राज्यपाल, केंद्र व राज्य शासनाचे मा. मंत्रीमहोदय इत्यादी) यांना दयावयाच्या संरक्षणासंदर्भात गुप्त स्वरुपाचे सविस्तर आदेश दिलेले आहेत. सदर आदेशानुसार राज्यातील पोलीस यंत्रणा या व्यक्तींना वर्गीकृत तथा अवर्गीकृत संरक्षण देत असते. राज्य मंत्रीमंडळातील काही सदस्यांना वर्गीकृत तर काही सदस्यांना अवर्गीकृत संरक्षण देण्यात आलेले आहे.

४.सदर संरक्षण प्रत्यक्षात पोलीस यंत्रणेकडून देण्यात आलेले आहे. त्यामुळे याबाबत पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई

यांच्याकडून संरक्षणाबध्दल माहिती व अभिप्राय मागविण्यात आले. सदर अभिप्राय शासनास प्राप्त होण्यास काही कालावधी लागला. सदर माहितीच्या अनुषंगाने उपरोक्त पोलीस अधिका-यांनी असे निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण प्राधिकृत प्रकाशन रजि.क्रं.टीईसी/४७-३०३/एमबीआय/२००३-०५, दिनांक २४.१०.२००५ मधील भाग ४-अ अधिसूचनेनुसार, राज्य गुप्तवार्ता विभाग, पोलीस आयुक्तांकडील विशेष शाखा व जिल्हा पोलिस अधीक्षकांकडील विशेष शाखांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदी लागू होत नाहीत, आणि मंत्रीमंडळातील सदस्यांना याच शाखांकडून संरक्षण देण्यात येते. तेव्हा अर्जदार श्री प्रेमदास राठोड, नागपूर यांना राज्य गुप्तवार्ता विभागडील माहिती पुरविणे योग्य होणार नाही.

५.माहिती अधिकारी म्हणून माहिती देण्याबाबत निर्णय घेण्यापूर्वी सुरक्षा यंत्रणेचे अभिप्राय घेणे मला महत्वाचे वाटल्याने तसे अभिप्राय मी घेतले. आयुक्त, राज्यगुप्त वार्ता विभाग यांनी कळविलेले उपरोक्त अभिप्राय विचारात घेता मंत्रीमंडळातील सदस्यांची सुरक्षा ही महत्वाची, संवेदनशील व गुप्त स्वरुपाची असल्याने आणि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील ८ (ञ) नुसार, सदर माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक नाही. तसेच, ही माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही आणि माहिती प्रकट केल्याने संरक्षित हिसंबंधास (म्हणजेच अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या सुरक्षेसंदर्भात ) बाधा आणण्यासारखे ठरु शकेल असे स्पष्ट झाल्याने त्यावरील खर्चाची माहिती न देण्याच्या निर्णयाप्रत मी आलो आणि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ८ (ञ) नुसार, अर्जदाराने मागितलेली मंत्रीमंडळातील सदस्यांच्या सुरक्षेवरील खर्चाची माहिती देणे शक्य नसल्याचे अर्जदारास दिनांक २८.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच याच पत्रान्वये त्यांना अपिलाविषयी देखील मार्गदर्शन केलेले आहे. परंतु त्याप्रमाणे अर्जदाराने प्रथम अपिलिय अधिका-याकडे अपिल न करता थेट आपल्याकडे अपिल दाखल केले आहे. वास्तविक अर्जदाराने दिनांक २९.९.२००६ पर्यंत माहितीची वाट पाहून दिनांक २९.१०.२००६ पर्यंत प्रथम अपिलिय अधिका-याकडे अपिल करणे आवश्यक होते, परंतु अर्जदाराने प्रथम अपिलिय अधिका-याला डावलून पहिल्या अपिलाची मुदत उलटल्यावर १ महिन्याने थेट आपल्याकडे केले आहे.

त्यामुळे ते अपिल माहितीचा अधिकार अधिनियमानुसार वैध नाही हे मी आपणास नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

६. माझ्याकडील नियमित कार्यभारात राज्याची अंतर्गत सुरक्षा, अतिमहत्वाच्या व्यक्तींची वर्गीकृत व अवर्गीकृत सुरक्षा, राज्याचे किनारा संरक्षण, संवेदनशील स्थळांची सुरक्षा, दहशतवादी कारवाया नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना इ. महत्साचे व अतिसंवेदनशील विषय सोपविण्यात आलेले आहेत. या संदर्भात केंद्र शासनाकडून अत्यंत तातडीचे व महत्वाचे संदेश तात्काळ कार्यवाहीसाठी नियमितरित्या प्राप्त होत असतात. या संदर्भातील तातडीच्या कामकाजात आणि वरीलप्रमाणे पोलिस यंत्रणेचे अभिप्राय घेण्यात माहिती देण्याची विहित मुदत उलटून गेली आहे. श्री राठोड यांच्या अर्जास अनुसरुन उत्तर पाठविण्यास, हेतुपुरःसर अथवा माहिती नाकारण्याच्या उद्येशाने विलंब झालेला नाही हे आपल्या नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो. तरी, ही बाब क्षमापित करावी आणि अर्जदाराने अपिलात म्हटल्याप्रमाणे मला दंड करु नये, अशी आपणांस नम्र विनंती आहे. "

३. सदरच्या खुलाशाचा विचार केला असता राज्य जन माहिती अधिकरी यांचे उत्तर योग्य वाटते. प्रत्यक्ष सुरक्षतेच्या संदर्भातील माहिती ही तक्रादार यांना अपेक्षीत नाही असे त्यांचे म्हणणे असून खर्चाची माहिती उपलब्ध करुन द्यावी असा युक्तिवाद त्यांनी केला होता. एकुणच राज्य जन माहिती अधिकार यांचा युक्तिवाद व खुलासा याचा विचार केल्यास कोणत्याही महत्वाच्या व्यक्तीची सुरक्षा ही सापेक्ष असते. त्या त्या परिस्थितीवर ती अवलंबून असते व त्यातही लोक प्रतिनिधी हे दौ-यावर जात असतात व त्यावेळेस सदरची सुरक्षा ही कमी जास्त होत असते व त्या बाबीचा खर्च हा त्या त्या स्थानिक प्राधिकरणाने सुध्दा केलेला असतो व त्यामुळे हा सर्व खर्च एकत्रितरित्या संकलीत असणे शक्य नाही, असा जो युक्तिवाद केला आहे तो योग्य वाटतो. व त्यातच ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडून ही सुरक्षा व्यवस्था दिली जाते त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती उपलब्ध करुन घेण्यास माहितीचा अधिकार हा अधिनियम लागू होण्यास अपवाद करण्यात आलेला असल्यामुळे सदरची माहिती ही उपलब्ध होऊ शकत नाही. राज्य विधान मंडळाला सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे

तक्रारदार यांचे म्हणणे आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की राज्य विधान मंडळामध्ये सुरक्षेच्या संदर्भात चर्चा होते परंतु प्रत्यक्ष सुरक्षा व्यवस्थेवर चर्चा होत नाही. खर्च वगैरे असा अंदाजपत्रकामध्ये स्वतंत्र दिलेला नसतो व त्यामुळे सुध्दा स्वतंत्रपणे ही माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देता येणार नाही व हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य वाटते व त्यामुळे तक्रारदार यांनी जे उत्तर दिनांक २८.१२.२००६ रोजी दिलेले आहे ते योग्य हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांना राज्य जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१२.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती योग्य वाटते त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत तक्रारदार व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १५.५.२०८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४५६/२००७**
**अपील क्रमांक १४५७/२००७**

**१) पुरुषोत्तम रामभाऊ कामडी**
**द्वारा चरडे गुरुजी, मु.पो.तकिया, सुराबर्डी**
**अमरावती रोड, पो. आठवा मैल, ता.जि. नागपूर**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**स्वामी विवेकानंद हायस्कुल, अडधामणा**
**ता. हिंगणा, जिल्हा नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक १२.७.२००७ व दिनांक १५.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १४५६/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी मुख्याध्यापिका, स्वामी विवेकानंद हायस्कुल, वडधामणा यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे ९ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष किंवा नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

" पाहिजे असलेल्या माहितीचा तपशिल- (एक) क्रं.झेडपिएन शिक्षण मंजुरी/२/शिबिर कार्यालय शिक्षण विभाग (माध्य) जिल्हा परिषद नागपूर दिनांक १६.३.१९९६ नुसार शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी दिलेल्या मान्यतेच्या वेळी दिनांक १४.३.१९९६ ला सादर केलेला संपुर्ण प्रस्ताव ( १ ते ८ कर्मचा-यांचा) कव्हरिंग लेटर सहित देण्यात यावा. (दोन ) क्रं.झेडपीएन/शिक्षण मंजुरी//५९०६

कार्यालय शिक्षण विभाग (माध्य.) जि.प. नागपूर दिनांक ६.१२.१९९७ ला शिक्षणाधिकारी (माध्य) यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्ताव क्रमांक ५५/९७ दिनांक ७.११९७ संपूर्ण प्रस्ताव कव्हरिंग लेटर सहित. (तीन) क्रं.झेडपीएन/शिक्षण मंजूरी/५६२४/कार्यालय, शिक्षण विभाग (माध्य) जि.प.नागपूर दिनांक १८.७.९८ शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी दिलेल्या मान्यतेच्या वेळभ आपण सादर केलेला प्रस्ताव क्रमांक ६/९८ दिनांक ५.१.९८ चा संपुर्ण प्रस्ताव कव्हरिंग लेटर सहित देण्यात यावा. (चार) शाळेतील शिक्षक श्री कामडी, तलमले, बुधे राऊत, सुर्यवंशी यांच्या मुळे सेवा पुस्तिकेच्या छायांकित प्रती रजेच्या प्रशिक्षणाच्या नोंदिसह देण्यात याव्या. (पाच) शाळैतील कर्मचा-यांचा सत्र २००४-०५, ०५-०६ मध्ये शिल्लक रजेचा हिशोब, बिनपगारी रजा मंजूर केल्याचा हिशोब आणि पगार कपात केल्याची रक्कम दिनांकासहित तसेच मंजूर केलेल्या रजेचा हिशोब देण्यात यावा. (सहा) शिक्षकाचा पगार कपात करण्यासाठी शेडयुल-I नुसार सहपत्र ४ सेवाजेष्ठ कर्मचारी यांच्या नुसार गठित केलेल्या शाळा समितीचा ठराव देण्यात यावा. (सात) मा. शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी आपणास दिलेले पत्र क्रं.४९६७ दिनांक १२.६.२००२ चे पत्राची छायांकित प्रत तसेच त्यापत्रानुसार काय कार्यवाही केली ती माहिती. (आठ) आपण दाखल केलेली Civil suit No. ४४२ of २००६ दिनांक १०.४.२००६ ला दाखल केलेल्या याचिकेच्या वेळी शाळा समितीचे शेडयुल झ वरील सदस्याच्या नुसार गठित केलेली शाळा समितीचे ठराव, तसेच संस्थेचा ठराव देण्यात यावा. वरील सर्व शाळा समितीच्या ठरावाचे ओरिजनल रजिस्टर निरीक्षणाकरिता देण्यात यावे कलम ७ (१) नुसार. (नउ) सत्र २००६-०७ मध्ये गठित केलेल्या शाळा समितीच्या (शेडयुल-I नुसार) आजपर्यंत घेतलेले सभेचे ठराव देण्यात यावा. संबंधीत माहितीचा कालावधी - वरील कर्मचा-यांच्या मुळ सेवा पुस्तिकेच्या नियुक्ती २००६ पर्यंतच्या सर्व नोंदी, सत्र ०४-०५, ०५-०६ मधील पगार कपात तसेच १९९६, १९९७, १९९८ ला दिलेल्या मान्यता संबंधी. "

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २०.१.२००७ रोजी प्रथम अपील मा. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. त्यावर दिनांक ७.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

४. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल माहिती अधिकारी यांना विचारले असता, माहिती उपलब्ध करुन देण्यापूर्वीच त्यांनी प्रथम अपील दाखल केले असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यानंतर दिनांक ७.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक २ व ३ मधील प्रस्तावाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या होत्या त्यात उल्लेख असलेल्या कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेश मात्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्याबध्दलही जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगीतले की, जी कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध आहेत, जे प्रस्ताव कार्यालयात उपलब्ध आहेत ते सर्व प्रस्ताव त्यांना जसेच्या तसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असावयास पाहिजे. पण जन माहिती अधिकारी हे ती माहिती उपलब्ध करुन देत नाही कारण त्या स्वत: पदवीशिवायच नोकरीस आहेत. त्यावर सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणाच्या संपुर्ण अभिलेख्यांची पाहाणी करता येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी स्वत: जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेल्या अभिलेख्यांची पाहाणी केल्यास त्यातून त्यांना सदरची माहिती उपलब्ध होऊ शकतील. परंतु, त्यावरही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती त्यांना देतीलच अशी त्यांची खात्री नाही. व त्यामुळे दूसरा पर्याय हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी त्यांच्या शिक्षणाधिकारी या अधिकारात शाळेची कागदपत्रे तपासणी करुन त्यातून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हा पर्याय आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १४५७/२००७ मध्ये दिनांक २५.९.२००६ रोजी एकुण पाच अर्जदार यांनी खालीलप्रमाणे ३ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

" पाहिजे असलेल्या माहितीचा तपशिल -(एक) माहितीचा विषय : वरील १ ते ५ अर्जदाराच्या मुळ सेवा पुस्तिकेच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन देण्यात याव्या. (दोन) सत्र

२००४-०५ आणि सत्र २००५-२००६ मध्ये शिल्लक रजेचया हिशोब, बिनपगारी रजा मंजूर केल्याचा हिशोब, मंजूर केलेल्या रजेचा हिशोब देण्यात यावा. तसेच पगार कपात करण्यासाठी धेतलेलया शा समितीच्या मुळ ठरावाची छायांकित प्रत साक्षांकित करुन देण्यात यावी. (तीन) संबंधीत माहितीचा कालावधी - वरील अर्जदाराच्या नियुक्ती दिनांकापासून २००६ पर्यंतच्या मुळ सेवा पुस्तिकेच्या सर्व नोंदी सत्र २००४-०५ व सत्र २००५-०६ मधील मगार कपात केल्याबाबत."

६. सदरच्या अर्जाच्याप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अर्जदार यांनी दिनांक २०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यातूनही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. तांत्रिकदृष्टया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे एकच अर्जात अनेक अर्जदारांनी माहिती मागणे हे जरी संयुक्तिक नसले तरी अवैध नाही व त्यामुळे सदरच्या अर्जामधील ३ मुद्यांतर मागीतलेली माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

७. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १५.२.२००७ रोजी घेण्यात आली असून दिनांक २८.२.२००७ प्रमाणे माहिती पुरविण्यात यावी (खर्चाचा भरणा करुन) असा निर्णय देण्यात आलेला आहे. श्री कामडी यांना त्यांच्या सेवापुस्तकाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या होत्या परंतु अर्जदार क्रमांक २ व ५ यांच्या संदर्भातील सामुहिक अर्ज असल्यामुळे सेवापुस्तकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाही, असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांच्या सेवा पुस्तकाच्या छायांकित प्रती उपलब्घ करुन देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता सुध्दा सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४५६/२००७ व अपील क्रमांक १४५७/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपील क्रमांक १४५६/२००७ मधील अर्जातील मुद्या क्रमांक १,२,३ मधील माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याकरीता मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी त्यांच्या प्रतिनिधीच्या माध्यमातून अपीलकर्ता यांच्या बरोबर जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेल्या अभिलेख्याची तपासणी करुन माहिती उपलब्ध असल्यास छायांकित प्रती विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरची पाहाणी करण्याकरीता मा. शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळविण्यात यावी.

३) अपील क्रमांक १४५७/२००७ मधील अर्जदार क्रमांक २ व ५ यांच्या मुळ सेवा पुस्तकाची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच अर्जातील मुद्या क्रमांक २ मधील माहिती ही छायांकित प्रतीमध्ये विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १५.५.२०८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४५९/२००७**

**१) डॅा. श्री अशोक गजानन लांजेवार, सदस्य**
**सिटीझन्स फोरम महाराष्ट्र नागपूर,**
**रा.एम-५, प्रिमियम प्लाझा, २४२, खरे टाऊन,**
**धरमपेठ, नागपूर-४४००१०**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता**
**गोसीखुर्द प्रकल्प पाटबंधा ाने विभाग, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अध्यक्ष, नागरीक मंच महाराष्ट्र म्हणून अर्ज केलेला आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प यांचेकडे गोसीखुर्द धरण विभाग वाही (पवनी), जिल्हा भंडारा येथे झालेल्या आर्थिक अनियमिततेची चौकशी करुन दोषीव्यक्तीवर कारवाई करण्याबाबत. मागीतलेल्या माहितीचे वर्णन : १) संघटनेच्या पत्र क्रं.:सि.फो./केंद्र/नाग/७६/२००६, दिनांक १.६.२००६ प्रमाणे कळविण्यात आलेल्या मुद्यांवर काय कार्यवाही करण्यात आलेली आहे याबाबत माहिती पाठविण्यात यावी. २) भाववाढीच्या जास्त देण्यात आलेल्या रक्कमा संबंधितांकडून वसूल करण्यात आलेल्या आहेत काय, याबाबत माहिती पाठविण्यात यावी. व माहिती व्यक्तीशः स्विकारण्यात येईल येईल, माहितीबाबत कळविण्यात यावे असे नमूद केलेले दिसून येते.

४. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांच्या दिनांक २.८.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.१२.२००६ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली तसेच सदरची माहिती अपूर्ण आहे. माहितीचा अर्ज आल्यानंतर ३० दिवसांमध्ये कोणत्याही प्रकारे अपीलकर्ता यांना कळविलेले नसल्यामुळे निश्चितच सदरची माहिती ही विलंबाने दिलेली दिसून येते. परंतु उत्तरवादी यांचे त्यावर असे म्हणणे आहे की, माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही तर अपीलकर्ता यांच्या दिनांक १.६.२००६ च्या अर्जामधील मुद्येनिहाय तपासणी करण्याकरीता जी कार्यवाही करण्यात आली, त्या कार्यवाहीमुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे व त्यावरुन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली आहे हा निष्कर्ष काढता येत नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी जो माहितीचा अर्ज दाखल केलेला आहे त्या अर्जामध्ये कोणत्या प्रकारची कार्यवाही सुरु आहे किंवा होत आहे याबध्दलची माहिती ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक असते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रशासकिय पत्र देण्यापेक्षा अपीलाची संकल्पना ही दोनही पक्षकारांच्या उपस्थितीमध्ये सुनावणी घेऊन कारण मिमांसा देणारा निर्णय द्यावयाचा असतो व तशी कार्यपध्दती अवलंबिली असती तर कदाचित अपीलकर्ता यांना द्वितीय अपील दाखल करावयाची आवश्यकता राहीली नसती. आजही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपूर्ण आहे. अर्थातच, त्याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खुलासा केलेला नाही. माहिती अपूर्ण आहे याबाबत मुद्येनिहाय खुलासा आयोगाकडे करणे आवश्यक असते त्याशिवाय आयोगास चौकशी करता येत नाही.

असे असले तरी एकुणच नागरिक मंच महाराष्ट्र हा माहितीच्या अधिकाराच्या संदर्भामध्ये अत्यंत जबाबदारीने काम करीत असल्यामुळे व माहिती मागण्याचा त्यांचा हेतू प्रामाणिक असल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत जी कार्यवाही अपेक्षीत आहे, ती राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. त्याबध्दल प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता यांचेकडे संपर्क साधून त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीतील जी अपूर्णता आहे त्याबध्दल कार्यवाही करुन घ्यावी किंवा शंकाचे निराकरण करुन घेणे हे संयुक्तिक राहील व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मुख्य अभियंता यांचेशी संपर्क साधावा व मुख्य अभियंता यांनी सुध्दा त्यांच्या शंकाचे निराकरण करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असली तरी सदरची माहिती ही अपूर्ण आहे असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे कार्यवाहीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता यांचेशी संपर्क साधून शंकाचे निराकरण करुन घ्यावे व तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे संपुर्ण समाधान होईल, अशी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १७.५.२०८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३३/२००८**

**१) श्री जीतेश सदाशिव पोळके**
**रा. निवारा वार्ड क्रं. १०, जुनागांव**
**प्रकाश स्टोर्समागे, मलकापूर रोड, बुलढाणा-४४३००१**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अति.मुख्य कार्यपालन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी , कृषी विभाग**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००८ (कार्यालयास प्राप्त २०.१.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री बी.के. वागळे, हे हजर असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल करण्यात आली आहे

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बुंलढाणा यांचेकडे जिल्हा परिषद मार्फत आदित्य सोलर शॉपीचा प्रस्ताव विहित पध्दतीने मागविला होता काय, केव्हा, कसे. आदिल्य सोलरशॅापीकरिता जि.प.कडे प्रस्ताव दाखल केलेल्यांची यादी मिळणेबाबत. माहिती व्यक्तीशः घेणार म्हणून मागीतली होती. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२००७ रोजी श्री बी.एन. उबाळे, व श्री एम.एच. सावंत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे पत्र क्रमांक बुजिप/कृषि/उर्जा/२७८/२००७,दिनांक

५.२.२००७ रोजी संबंधीतांनी मागणी केलेली माहिती पुरविता येत नसल्याचे कळविलेले असल्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही असा खुलासा सादर केलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १७.१२.२००६ च्या अर्जाच्या प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्याबध्दल माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज हा कृषि विभागाकडून कार्यान्वीत करण्यात आलेला आहे व सोलर उर्जा प्रकल्पा संबंधामध्ये कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव हा कृषि विभागा मार्फत पाठविला जात नाही तर ग्राम पंचायात विभागाकडून पाठविला जातो व त्यामुळेच तशा प्रकारचे उत्तर दिनांक ५.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना देण्यात आलेले होते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी ही दोनही पक्षकारांच्या उपस्थितीत घेतली असेल तर अपीलकर्ता यांना जिल्हा परिषद हे एकच सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे व ग्राम पंचायत विभाग हा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असल्यामुळे त्याबध्दलची माहिती त्यांना त्याच वेळेस उपलब्ध झाली असती. परंतु, दिनांक २२.१.२००७ रोजी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता प्रशासकिय आदेशाप्रमाणे एक पत्र कृषि विकास अधिकारी यांनी पाठवून देण्यात आलेले दिसते. व त्यावरुन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सदरच्या प्रकरणामध्ये विचार केलेला दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे. अपीलकर्त्यांचा अर्ज जिल्हा परिषद हे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून जर कृषि विभागाकडे देण्यात आलेला होता तर कृषि विभागाकडून जर सोलार शॅापीचे प्रस्ताव सादर केले जात नसले तरी ज्या ग्राम पंचायत विभागाकडून ते सादर केले त्या विभागास ते हस्तांतरण करणे हे अधिनियमाच्या कलम ६ प्रमाणे आवश्यक होते व तसे ते संबंधीत माहिती अधिकारी यांनी केले असते तर त्याच वेळी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असती. अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांचेकडे दिनांक ५.४.२००४ च्या पत्राप्रमाणे माहिती मागीतलेली होती व त्यांना जिल्हा परिषद, बुलढाणा मार्फत या आधी पाठविण्यात आलेल्या प्रायव्हेट आदित्य सोलर

शॉपी प्रस्ताव मंजूरीस्तव अपारंपारिक उर्जा स्त्रोत मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यात आलेले असल्यामुळे व अपारंपारिक उर्जा स्त्रोत मंत्रालय नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार एका जिल्हयात फक्त एकच प्रायव्हेट अपांरंपारिक सोलर शॅापी किंवा सोलर उभारण्याची परवानगी असल्यामुळे आपल्या प्रस्तावाचा सद्यस्थितीत विचार करता येत नाही याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविण्यात आलेले आहे, असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले व त्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागीतलेली दिसून येते.

यावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने कोणत्याही प्रकारचा प्रयत्न न करता प्रस्ताव त्यांच्या विभागा मार्फत गेले नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. मात्र आज आयोकडे खुलासा दाखल करताना कृषि अधिकारी यांनी असे सांगीतले की, अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही दिनांक १३.४.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व सदर योजनेची कार्यान्वीतता ही कृषि विभागाकडून झालेली नाही असेही कळविण्यात आल्याचे दिसून येते. परंतु सदरची माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर व राज्य माहिती आयोगाची नोटीस ही दिनांक ४.४.२००८ रोजी निर्गमित केल्या नंतरच उपलब्ध करुन देण्यात आली आहे.सदरची माहिती संबंधीत माहिती अधिकारी यांना त्याच वेळेस उपलब्ध करुन देता आली असती.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे दिनांक २७.१२.२००६ चे अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३ महिन्याचे आंत करावयाची असून तसा निर्णय आयोगास सादर करण्यात यावा.

२) संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व कारण मिमांसा करणारा निर्णय न दिल्यामुळे अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकिद देण्यात येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १७.५.२०८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४६०/२००८**

**१) श्री मधुकर मारोतराव खांडरे**
**रा.पो.ता.जिल्हा गडचिरोली.**
**पंचायत समिती समोर,धानोरा रोड,**
**गडचिरोली.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**समाज कल्याण अधिकारी (गट-अ)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

" आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : १) संस्थेच्या अध्यक्षाने समाज कल्याण अधिकारी जि.प.गडचिरोली यांना दिनांक १६.११.२००६ ला दिलेलया बयानाची प्रत देण्यात यावी. २) अपंग निवासी शाळा वैरागड येथील कर्मचा-यांनी समाज कल्याण अधिकारी यांना दि. १६.११.२००६ ला ३,४ कर्मचा-यांना दिलेल्या बयाणाची प्रती देण्यात याव्या. ३) समाज कल्याण अधिकारी, गडचिरोली यांनी सन १९९९ ते २००१ पर्यंत अपंग निवासी शाळा, वैरागड ला

भेटीअंती आढळलेल्या त्रुटीबाबतच्या अहवालाची प्रती देण्यात यावी. ४) सन १९९९ ते २००१ पर्यंतच्या त्रुटीबाबत संस्थेच्या अध्यक्षांनी हयावर केलेल्या कारवाईचा तपशिल देण्यात यावा. ५) सन १९९९ ते २००१ पर्यंतची अपंग निवासी शाळा, वैरागडची अनुज्ञप्ती फेटाळल्याचे शासनाचे आदेशाची प्रत देण्यात यावी. ६) शासनाने अपंग निवासी शाळा, वैरागडची मान्यता फेटाळल्यानंतर संस्थेच्या अध्यक्षांनी अनुज्ञप्ी मिळविण्याबाबत शासनाकडे काय पाठपुरावा केला याबाबतची संपूर्ण माहिती देण्यांत यावी. ७) अपंग निवासी शाळा, वैरागडचे संस्थेच्या अध्यक्षांनी साप्ताहिक माझा परिसर या पेपरमध्ये अनुज्ञप्ती नसतांना अनुदान तत्वावर मान्यता दि. ८.१२.२००० ला २६ कर्मचारी पदाचे उमेदवारांना दि. १०.१२.२००० ला मुलाखतीसाठी बोलाविले होते. त्याला शासनाची मान्यता होती काय नसल्यास त्यांनी संस्थेच्या अध्यक्षावर काय कार्यवाही केली, याचा सविस्तर तपशिल दयावा. ८) शासनाने अपंग निवासी शाळेतील कर्मचा-यांचे वेतन सन १९९६-१९९९ पर्यंतचे मंजूर केले असता कर्मचा-यांचे पगारातून व्यवसाय कर कपात केल्यानंतरही आजपर्यंत त्यांचा भरणा विक्रीकर कार्यालयात केला नाही, असे ऐकिवात आहे. त्या रक्कमेची अफरातफर केली असल्यास त्याची चौकशी करण्यात यावी. त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे निर्णय दिलेला नव्हता असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सांगण्यात आले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे.

४. द्वितीय अपीलामध्ये भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे सभेत लेखी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे दिनांक ९.१०.२००६ चे सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी मला व मुलीस दिनांक १६.२.२००६ ला दस्तऐवजासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे दालनात उपस्थित

राहाण्याबाबत सूचित केले. परंतु बयाण व रेकार्ड तपासण्यात आले नाही व त्यानंतर दिनांक २३.११.२००६ ला बोलाविले असता माझे व मुलीचे बयाण न घेता सन १९९-२००१ पर्यंत अपंग निवासी शाळेच्या अधिका-यांचे निरिक्षणात काही त्रुटी आढळून आल्यामुळे व संस्थेच्या अध्यक्षाने त्रुटीचे पालन न केल्यामुळे सन १९९९-२००१ पर्यंतची अपंग निवासी शाळेची अनुज्ञप्ती फेटाळण्यात आल्यामुळे आपल्या मुलीचे सन २००१ पर्यंतचा पगार देता येणार नाही असे शासनाचे जी.आर.हातात धरुन समाज कल्याण अधिकारी यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचित केले. शासनाचा जी.आर. फक्त समाज कल्याण अधिकारीच वाचू शकतो इतर अधिकारी वाचू शकत नाही कारण १९९९-२००१ पर्यंत अनुज्ञप्ती फेटाळल्याच्या तारखाच या पत्रासह जोडलेल्या शासन आदेशात नाही. जवळपास ४ वर्षापासून अपंग निवासी शाळेच्या अध्यक्षाचे गैरकारभार व भ्रष्टाचाराबाबत माझे दिनांक २२.५.०३, २.६.२००३, २.१०.२००३, १७.२.२००५, १६.७.२००५ व ७.८.२००६ चे पत्रासह जोडलेल्या पुराव्याचे आधारे आजपर्यंत समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी चौकशी केली नाही. शासनास वरिष्ठ अधिका-यांना रक्कमेच्या व पुराव्याचे विपरित माहिती देवून वरिष्ठ अधिका-यांची दिशाभूल करीत आहे त्यामुळे जि.प. गडचिरोली येथील कोणताही अधिकारी, संस्थेच्या अध्यक्षाच्या गैरकारभर व भ्रष्टाचाराचे चौकशी करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकाराखाली अपील अर्जावर आजपर्यंत माहिती दिलेली नाही. समाज कल्याण अधिकारी, जि.प.गडचिरोली यांनी दिनांक १२.१२.२००६ ला बोगस माहिती दिली. पत्रासह जोडली आहे. करिता या पत्रासह जोडपत्र-क आपणास सादर करण्यात येत आहे. करीता कार्यवाहीस सादर. अशा प्रकारे कारण देवून पुन्हा माहितीच्या अर्जातीलसर्व मुद्दे अपील मेमो मध्ये घेतलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.११.२००६ च्याअर्जामधील मुद्यांच्या संदर्भात दिनांक १२.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये सदर माहिती काल्पनिक स्वरुपाची असल्याने काही मुद्यावरील माहिती उपलब्ध दस्तऐवजावरुन उपलब्ध करुन दिलेली आहे असा खुलासा केलेले आहे. श्री म.मा. खांडरे यांनी वारंवार माहितीच्या अधिकारात या

कार्यालयाकडे अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घेतलेली असताना माहिती अपूरी व चुकीची समजून आपणाकडे अपील दाखल करीत असतात. याच संबंधाने अशाच मुद्यांवर अपील क्रमांक ३८२/००७ वरील सुनावणी दिनांक ४.९.२००७ रोजी आपले समक्ष घेण्यात आली सदर अपिलावर अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) मधील माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे नसल्याने अपील फेटाळण्यात आलेले आहे तरी सुध्दा श्री खंडारे यांनी पुन्हा काल्पनिक स्वरुपाच्या मुद्यांवर अपील दाखल करुन शासनाचा व या कार्यालयाचा वेळ वाया घालविण्याचा प्रयत्न करीत आहेत असा खुलासा सादर केलेला दिसून येतो.

६. सदरच्या खुलाशावरुन अपील क्रमांक ३८२/२००७च्या निर्णयाचे अवलोकन केले असता सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी आतापर्यंत केलेल्या सर्वच अर्जाच्या संदर्भामध्ये उल्लेख आलेला असून सदरचा अर्ज करण्यामागील अंतिम हेतू उघडकीस आलेला आहे व तसे दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमधीला पत्रावरुन दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या मुलीस सदरच्या संस्थेमध्ये नोकरीतून कमी केल्यामुळे तीला नोकरी लावून घेण्याच्या संदर्भात वेळोवेळी अर्जाद्वारे विनंती करुनही काहीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता हे सदरच्या संस्थेच्या संदर्भामध्ये निरनिराळे मुद्दे उपस्थित करुन माहिती मागण्याची अपेक्षा करीत असतात असे दिसून येते. व त्याच कारणास्तव व आतापर्यंत अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील त्यावेळेसही फेटाळले होते व या प्रकरणात सुध्दा अपीलकर्ता यांना आवश्यक असेल ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व इतर मुद्यामधील मागीतलेली माहिती ही अवलोकन केली असता खरोखर काल्पनिक दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील सुध्दा फेटाळण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व पुर्वी सुध्दा त्यांच्या अपील क्रमांक ३८२/२००७ हे माहिती वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व मागीतलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतूदी अन्वये नसल्यामुळे व तसेच मुलीस नोकरीत

सामावून घेत नसल्यामुळे सदरची माहिती मागण्यासाठी अर्ज वारंवार ते करीत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक १७.५.२०८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४६३/२००८**

**१) श्री वल्लभदास दीपचंदजी डांगरा (माहेश्वरी)**
**एल.आय.जी.क्वार्टर नं. एल-अ (५०) मातृकृपा**
**विदर्भ हाऊसिंग बोर्ड, शांतीनगर कॉलोनी,**
**शांतीनगर, नागपूर**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता-१**
**नागपूर गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ,सिव्हील लाईन्स,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२००७रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२००६ रोजी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केला होता असे सांगीतले. सदरच्या अर्जाची प्रत ही आयोगाकडे दाखल केलेली नाही. तसेच स्वत: अपीलकर्ता यांचेकडे पण नाही. तसेच सदरच्या अर्जाची प्रत ही माहिती अधिकारी यांचेकडे नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक १३.३.२००६ रोजी अपीलीय प्राधिकारीजी असे म्हणून स्मरणपत्र निवेदन दाखल केलेले दिसते. त्या पुर्वी सुध्दा दिनांक ३०.१०.२००६ अपीलीय प्राधिकारी असे स्मरणपत्र दाखल केलेले दिसते. दिनांक १८.१२.२००६, २.१.२००७, ७.२.२००७, २३.२.२००७ अशा प्रकारचे अनेक अर्ज त्यांनी दाखल केलेले दिसून येते. परंतु माहितीचा दिनांक १५.२.२००६ चा अर्जाची प्रत मात्र उपलब्ध होईल असे दिसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्या प्रकारची माहिती अपेक्षित आहे त्याकरीता अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगीतले की दिनांक १३.३.२००६ रोजी जे स्मरणपत्र निवेदन दिले आहे त्यासंदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिल्यास दिनांक

१५.२.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्यासारखे होईल व त्यामध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.३.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन हेणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १३.३.२००६ च्या अपीलीय प्राधिकारीजी श्री मुध्याधिकारीजी, नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर यांना १० रुपयाचे तिकिट लावून पुन्हा स्मरणपत्र निवेदन दिलेले परिशिष्ट-क असे लिहीलेले अर्जामध्ये मागीतलेली मुद्येनिहाय माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती उपलब्ध करुन देताना माहिती अधिकारी यांना दिनांक १३.३.२००६ च्या अर्जामधील माहितीचे स्वरुप स्पष्टपणे कळण्याकरीता अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना सहकार्य करावे.

२) अपीलकर्ता यांनी िदनांक १३.३.२००६ च्या अर्जामध्ये कारण मिमांसा मागितली असल्यास सदरचा मुद्या वगळून माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १७.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४६१/२००८**

**१) श्री हिरालाल राजेन्द्रप्रसाद राऊत**
**C/o मुकेशकुमार राऊत, बोंदरे एस.टी.डी. बुथजवळ,**
**आर.पी.एफ बॅरकचे मागे, पार्वतीनगर, नागपूर-४४००२७.**

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव**
**सुवतीदेवी झुनझुनवाला कन्या विद्यालय,**
**गांधीबाग, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका**
**सुवतीदेवी झुनझुनवाला कन्या विद्यालय**
**गांधीबाग, नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.५.२००८ )**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी " श्रीमती अनिता एच. पाल का पगार माह ऑक्टोबर व जानवरी का वेतन विवरण द्यावे अशी माहिती व्यक्तीशः घेणार " असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी आपने दिनांक २६.२.२००७ को अर्जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ के अंतर्गत दिया था. किंतु शिक्षण संस्था उपरोक्त माहितीचा अधिकार अधिनियम २००५ के तहत नही आता है. इसलिए आपकी अर्जी विचाराधीन नही है. असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी संस्थेचे सचिव यांचेकडे प्रथम अपील

दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक २९.३.२००७ रोजी आपने वेतन प्रमाण पत्र का हेतू न्यायालयीन प्रक्रिया के लिए प्राप्त करना दर्शाया है एसलिए आप न्यायालयीन प्रक्रिया द्वारा हासिल कर सकते है. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ का गलत उल्लेख किया है जबकि महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००२ का है. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ के तहत आपको उपरोक्त जानकारी नही दी जा सकती है कारण कि उपरोक्त महाराष्ट्र माहितीच अधिकार नियम २००२ शिक्षण संस्था को लागू नही होता है व जिस तरह की जानकारी आप प्राप्त करना चाहते है वह माहितीचा अधिकार नियम २००२ के तहत वैसे भी नही आती है. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी ज्या सुवतीदेवी झुनझुनवाला कन्या विद्यालय याचे मुख्याध्यापक यांना माहिती मागीतली त्यांना सदरच्या विद्यालयास शासकिय अनुदार मिळते किंवा नाही असे विचारले असता त्यांना शासकिय अनुदान मिळते असे सांगीतले व त्यामुळे अधिनियमाच्या कलम २ मधील सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येमध्ये सदरचे विद्यालय हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे सदरचा अधिनियम हा लागू असून माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक ठरते.

४. अपीलकर्ता यांनी माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील व तसेही श्रीमती अनिता पाल यांच्या वेतनाबध्दल माहिती मागीतली आहे व सदरची माहिती ही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे न्यायालयात सादर सुध्दा केलेली आहे व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत असु नये व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती त्यांनी माहितीचा खर्चाचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील हे

अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सदरची माहित त्यांनी माहितीचा खर्चाचा भरणा केल्यानंतर व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १७.५.२००७**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४१०/२००८**

**१) श्री मती शुध्दलेखा असोक रामटेके**
**C/o रत्नाकर दारोडकर, मु.पो. पालांदूर (चौ.)**
**ता. लाखनी, जिल्हा भंडारा.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**जिल्हा परिषद, भंडारा**

**३) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, पालांदूर (चो.)**
**ता. लाखनी, जिल्हा भंडारा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून प्राथमिक आरोग्य कैद्र, पालांदूर यांचेकडे माहिती मागीतली. तसेच दिनांक ६.७.२००६ रोजी सुध्दा तीच माहिती त्यांनी मागीतली होती. दिनांक ६.७.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ११८४/२००७ चा निर्णय दिनांक १२.३.२००८ रोजी दिलेला असून त्यांना त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे असे त्यांनी सांगीतले. परंतु माहिती उपलब्ध न झाल्यामुळे आर्थिक व मानसिक त्रासाबध्दलच्या नुकसान भरपाई मिळण्याबाबत त्यांनी अर्ज केलेला आहे. सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नसल्यास जर नुकसान झालेले असल्यास नुकसान भरपाई मिळते. परंतु माहिती उपलब्ध करुन घेण्यास प्रथम अपील/द्वितीय अपील करावे लागल्यास

त्याबध्दल मात्र कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अर्जाचा विचार करता येत नाही. तसेच त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २०.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५००/२००८**

**१) श्री राजेंद्र भाष्कर शेळके**
**मु.पो. पेठ ता. चिखली, जिल्हा बुलढाणा.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**४. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.चिखली,**
**जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" **आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : १) जिल्हा परिषद, बुलढाणा अंतर्गत ११ वा वित्त आयोग निधीमधून प्रत्येक तालुकानिहाय १) सन २००३-०४ २) सन २००४-०५ ३) सन २००५-०६ नुसार प्रत्येक वर्षनिहाय बांधण्यात आलैल्या स्मशानभुमी बाबतची गावानुसार तालुका यादी मिळणे बाबत.

२) जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सन २००३ ते सन २००६ पर्यंतच्या बांधण्यात आलेल्या मंजूर केलेल्या म्मशानभूमी बांधकाम निहाय जिल्हा परिषदेने मंजुर केलेला स्मशानभुमी बांधकाम प्लॅन व इस्टीमेट च्या छायांकित सत्यप्रति मिळणेबाबत

३) जिल्हा परिषद, बुलढाणा अंतर्गत सन २००३ ते सन २००६ पर्यंत प्रत्येक तालुक्यात बांधण्यात आलेल्या स्मशान भुमीचे आराखडयानुसार रंगीत छायाचित्र प्रती मिळणे बाबत.

४) स्मशान भुमी बांधकामाचे जबाबदार ग्रामसेवक यांचे स्मशानभुमी बांधकामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

५) ११ वा वित्त आयोग मधून मौजे धोडप येथील स्मशानभुमी बांधकाम बाबत श्री नारायण पिराजी कोल्हे यांनी केलेल्या तक्रार निवेदनाची छायांकित प्रत मिळणे बाबत.

६) मौजे धोडप येथील स्मशानभुमी बांधकाम बाबत श्री नारायण पिराजी कोल्हे यांनी केलेल्या तक्रारीबाबत केलेल्या चौकशी अहवालाची छायांकित सत्यप्रत व पुराव्यादाखल घेतलेल्या बयाणाच्या तसेच स्थळ निरीक्षण टिपणीच्या छायांकित सत्यप्रति मिळणे बाबत.

७) मौजे धोडप येथील स्मशानभुमी बांधकाम बाबत श्री नारायण पिराजी कोल्हे यांनी केलेल्या तक्रारीवरुन दोषी अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली त्याबाबतची आदेशांच्या छायांकित सत्यप्रती मिळणेबाबत.

८)महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पंरासा-२००५/प्र.क्र.२६२/पं.रा-३/मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि. ३ सप्टेंबर २००५ परिपत्रकानुसार केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल प्रत मिळणे बाबत."

३. तसेच दिनांक ४.१०.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चिखली यांचेकडे सुध्दा खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" **आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : १) जिल्हा परिषद, बुलढाणा अंतर्गत ११ वा वित्त आयोग निधीमधून पंचायत समिती चिखली अंतर्गत १) सन २००३-०४ २) सन २००४-०५ ३) सन २००५-०६ नुसार प्रत्येक वर्षनिहाय बांधण्यात आलैल्या स्मशानभुमी बाबतची गावानुसार तालुका यादी मिळणे बाबत.

२) जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सन २००३ ते सन २००६ पर्यंतच्या बांधण्यात आलेल्या मंजूर केलेल्या म्मशानभूमी बांधकाम प्लॅन व इस्टीमेट च्या छायांकित सत्यप्रति मिळणेबाबत

३) स्मशान भुमी बांधकामाचे जबाबदार ग्रामसेवक यांचे स्मशानभुमी बांधकामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्राच्या प्रति मिळणे बाबत.

४) जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सन २००३ ते २००६ पर्यंत पंचायत समिती चिखली अंतर्गत प्रत्येक गावात बांधण्यात आलेल्या स्मशानभुमीचे आराखडयानुसार रंगित छायाचित्र प्रती मिळणे बाबत.

५) ११ वा वित्त आयोग मधून मौजे धोडप येथील स्मशानभुमी बांधकाम बाबत श्री नारायण पिराजी कोल्हे यांनी केलेल्या तक्रार निवेदनाची छायांकित प्रत मिळणे बाबत.

६) मौजे धोडप येथील श्री नारायण पिराजी कोल्हे यांनी केलेल्या स्मशानभुमी बांधकाम तक्रारी बाबत केलेल्या तक्रारीबाबत केलेल्या चौकशी अहवालाची व पुराव्यादाखल घेतलेल्या बयाणाच्या तसेच स्थळ निरीक्षण टिपणीच्या छायांकित सत्यप्रति मिळणे बाबत.

७) मौजे धोडप येथील स्मशानभुमी बांधकाम बाबत श्री नारायण पिराजी कोल्हे यांनी केलेल्या तक्रारीवरुन दोषी अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली त्याबाबतची आदेशांच्या छायांकित सत्यप्रती मिळणेबाबत.

८)महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पं.रा-३/मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि. ३ सप्टेंबर २००५ परिपत्रकानुसार केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल प्रत मिळणे बाबत."

४. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१०.२००६ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी अपीलकर्ताय यांना विषयांकित प्रकरणी आपण संदर्भिय अर्जाप्रमाणे मागितलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद स्तरावरील मुद्या क्रमांक १, ५, ६, ७ या सोबत पाठविण्यात येत आहे. तसेच उर्वरित मुद्या क्रमांक २,३,४ च्या माहितीबात आपण संबंधीताकडे मागणी करुन उपलब्ध करुन घ्यावी व सोबत सहपत्र पाठविलेले दिसून येतात. तसेच दिनांक ४.१२.२००६ रोजी गट विकास अधिकरी, पंचायत समिती, चिखली यांनी उपरोक्त संदर्भिय अर्जाप्रमाणे मागीतलेल्या माहितीच्या अनुषंगाने ११ वा वित्त आयोग निधी मधून सन

२००३ ते ०४ ते ०५-०६ पर्यंत बांधण्यात आलेल्या कामाबाबतची माहिती यासोबत पाठविण्यात येत आहे तसेच प्लॅान इस्टिमेट व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र ग्राम पंचायतीशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी. सहपत्र कामाची यादी दिलेली आहे. परंतु सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.११.२००६ रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००६ रोजी जी माहिती मागीतलेली आहे ती माहिती ही जिल्हा परिषद तसेच पंचयायत समितीशी संबंधीत असल्यामुळे दिनांक ३१.१०.२००६ रोजी जिल्हा परिषद संबंधीत माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली व तीच माहिती त्यांनी पंचायत समिती, चिखलीकडे सुध्दा मागीतली असल्याचे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती मोघम स्वरुपाची असून निश्चित अशा सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागितलेली दिसून येत नाही. जिल्हा परिषद जसे सार्वजनिक प्राधिकरण आहे तसेच पंचायत समिती हे पण सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्या त्या स्तरावरील माहिती त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागणे हे अधिनियमाच्या तरतूदींशी सुसंगत असते व तशा प्रकारे माहिती मागितलेली नसल्यास व एकाच अर्जात वेगळया प्राधिकरणाच्या संदर्भात माहिती मागितली असल्यास ३० दिवसात उपलब्ध होऊ शकतात असे नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांची तक्रार जी विलंबाने माहिती उपलब्ध झाली आहे त्याचा विचार करता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून माहिती मागितल्यानंतर प्रथम अपील दाखल केले नाही. व त्यामुळेही अपीलकर्ता यांनी अधिनियमांच्या तरतूदींचे पालन केलेले दिसून येत नाही.

६. गट विकास अधिकारी पंचायत समिती, चिखली यांनी जी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे त्याकरीता त्यांचे असे म्हणणे आहे की, ती माहिती त्यांना संकलीत करावी लागली व संकलीत केल्या नंतरच ती उपलब्ध करुन दिल्यामुळे विलंब झाला आहे. सदरची माहिती ही ग्राम पंचायत कडून संकलीत करावी लागली व त्यामुळे विलंब झाला आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

७. अशाप्रकारे अपीलकर्ता यांना त्यांच्या दोनही अर्जप्रमाणे संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दोनही अर्ज एकाच तारखेस दोन सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेले असल्यामुळे व त्यातही एका अर्जाच्या संदर्भात प्रथम अपील दाखल केलेले नसल्यामुळे व दोनही अर्जाच्या संदर्भात एकच द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नसल्यामुळे खरीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपील दाखल न करता दोनही अर्जाच्या संदर्भात एकच द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे सदरचे अर्ज हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २०.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४५२/२००८**

**१) श्री रामदास जैराम मेश्राम**
**रा. इंदोरा झोपडपटटी (मायानगर)**
**ठवरे नगर कॅालनी जवळ, पोस्ट जरीपटका, नागपूर-१४ — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, उमरोड, ता. उमरेड**
**जिल्हा नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिल कार्यालय, कुही, ता. बुटी, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे खुलासा व कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुही यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"पाहिजे असलेली कागदोपत्रसहित आवश्यक माहिती : १) फेर फार पत्रक नोंदणी क्रं. ९० हे दस्ताऐवज तयार करण्यापूर्वी आ.सह.दिवाणी न्यायाधीश, कुही यांचे दि. ३.८.९१ चे आदेशातील शर्त व अट क्रमांक ५ आणि ६ नुसार मा. जिल्हाधिकारी साहेब, नागपूर किंवा संबंधित सक्षम असलेले शासकीय अधिकारी यांचेकडून आपणार्तु लेखी परवानगी घेण्यात आली काय? आणि तशाप्रकारे मा. जिल्हाधिकारी साहेब किंवा संबंधित शासकीय अधिकारी यांचेकडून परवानगी देण्यात आली काय?

२) फेर फार पत्रक नोंदणी क्रं. ९० या दस्ताऐवजात दिवाणी दावा क्रमांक १८८/७५ व ६४/८९ मधील मुळ प्रतिवादी नं. २ श्रीमती भागीरथाबाई ज. शिवराम मेश्राम हिच्या नावाची नोंद कां घेण्यात आली नाही?

३) फेर फार पत्रक नोंदीणी क्रं. ९० हे दस्ताऐवज तयार करण्यापुर्वी दिवाणी दावा क्रमांक १८८/८५ व ६४/८९ मधील मुळ प्रतिवादी नं. १ श्री जैराम फदलू मेश्राम यांना लेखी सुचना म्हणून कायदेशीर व नियमशीर असलेले नोटीस कायदेशीर व नियमशीर पध्दतीने देण्यांत आले किंवा नाही आणि देण्यात आले असेल तर त्यावर नोटीस मिळाली म्हणून संबंधितांची सही आहे किंवा नाही. तसेच कोणत्या ठिकाणच्या सूचना फलकावर कोणत्या तारखेला नोटीलस लावण्यात आली इत्यादी नोटीसा संबंधात कागदोपत्रासहीत सविस्तर माहिती.

४) फेर फार पत्रक नोंदणी क्रं. १०० हे दस्ताऐवज मा. तहसीलदार, कुही यांचे दि. १८.३.९२ चे आदेशान्वये मंजूर करण्यांत आले आणि सदर आदेश मंजूर करण्यापूर्वी परंतु सर्व्हे नं. ३०० पैकी ३००:३ या नंबरच्या शेतजमिनीची विक्री करण्यापुर्वी सदर सर्व्हे नंबरची शेती विकणा-यांनी आ.सह दिवाणी न्यायाधीश कुही आणि मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून शेती विक्री संबंधात लेखी परवानगी घेतली होती किंवा नाही.

५) फेर फार पत्रक नोंदणी क्रमांक १०१ दिनांक ७.१.९२ ला तयार करण्यांत आले आणि याच तारखेला मा. तहसिलदार कुही यांचेकडून सदर फेर फार पत्रक क्रमांकाला मंजूरी प्रदान करण्यांत आली. परंतु दिवाणी दावा क्रमांक १८८/८५ व ६४/८९ मधील मुळ प्रतिवादी नं. २ श्रीमती भागीरथाबाई ज. शिवराम मेश्राम ही दिनांक ८.३.९२ पर्यंत जीवंत असतांना देखील तिच्या नावाची नोंद फेर फार पत्रक नोंदणी क्रमांक १०१ या दस्ताऐवजात कां घेण्यात आली नाही?

६) फेर फार पत्रक नोंदणी क्रमांक १०१ दिनांक ७.१.९२ ला तयार करण्यांत आली आणि याच तारखेला मा. तहसिलदार, कुही यांचेकडून सदर फेर फार पत्रक क्रमांकाला मंजूरी प्रदान करण्यात आली आणि वारसान खातेदार म्हणून सौ.कान्ताबाई ज. पुरुषात्तम चव्हाण, राहणार कामठी हिचे नावाची नोंद सदर फेर फार पत्रकात घेण्यात आली. परंतु तिचे नावाची नोंद घेण्यापुर्वी हिन्दू एकत्र कुटूंब अधिनियम व हिन्दु वारसान अधिनियम चे नुसार कायदेशीर

वारसान म्हणून तित्याकडून कोणत्या प्रकारचे कायदेशीर व नियमशीर कागदपत्रे आपणा समक्ष दाखल करण्यात आले त्या संबंधात कागदोपत्रासहित माहिती.

७) आ.सह दिवाणी न्यायाधीश, कुही यांचे दिनांक २७.८.९८ चे अनुषंगाने विचार केल्यास दिवाणी दावा क्रं. ६४/८९ मधील मुळ वादी श्रीराम फदलु मेश्राम यांना कोणीही कायदेशीर वारसान बहिन नाहीत असे सिध्द होते याशिवाय मा. तहसीलदार, कुही यांचे समक्ष श्रीराम फदलु मेश्राम यांनी दि. २०.८.९१ ला अर्ज दाखल केला. त्या अर्जात देखील त्यांनी आपले स्वतःच्या वारसानाची नावासहीत माहिती नमूद केली नाही. यावरुन देखील श्रीराम फदलु यांना कोणीही कायदेश्ीर वारसान नाहीत असे सिध्द होते. याशिवाय दिवाणी दावा क्रमांक २२३१/२००० हे प्रकरण आ. सह दिवाणी न्याधीश, वरिष्ठ स्तर, नागपूर यांचेसमक्ष जानेवारी, २००६ पर्यात प्रलंबित असतांना श्रीराम फदलु यांचे वारसदारांनी आपले नावाची नोंद आ. कोर्टाच्या रेकॉर्डवर घेतली नाही यावरुन देखील श्रीराम फदलु यांना कायदेशीर वारसान नाहीत असे सिध्द होते आणि या प्रकरणात स्वतःच मा. तहसीलदार कुही व मा. ग्राम अधिकारी तथा तलाठी हे प्रतिवादी आहेत. तरी देखल फेर फार पत्रक नोंदणी क्रमांक २८४ हे दस्ताऐवज २.६.०३ ला तयार करण्यात आले आणि दिन. ३०.६.०३ ला मा. तहसीलदार कुही यांचेकडून मंजूर करण्यात आले आणि त्यानुसार या दस्ताऐवजात सौ. संगीता नामदेव उके, राहाणार नागपूर हिच्या नावाची एका साध्या पेपरवर लिहीलेले अर्ज आणि त्या अर्जावर बोगस व बनावटभ असलेली सही असलेल्या अर्जाच्या व नागपूर महानगर पालिकेच्या मृत्यूच्या प्रमाणपत्राच्या आधाराने सदर्हु फेर फार पत्रकात नोंद घेण्यात आली. परंतु या व्यतिरिक्त सौ. संगीता ज. नामदेव उके हिचे नावाची सदर्हु फेर फार पत्रकात नोंद घेण्यापुर्वी हिन्दु एकत्र कुटूंब अधिनियम व हिन्दू वारसान अधिनियम चे नुसार कायदेशीर वारसान म्हणून तिच्याकडून कोणत्या प्रकारचे कायदेशीर व नियमशीर कागदोपत्रे आपणासमक्ष दाखल करण्यात आले त्या संबंधसात कागदोपत्रासहीत माहिती.

८) फेर फार पत्रक क्रमांक २८४ हे दस्ताऐवज तयार करण्यापूर्वी दिवाणी दावा क्रं.२२३१/२००० मधील मुळ यादी नं. १ व अर्जदार यांना कायदेशीर व नियमशीर पध्दतीने नोटीस कां देण्यात आली नाही या संबंधात कागदोपत्रासहित माहिती. "

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करण्यात आले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी उपविभागीय कार्यालय, उमरेड यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.९.२००६ रोजी देण्यात आलेला असून सदरच्या निर्णयामध्ये अपीलार्थीनी दिनांक १३.९.२००६ रोजी अपील प्रकरणात निवेदन देवून त्यांच्यापुढे १ ते ५ मुद्यांबाबतची माहिती त्यांना दिल्यास ती स्विकार करण्यास तयार असल्याची माहिती आहे किंवा माहिती अधिकारी यांनी त्यांना अपीलार्थी यांचे दिनांक १३.९.२००६ च्या निवेदनाप्रमाणे त्यांच्याशी स्वतः चर्चा करुन व अपीलार्थी याची माहिती मोघम असल्यास सर्व महसुली अभिलेखे त्यांना दाखवून त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरवावी असे याद्वारे आदेशीत करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.१.२००७ रोजी कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्याबध्दलची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.७.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात मागीतलेली सदरची ८ मुद्याच्या संदर्भामध्ये त्यांच्या ७ मुद्यांमध्ये जी माहिती आहे त्या माहिती मध्ये दिलेल्या निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामधील कारण त्यांनी विचारलेले आहे. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये अभिप्राय अपेक्षित नाहीत व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्या संदर्भामध्ये कागदपत्राच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल तीच माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकते व त्याप्रमाणे दिनांक ५.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत व त्याबध्दलची सुध्दा पोच त्यांनी दिलेली दिसून येते.

५. अपीलकर्ता यांना प्रामुख्याने सदरच्या नोंदीच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये तक्रार दिसून यते. सदरच्या फेर फार नोंदीच्या संदर्भामध्ये जर तक्रार असेल तर ती महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ प्रमाणे त्यांनी सक्षम अधिका-यांकडे तक्रार करुन सदरच्या नोंदीच्या बध्दल न्याय मिळवून घेता येईल. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ५.१.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध झाली आहे ती त्यांच्या दिनांक १७.७.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु, दिनांक १७.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे सदरची माहिती ३० दिवसांत उपलब्ध कां करुन दिली नाही याबध्दल तत्कालीन तहसिलदार यांनी प्रथम अपीलाची सुनावणी मध्ये सांगितल्याप्रमाणे व निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी वेळोवेळी माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुही यांचेकडे दिनांक १३.७.२००५, २६.७.२००५, २९.८.२००५, १२.२.२००६, २२.५.२००६ व ११.७.२००६ रोजी त्याच संदर्भाबध्दल माहिती मागितली व त्यांना ती वेळोवेळी पुरविण्यात आली आहे व त्या माहितीच्या बध्दलची पोच सुध्दा प्राप्त झाली आहे असे सांगितलेले दिसून येते.व त्यामुळे त्याच संदर्भातील माहिती ही दिनांक १७.६.२००७ च्या अर्जाच्या माध्यमातून मागितलेली असल्यामुळे ती उपलब्ध करुन दिली नसावी असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्याप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक १७.७.२००६ च्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहिती त्यांना पुर्वीच उपलब्ध करुन देण्यात आलेली असावी व म्हणूनच त्यांनी प्रश्न उत्तराच्या स्वरुपात सदरची माहिती पुन्हा मागितलेली दिसून येते व त्यामुळे सदरची माहिती त्यांना नाकारलेली नाही, माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही, असा निष्कर्ष काढता येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही वेळोवेळी उपलब्ध झालेली असून दिनांक ५.१.२००७ च्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती प्राप्त झालेल्या असल्यामुळे व त्याची पोच त्यांनी दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.
२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २१.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४४७ /२००८**
**अपील क्रमांक १४४८ /२००८**
**अपील क्रमांक १४४९ /२००८**
**अपील क्रमांक १४५० /२००८**

**१) श्री  दिपक जगन्नाथ गुल्हाणे,**
**२०, नियोगी भवन, धंतोली, नागपूर-१२.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**(मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) म.रा. नागपूर**
**वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा वनसंरक्षक(मानव संसाधन विकास)**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक म.रा.नागपूर यांचे कार्यालय वनभवन,**
**सिव्हील लाईन, नागपूर.** **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक १४४९/२००८</u>**

**४) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक प्रशासन (वन्यजीव)**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक म.रा.नागपूर यांचे कार्यालय वनभवन,**
**सिव्हील लाईन, नागपूर**

**५) जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (सर्व्हेक्षण व संनियंत्रण)**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक म.रा.नागपूर यांचे कार्यालय वनभवन,**
**सिव्हील लाईन, नागपूर.**

**<u>अपील क्रमांक १४५० /२००८</u>**

**६) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नागपूर.**

**७) जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)**
**नागपूर वनवृत्त, नागपूर, शासकिय मुद्रणालय जवळ, नागपूर.**

**( आदेश पारित दिनांक २२.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केली आहे.

सदरच्या चारही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. **अपील क्रमांक १४४७/२००७** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी , प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा.नागपूर यांचे कार्यालयकडे "उपवनसंरक्षक श्री झुरमुरे व मुख्य वन संरक्षक श्री सूद यांनी एकमेकावर लावलेल्या आरोबाबत. माहितीचा कालावधी- सन २००५ व २००६. १) उवस नागपूर पत्र क्रं.२३१२ दि. २४.३.२००६ २) मुवसं (वजी) नागपूर यांचे पत्र क्रं. १०९ दिनांक १०.८.२००६ ३) मुवसं (प्रा) नागपूर यांचे पत्र क्रं. ६९३ दिनांक २८.८.२००६ तसेच यासंबंधीत मंत्रालय इतर कार्यालयाशी झ ालेला पत्र व्यवहार . व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. " सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ४.११.२००६ रोजी वन संरक्षक ((मासंवि) तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपवनसंरक्षक, नागपूर यांचे क्रमांक २३१२, दिनांक २४.३.२००६ व मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचे पत्र क्रं. १०९, दिनांक १०.८.२००६ तसेच ममाक ३९३, दि. २८.८.२००६ च्या पत्रांच्या प्रती व या संबंधात मंत्रालय व इतर कार्यालयाशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती या कार्यालयास प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नसल्याने सदरच्या पत्राच्या प्रती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. तरी संबंधीत कार्यालयातील माहिती अधिकारी यांचेकडे आपण अर्ज सादर करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.११.२००६ रोजी मा. अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (प्रशासन) तथा अपीलीय अधिकारी यांचेकडे चुकीची कारणे देवून माहिती नाकारल्याने प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.१२.२००८ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या पत्रांच्या संदर्भामध्ये वेगवेगळी कार्यालय असल्यामुळे त्या कार्यालयातील माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती मागण्याच्या संदर्भामध्ये त्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. तसेच नमूद पत्रांच्या व्यतिरिक्त उपरोक्त माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांचेकडून संबंधीत पत्रव्यवहाराचा संदर्भ देणे अपेक्षित आहे व त्याशिवाय माहिती पुरविणे माहिती अधिका-यास शक्य नव्हते असे स्पष्टपणे दिसून येते, असा निर्णय देवून

त्या त्या माहिती अधिका-यांकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच वनसंरक्षक (मासंव्य) तथा माहिती अधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय यांनी अपीलकर्ता यांच्या मुळ अर्जाची प्रत वरील पत्राच्या ५ प्रमाणे संबंधीत माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (३) च्या तरतूदी अन्वये ५ दिवसांच्या आंत पाठवावी व त्या संबंधात अपीलकर्त्यास कळवावे, अपीलकर्ता यांनी इतर पत्रव्यवहाराच्या बाबत मोघम स्वरुपाचा उल्लेख केल्यामुळे त्यांना माहिती पुरविणे शक्य नव्हते व याबाबत माहिती अधिकारी यांना कोणतेही निर्देश सद्यस्थितीत देणे आवश्यक नाही, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**३.** अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही याबध्दल त्यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती ही त्यांनी मागितलेल्या कार्यालयातच उपलब्ध आहे. परंतु, त्याबाबत मात्र त्यांनी लेखी पुरावा दिलेला नाही. माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज त्यांच्याकडे आल्यावर त्यांनी पर्यवेक्षक अधिकारी कक्ष-१० यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्रव्यवहार केलेला होता. व त्यांनी दिनांक ९.१०.२००६ रोजी पर्यवेक्षक अधिकारी कक्ष-७ यांना असे कळविलेले दिसून येते की, वर नमूद उपवनसंरक्षक, नागपूर व मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांच्याकडील पत्र या कार्यासनास प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नसल्याने सदर पत्राची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे यावर मंत्रालय व इतर कार्यालयाशी या कार्यासनाकडून पत्रव्यवहार करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तरी याबाबत कृपया संबंधीत अर्जदारास कळविण्यात यावे. व दिनांक ४.११.२००६ रोजी कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना माहितीच्या अर्जात मागितलेली दोनही पत्रे क्रमांक २३१२ व १०९ याची प्रत अन्यथा उपलब्ध झालेली आहे. परंतु, पत्र क्रमांक ६९३, दिनांक २८.८.२००६ ची प्रत त्यांना उपलब्ध झाली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी सदरच्या पत्राची प्रत ही विभागीय वन अधिकारी (नियोजन) तथा माहिती अधिकारी यांचेकडे सुध्दा माहितीच्या अधिकारात मागितलेली आहे व अन्य दोन पत्रांच्या प्रती सुध्दा त्यांच्याकडे त्यांनी मागितलेल्या

आहेत. व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये सदरच्या पत्रव्यवहाराच्या प्रती उपलब्ध आहे. व तसे असल्यास अपीलकर्ता यांनी संबंधीत कार्यासनाकडील दस्तऐवज किंवा अभिलेखे यांचे निरीक्षण करुन त्यांना आवश्यक असलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. **<u>अपील क्रमांक १४४८/२००७</u>** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००६ रोजी माहे मे, २००४ ते आद्यापपर्यंतच्या कालावधीतील बदली, पदस्थापना, निलंबन, बडतर्फी बाबत झालेला पत्रव्यवहार. माहिती ही व्यक्तीशः आवश्यक आहे असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा वन संरक्षक (मासंवि) यांनी बदली व पदस्थापना संबंधात पत्रव्यवहाराच्या प्रती पुरविण्यासाठी तयार असून त्याकरीता शुल्क रुप्ये १२/- मनिऑर्डर किंवा या कार्यालयात जमा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच निलंबन संबंधीच्या माहितीकरीता शासकिय माहिती अधिकारी, नागपूर वनवृत्त यांचेकडे अर्ज करण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००६ रोजी पुन्हा शासकिय माहिती अधिकारी तथा वन संरक्षक यांचेकड मागितलेली माहिती तात्काळ पुरवावी म्हणून अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाप्रमाणे व दिनांक ४.८.२००६ च्या पत्राच्या संबंधात दिनांक २७.६.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने " संदर्भिय पत्रान्वये बदली व पदस्थापना संदर्भात माहिती पुरविण्यता आलेली आहे, उर्वरित माहिती संबंधीत कक्षाकडून उपलब्ध करुन देण्यात न आल्याने उर्वरित माहिती आपल्याला पुरविणे शक्य होणार नाही असे दिनांक १३.१०.२००६ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. दोनही पत्राच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक १६.११.२००६ रोजी मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) तथा अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.१२.२००६ रोजी देण्यात आलेला असून वन संरक्षक (मा.सं.वि)

तथा माहिती अधिकारी प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कार्यालय यांनी नागपूर (प्रादेशिक) वृत्ताच्या माहिती अधिका-यास न पाठविता तसेच पत्र दिनांक १३.१०.२००६ अन्वये अपीलकर्ता यांस असे कळविले की, उर्वरित माहिती संबंधीत कार्यासनाकडून उपलब्ध करुन देण्यात न आल्याने उर्वरित माहिती आपणास पुरविण्ता येणे शक्य नाही " व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे , अशा प्रकारे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ८.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा वनसंरक्षक यांनी " श्री गुल्हाणे,तत्कालीन वनपरिक्षेत्राधिकारी, हिंगणी यांचे विरुध्दच्या विभागीय चौकशी प्रकरणी आवश्यक दस्ताऐवज शासनास सादर करण्यात आलेला असून त्याप्रकरणी निर्णय न झाल्याने सदर पत्राची प्रत पुरविणे योग्य होणार नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रकरणी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री गुल्हाणे यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रकरण सुरु असल्यामुळेच व शासनाकडे सादर झालेले असल्यामुळेच त्यांना सदरच्या पत्राची प्रत पुरविता येणे शक्य होणार नाही, असे कळविले. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना निलंबनाचे संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तर ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. निलंबनाच्या संदर्भामध्ये आज माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील हे अंशता मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>५. अपील क्रमांक १४४९/२००७</u> :** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००६ रोजी मेसर्स बायोगिनी इंअरनॅशनल भारसिंगे प्रकरणाबाबत. माहितीचा कालावधी-सन २००५ व २००६ १) प्रधान मुख्य सनसंरक्षक वन्यजीव कार्यालयाद्वारे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक.)नागपूर व उपवनसंरक्षक नागपूर यांचेशी झालेला संपूर्ण पत्र व्यवहार. २) श्री अशोक शर्मा मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) व उपवनसंरक्षक (प्रादेशिक) मुख्य वनसंरक्षक नागपूर (प्रादेशिक) यांनी केलेला चौकशी अहवाल. ३) यासंबंधी शासनाशी झालेला संपूर्ण पत्र व्यवहार. माहिती व्यक्तीशः आवश्यक आहे असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक

९.११.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (सर्वेक्षण व संनियंत्रण) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांचे कार्यालय यांनी अपीलकर्ता यांना मेसर्स बायोगिरी इंटरनॅशनल, नागपूर संबंधीत माहिती मागितली होती. सदर माहिती माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलम ८ (ह) नुसार माहिती देता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.११.२००६ रोजी दिलेला असून " अपीलकारी श्री दिपक गुल्हाणे यांनी दाखल केलेल्या अपीलावर विचार करण्याकरीता खालील स्वाक्षरी करण्या-याद्वारे त्यांचे पत्र क्रमांक २२(४)३१०३ दिनांक २१.११.२००६ अन्वये माहिती अधिकारी श्री एस.व्ही. अल्लूरवार यांना विचारणा करण्यात आली असून त्यांनी पत्र क्रमांक कक्ष-२३(३)/३१८९/२००६-०७ दिनांक २९ नोव्हेंबर, २००६ अन्वये मेसर्स बायोगिनी इंटरनॅशनल नागपूर यांनी केलेला भारशिंगाचा व्यापार अवैध असून त्यामध्ये प्रस्तुत प्रकरणातील अपीलकारी यांचा सहभाग आढळून आल्याचे नमूद केले आहे.

६. या संदर्भात माहिती अधिकारी श्री एस.व्ही. अल्लूरवार यांचेकडून प्राप्त दस्ताऐवजाची छाननीवरुन असेही स्पष्ट होते की, सदरहू अवैध व्यापाराचे संदर्भात वरिष्ठ स्तरावर चौकशी तसेच कायदेशीर कार्यवाही सुरु आहे. करीता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (ज) माहिती अधिकारी यांचे पत्र दिनांक ९.११.२००६ मध्ये कलम ८ (ह) नमूद करण्यात आले आहे. नुसार अपीलकारी श्री दिपक ज. गुल्हाणे यांनी खालील स्वाक्षरी करणा-याकडे सादर केलेला अपील अर्ज दिनांक १६.११.२००६ मान्य करता येत नाही " असा निर्णय दिलेला असून माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

७. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय स्वयंस्पष्ट आहे. अपीलकर्ता यांची विभागीय चौकशी सुरु असल्याने तसेच मेसर्स बायोगिनी इंटरनॅशनल यांची सुध्दा चौकशी जरी सुरु असला तरी त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचा सहभाग असेल तर त्याबाबत माहिती उपलब्ध करुन देणे हे

चौकशीचा निकाल होईपर्यंत योग्य नाही, असा जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय योग्य आहे. अधिनियमाचे कलम ८ (१) मध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास अपवाद करण्यात आलेले आहेत. सदरच्या अधिनियमाच्या कलम १ (८) मधील (एच)(ज) " ज्या अपराध्याचा तपास करणे किंवा त्याला अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियेमध्ये अडथळा येईल अशी माहिती " अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. यामध्ये अपराध्याचा तपास करणे किंवा खटला दाखल करणे या प्रक्रियेमध्ये चौकशी सुरु असते व या चौकशीच्या प्रक्रियेमधील कोणत्याही प्रकारची माहिती ही उपलब्ध करुन दिल्यास ज्या व्यक्तीविरुध्द ही चौकशी सुरु असते ती व्यक्ती त्या प्रक्रियेत अडथळा आणू शकते किंवा उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग करुन अडथळा आणू शकते. कोणत्याही प्रकरणात तपास पूर्ण झाल्याशिवाय किंवा खटला दाखल करण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देणे हे योग्य नसल्यामुळे सदरचा निर्णय माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे तो योग्य आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, चौकशी अहवाल हा शासनास सादर झालेला असून त्याबध्दलची माहिती उपलब्ध करुन न दिल्यास चौकशी अहवाल हा निर्णयाशिवाय प्रलंबित राहू शकतो व त्याकरीता त्या चौकशी अहवालाची माहिती उपलब्ध करुन देणे हे त्यांच्याकरीता आवश्यक आहे. परंतु, चौकशी अहवाल जोपर्यंत अंतिमतः मान्य करुन प्रसिध्द होत नाही तोपर्यंत ती प्रक्रिया अपूर्ण आहे असे समजले जाते. व त्यामुळे सुध्दा त्या चौकशी अहवालातील माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे हे शक्य होणार नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांची विनंती अंशतः मंजूर करण्यात येवून जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या चौकशी अहवालाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होत असल्यास ती करुन द्यावी किंवा अपीलकर्त्याची सदरची चौकशी झाली असल्यास कार्यवाहीच्या संदर्भामध्ये माहितीच्या अधिकारात माहिती मागविणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

८.     **<u>अपील क्रमांक १४५०/२००७</u> :** मध्ये अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ३०.९.२००६ रोजी विभागीय वन अधिकारी (नियोजन) तथा शासकिय माहिती अधिकारी यांचेकडे उपवनसंरक्षक श्री झुरमुरे व मुख्य वन संरक्षक श्री सूद यांनी एकमेकावर लावलेल्या आरोपाच्या बाबत. कालावधी सन २००५-२००६. १) उवसं नागपूर पत्र क्रं. २३१२ दि. २४.३.२००६ २) मुवसं (वजी) नागपूर यांचे पत्र क्रं. १०९ दिनांक १०.८.०६ ३) मुवसं (प्रा) नागपूर यांचे पत्र क्रं. ६९३ दिनांक २८.८.०६ तसेच यासंबंधीत इतर पत्र व्यवहार . माहिती व्यक्तीशः घेणार, असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.१०.२००६ रोजी विभागीय वन अधिकारी (नियोजन) तथा राज्य जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना १) श्री एस.के. सूद, मुख्य वनसंरक्षक व श्री नरेश झुरमुरे उपवन संरक्षक यांच्याबाबतची माहिती वैयक्तिक स्वरुपाची आहे त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (एक) (जे) चे प्रावधानानुसार विषयांकित माहिती आपणांस पुरविता येत नाही. २) सध्या वाहतुक परवाना बाबत प्रकरण न्यायालयात सुरु असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) (h) अंतर्गत तपास प्रक्रियेमध्ये अडथळा येईल त्यामुळे विषयांकित माहिती आपणास पूरविता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दिनांक १६.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम करण्यात आलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

९.     अपीलकर्ता यांनी तीन पत्रात माहिती मागितली आहे. त्या तीन पत्रांपैकी अपीलकर्ता यांना दोन पत्रे उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी सांगितले. मात्र पत्र क्रमांक ६९३ हे उपलब्ध झालेले नसल्यामुळे त्या पत्राची आवश्यकता आहे. व सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे विरुध्द न्यायालयात प्रकरण दाखल झालेले आहे व अपीलकर्ता यांनी सुध्दा असे सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये आरोप पत्र सुध्दा सादर झालेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, आरोप पत्र व त्या पत्राचा कोणत्याही प्रकारचा अर्थाअर्थी संबंध नाही व तसे असल्यास सदरच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही, असे अपीलीय

अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

१०. अपीलकर्ता यांच्या वरील सर्व अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला आहे. मात्र माहिती नाकारताना जी कारणे दिलेली आहे ती कारणे ही सदभावनेने दिली असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा शास्तीच्या संबंधामध्ये विचार करता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा तशी कोणत्याही अपीलामध्ये शास्तीची मागणी केलेली नाही.

## आदेश

१) अपील क्रमांक १४४७/२००७ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी तथा वन संरक्षक (मासंवि) यांचे कार्यालयात तसेच संबंधीत कार्यालयामध्ये त्यांनी मागितलेल्या मंत्रालय व इतर कार्यालयाशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीच्या संदर्भात निरीक्षण करुन आवश्यक असलेल्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा वन संरक्षक (मासंवि) यांनी निरीक्षण/पाहाणी करण्याकरीता तारीख व वेळ कळविण्यात यावी व त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संबंधीत दस्तऐवज व अभिलेखे उपलब्ध करुन द्यावी. त्यांना आवश्यक असलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती हया विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३) अपील क्रमांक १४४८/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या निलंबनाच्या संदर्भामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपील क्रमांक १४४९/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी दिनांक ३०.९.२००६ मध्ये मागितलेल्या माहितीचा चौकशी अहवालाची प्रत चौकशी पुर्ण झाली असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

५) अपील क्रमांक १४५०/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.९.२००६ च्या अर्जामधील मुवस (प्रा) नागपूर यांचे पत्र क्रमांक ६९३ दिनांक २८.८.२००६ ची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक २२.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५४७/२००८**

**१) श्री संजय दगडाप्पा कापसे**
**रा. आसनगल्ली, ता. रिसोड,**
**जिल्हा वाशिम- ४४४५०६**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (कं)**
**महा.रा.विद्युत वितरण कंपनी मर्या.अमरावती परिमंडळ, अकोला**
**विद्युत भवन, रतनलाल प्लॉटस, अकोला- ४४४००५.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन)**
**महा.राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.(अमरावती परिमंडळ), अकोला**
**विद्युत भवन, रतनलाल प्लॉटस, अकोला-४४४००५.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २६.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी म्हणून मुख्य अभियंता यांचे कार्यालय येथे दिनांक १२.१०.२००७, २७.१०.२००७ व पुन्हा २७.१०.२००७ रोजी तीन अर्ज दाखल केलेले दिसून येते. परंतु, राज्य माहिती आयोगाडील एका द्वितीय अपीलात तीन वेगवेगळया तारखांचे अर्जाचे व वेगवेगळी माहिती मागितलेल्या अर्जांचा विचार करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या कोणत्या अर्जाचा विचार करावा हे विचारले असता दिनांक २७.१०.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितली त्याबाबत विचार करावा असे आयोगास सांगितले.

" **आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : आपल्या पत्रानुसार (६८७४-२२/१०/०७) मिटर वाचक व कनिष्ठ यंत्रचालक पदावर नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांना माझ्या पेक्षा सरासरी गुण

जास्त आहे मला वरील पदासाठी नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांची नांवे त्यांची शैक्षणिक पात्रता (टक्केवारी, आय.टी.आय. व अप्रेंटीस) अपंगत्वाचा प्रकार, जातीचा प्रवर्ग अनुभव (क्षेत्राचे नांव व कालावधी) वरील पदाकरीता मुलाखत दिलेल्या सर्व उमेदवारांची नांवे, मुलाखतीनंतर त्यांना दिलेल्या गुणाची यादी व गुणांचे विवरण जाहिरातील दिलेल्या पात्रतेनुसार ही माहिती देण्यात यावी. " सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे सांगितले.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.११.२००७ रोजी थेट मुलाखतीमध्ये ज्या अपंग उमेदवारांना एकुण सरासरी गुण जास्त मिळाले आहे अशा उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. दिनांक ८.७.२००७ रोजी झालेल्या थेट मुलाखतीमध्ये प्रत्येक उमेदवाराला किती गुण मिळाले यांची यादी त्याच दिवशी सूचना फलकावर लावण्यात आली होती. तरी सुध्दा आपणास ती यादी पुनश्च पाहावयाची असल्यास ती या कार्यालयामध्ये येवून पाहून घ्यावी, असे माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्ता यांना त्यांचे जावक पत्र क्रमांक ७४१० प्रमाणे कळविलेले दिसते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १०.१२.२००७ रोजी जावक क्रमांक ७९७३ प्रमाणे अपीलीय अधिकारी यांनी ही माहिती फक्त सक्षम निवड समितीला देण्यात येते ती गोपनिय असल्यामुळे आपणास देता येत नाही, याची नोंद घ्यावी व मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये दिनांक १४.११.२००७ रोजी आपणास कळविण्यात आले आहे, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांना सदरची माहिती आजही हवी आहे, असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे निवड प्रक्रिया पुर्ण झाली असल्यामुळे व नियुक्ती आदेश सुध्दा देण्यात आलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्या प्रकारची हरकत घेण्याचे कारण नाही. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे

अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे व वर निर्णयात नमूद केलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्येनिहाय माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २६.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३७५/२००८**

**१) श्री धरमेश व्ही. धवणकर**
**रा.१५ नेहरु कॅालनी, काटोल रोड,**
**नागपूर-१४.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र कुलगुरु**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**१) प्रबंधक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**
**२) डायरेक्टर (BCUM), नागपूर विद्यापीठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २७.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहेत. विद्यापीठातर्फे प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र कुलगुरु हे हजर आहेत. माहिती अधिकारी तथा कुलसचिव हे उपस्थित राहू शकत नाहीत म्हणून त्यांचा अर्ज आलेला आहे. सदरचे अपील हे दिनांक ३.९.२००७ रोजी सुनावणीस लावले असता अपीलकर्ता यांनी सुनावणीकरीता पुढील तारीख मागितली होती. त्यानंतर दिनांक १२.१२.२००७ रोजी परत सुनावणी लावली असता अपीलकर्ता यांनी आजारी असल्याचे कारण देवून मुदत मागितली होती. दोनही वेळेस त्यांना मुदत दिलेली होती. आज ते विना अनुमती गैरहजर आहे व मुदतवाढ देणे योग्य नसल्याने सुनावणी घेण्यात आली.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००६ रोजी कुलसचिव तथा माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे. " The Department of Mass Communication, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University conducted in

educational tour for the students of academic session २००३-०४. There were allegations regarding the expenditure on the tour Thus, Justice S.N. Mardikar (Retd) committee was constituted to enquire into the matter. Justice S.N. Mardikar (Retd) submitted the detailed enquiry report to the university. Please furnish me the photocopy of the detailed enquiry report of Justice S.N. Mardikar (Retd) Committee.

२. When did justice S.N. Mardikar (Retd)committee submitted theReport? What action did the University administration took on the Report? If the said report was kept before the university administration then what was the decision taken by the University administration? If any decision was taken please furnish the photocopy of the decision taken on the Mardikar Committee report.

३. Was the Mardikar committee Report placed before the Management Council of the University? If not, then state the reasons for non presentation of the Mardikar Committee report to the Management Council ? If the report was placed then, please furnish the photocopy of the action taken on Mardikar Committee report by the Management Council of the University and supply the minutes of the same. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.११.२००६ रोजी श्री अ.द. चौधरी,संचालक व माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आपल्या दिनांक ७.१०.२०६ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती संबंधीत विभागाकडून मागविण्यात आली होती. संबंधीत विभागाकडून माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे देवू शकलो नाही. (पत्र सोबत जोडले आहे). माहिती उपलब्ध झाल्याबरोबर आपणास पाठविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००६ रोजी अपीलीय अधिकारी तथा प्र कुलगुरु यांचेकडे प्रथम अपीली दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१२.२००६ रोजी देण्यात आलेला असून

उपरोक्त अहवालासंबंधीची वस्थुस्थिती त्वरीत अर्जदाराला कळविण्यात यावी, अशा प्रकारचे आदेश प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिलेली दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २१.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३ अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक ९.१०.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा संचालक यांनी कुलसचिव यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सादर करावे असे पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ३१.१०.२००६ रोजी कुलसचिव यांना त्याचप्रमाणे स्मरणपत्र दिलेले दिसून येते परंतु सदरची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दिनांक ४.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती कुलसचिव यांचेकडून उपलब्ध होण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. परंतु, त्यानंतरही ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या न्यायमुर्ती मार्डीकर यांच्या अहवालाची प्रत श्री शहजाद अख्तर यांनी सुध्दा त्यांच्या दिनांक १४.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी यांना मागितलेली दिसून येते. परंतु त्यांनी सुध्दा सदरच्या अहवालाची प्रत उपलब्ध झाल्यावर पुरविण्यात येईल असेच कळविलेले दिसून यते. सदरचा निर्णय दिनांक १२.१२.२००७ रोजी देण्यात आला आहे. परंतु, त्यानंतर सुध्दा न्यायमुर्ती मार्डीकर यांच्या अहवालाची प्रत अपील क्रमांक ३१९/२००७ च्या निर्णयाप्रमाणे उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. व अपीलकर्ता यांना कळविल्याप्रमाणे सुध्दा सदरच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयन्न केलेले दिसून येत नाहीत. मात्र, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या अहवालाची प्रत उपलब्ध होत नसेल तर त्याकरीता त्यांनी पोलीसकडे एफ.आय.आर. दाखल करण्याकरीता आदेश दिलेले आहेत. परंतु, आज कुलसचिव हे हजर नसल्यामुळे सदरच्या आदेशावर कार्यवाही झालेली आहे किंवा नाही याबध्दलची माहिती उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांना नाही. वास्तविक, सदरचा अहवाल उपलब्ध होऊ शकत नाही असे ज्या वेळेस कार्यालयात आढळून आले त्याचवेळेस

सदरच्या अहवालाच्या संदर्भामध्ये संबंधीत अधिका-यांनी एफ.आय.आर.दाखल करावयास पाहिजे होता व तसे न केल्यामुळेच आज एकतर सदरचा अहवाल लपविला जात आहे अशा प्रकारचा निष्कर्ष काढणे अनाठायी होणार नाही. तरी सुध्दा मा. प्र-कुलगुरु यांनी जर एफ.आय.आर. दाखल करण्याचा आदेश दिलेला असेल तर त्याप्रमाणे एफ.आय.आर.दाखल करणे संयुक्तिक राहील. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत न्यायमुर्ती मार्डीकर यांचे अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात किंवा पोलीसकडे त्यासंदर्भामध्ये एफ.आय.आर.दाखल करुन त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात यावे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २७.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३४४/२००८**

**१) श्री सुरेश पांडूरंग फुलमाळी**
**रा.अकोली, पो. जामडी, ता.मुर्तीजापूर**
**जिल्हा अकोला.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती, मुर्तीजापूर, ता. मुर्तीजापूर, जिल्हा अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक**
**अकोली जहाँगीर, ता.मुर्तीजापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २७.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये शासकिय माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, अकोली जहाँगीर यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १३.१०.२००५ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १४.१०.२००५ रोजी सचिव यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलले दिसून येते व त्याप्रमाणे सचिव, ग्राम पंचायत यांनी दिनांक २०.१०.२००५ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या संदर्भामध्ये पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**३.** अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक १४.१०.२००५ व त्यानंतर सचिव, ग्राम पंचायत यांच्या दिनांक २०.१०.२००५ च्या पत्राचे अनुषंगाने महाराष्ट्र माहितीचा

अधिकार अधिनियम, २००२ च्या तरतुदीप्रमाणे व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम (निरसित) २००६ च्या कलम २ अन्वये मा. लोक आयुक्त यांचेकडे द्वितीय अपील दाखल करावयास पाहिजे होते. कारण त्यांचा मुळ माहितीचा अर्ज हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ प्रमाणे दिनांक १२.९.२००५ रोजी केलेला आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा दिनांक ११.१०.२००५ रोजी निरसित झालेला आहे व राज्य माहिती आयोग हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या केंद्रिय कायद्याप्रमाणे दिनांक १२.१०.२००५ रोजी अस्तित्वात आलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगास निर्णय देण्याची अधिकारिता नाही व त्यामुळे अपीलकर्त्यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे राज्य माहिती आयोगास अधिकारितेच्या अभावी निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे विरुध्द मा. लोक आयुक्त यांचेकडे द्वितीय अपील दाखल करावे.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २७.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत पुनर्विलोकन अर्ज-**

**पुनर्विलोकन अर्ज क्र २ /२००८**

**१) श्री देवराव तानबाजी आंबटकर**
**रा.बाबुपेठ पाण्याची टाकीजवळ, झुल्लूरवार सावकार यांचे घरासमोर, बाबुपेठ वार्ड नं.१, चंद्रपूर, ता.जि.चंद्रपूर.** **पुनर्विलोकन अर्जदार**

**( निर्णय पारित दिनांक २८.५.२००८ )**

**नि र्ण य**

पुनर्विलोकन अर्जदार यांनी दिनांक ३.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या अपील क्रमांक ३२९/२००७ च्या दिनांक ११.९.२००७ च्या निर्णयाच्या संदर्भामध्ये पुनर्विलोकन अर्ज सादर केलेला आहे. पुनर्विलोकन अर्जाच्या संदर्भात ते स्वतः सुनावणीस हजर राहू शकत नव्हते व तरी सुध्दा अपीलाचा निर्णय दिलेला आहे . तसेच अपीलाचा निर्णय हा अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही तरी सुध्दा अपील खारीज केलेले आहे, या कारणास्तव त्यांनी ३३ मुद्दे व पुन्हा ११ मुद्यामध्ये अर्ज सादर केलेला आहे. सदरचे द्वितीय अपील क्रमांक ३२९/२००७ च्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली होती त्यातील बहुतांश माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत अंतर्भूत होत नव्हती. जी माहिती त्यांना कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देता येणे शक्य होते ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली होती. पुनर्विलोकन अर्जदार यांचे इतरही अपील क्रमांक १०८९/२००७ व १०९०/२००७ याचा निर्णय झालेला आहे. व त्या अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारे माहिती मागताना दिसतात. व सर्व प्रश्न हे "कपोल कल्पीत" असतात. व त्यामुळे अशा प्रश्नांची उत्तरे ही अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते. परंतु, अपीलकर्ता यांचे वर नमूद केल्याप्रमाणे इतरही अपीलाच्या अर्जाचे अवलोकन केले असता अशाच प्रकारची माहिती ते वारंवार मागण्याचा प्रयत्न करतात व ती उपलब्ध झाली नाही तर पुन्हा पुन्हा प्रश्न काढून माहिती मागण्याचा प्रयत्न करतात. आज त्यांची पत्नी सुनावणीस हजर झाली असून पुनर्विलोकन अर्जदार हे दिनांक १५.३.२००८ रोजी मृत्यू पावले असे त्यांनी

आयोगास लेखी दिलेले असून पुनर्विलोकन अर्जाची सुनावणी घ्यावी अशी विनंती केलेली आहे. माहितीचा अधिकार हा व्यक्तीस वैयक्तिक असा अधिकार दिलेला आहे. व त्यामुळे अपीलाच्या संदर्भामध्ये वारस वगैरे आणून अपीलाचे कामकाज पुढे सुरु ठेवणे हे अधिनियमाच्या तरतूदीशी सुसंगत होणार नाही. असे असले तरी श्रीमती आंबटकर यांच्या विनंतीचा विचार करुन पुनर्विलोकन अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी पुन्हा "कपोल कल्पीत" असे प्रश्न उपस्थित करुन व अनेक आरोप करुन पुनर्विलोकन अर्ज सादर केलेला दिसून येतो. मुळातच जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे व श्रीमती आंबटकर यांचे सोबत सुनावणीस आलेले सहकारी यांचे म्हणण्याप्रमाणे नगर परिषदेच्या हद्दीमध्ये नझुल प्लॅाटवर सुमारे १५०० अनधिकृत घरे आहेत. व त्यात श्री आंबटकर यांचे दुकान सुध्दा होते. त्याबाबत नगर परिषदेने कारवाई केल्यावर अर्जदारानी सदरची माहिती ही नगर परिषदेस मागणे सुरु केले. परंतु अनधिकृत घरे असल्यामुळे त्याबाबतची कोणतीही माहिती नगर परिषदेकडे उपलब्ध नाही. मात्र, मानवी वस्ती असल्यामुळे प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असते व त्याप्रमाणे प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. नगर परिषद ही घरपटटी लावते व त्या घरपटटीची माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकली असती असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु इतरही असंबंध्द असे प्रश्न उपस्थित करुन ते माहिती मागताना दिसून येतात. व अशा कपोल कल्पित प्रश्नांचे उत्तरावर कोणाचेही कधीही समाधान होणार नसल्यामुळे ते पुन्हा पुन्हा तेच ते प्रश्न उपस्थित करताना दिसते. व त्यांच्या सदरच्या अपीलामध्ये अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.२.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २२.२.२००६ रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे (त्यांचा मुलगा सुनावणीस हजर होता) निकाली काढण्यात आले होते. व त्यामुळे व वरील सर्व कारणांमुळे पुनर्विलोकन अर्जदाराच्या पुनर्विलोकन अर्जाचा विचार करण्याची आवश्यकता नाही. तो खारीज करण्यात येत आहे.

**दिनांक २८.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०८९/२००८**
**अपील क्रमांक १०९०/२००८**

**१) श्री देवराव तानबाजी आंबटकर**
**रा.बाबुपेठ पाण्याची टाकीजवळ,**
**झुल्लूरवार सावकाराचे घरासमोर**
**बाबूपेठ वार्ड नं.१, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त/प्रादेशिक संचालक, (नगर पालिका प्रशासन) नागपूर. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २८.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००६ व ५.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे दिनांक १५ मार्च, २००८ रोजी देहावसान झाले आहे, असे त्यांची पत्नी श्रीमती सुमती देवरावजी आंबटकर यांनी आज सुनावणीच्या वेळेस कळविले व त्या सुनावणीस हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचा दिनांक १५ मार्च, २००८ रोजी मृत्यू झाला असल्यामुळे व सदरचा माहितीचा अर्ज व प्रथम अपील त्यांनी दाखल केलेले असल्यामुळे माहितीचा अधिकार हा वैयक्तिक अधिकार असल्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये त्यांचे वारस म्हणून किंवा प्रतिनिधी म्हणून कोणत्याही प्रकारे अपीलाचे कामकाज पूढे चालविता येत नाही. तरी सुध्दा श्री आंबटकर यांनी अर्जात नमूद केलेल्या बाबी ग्राहय धरण्यात येवून प्रकरण निकालात काढण्याकरीता अर्जदाराने विनंती केलेली असल्यामुळे व त्यांच्या स्वत:च्या संदर्भामध्ये जर

माहिती उपलब्ध करुन देणे शक्य असल्यास त्याबध्दलची तपासणी करुन निर्णय देण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १०८९/२००७ मध्ये माहिती अधिकारी म्हणून मुख्याधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १७.३.२००६ रोजी अर्जासोबत सहपत्रे १,२,३ जोडण्यात आलेले आहेत. त्यामध्ये मागितलेल्या माहितीचे वर्णन दिलेले असून सदरची माहिती मुद्येनिहाय त्यांनी मागितलेली दिसून येते.

" **सहपत्र -१** : मुळ जागेवर अतिक्रमीत व बिनामंजूरी बांधलेली घरे मौजा चांदा नझुल मोहल्ला (भिवापूर वार्ड) कालावधी ५ ते ७ वर्षे)

शाीट नं. ७,८,९, ब्लॉक नं. १०९, ११०,१११ भीवापूर वार्ड प्लॉट नं. ३ ते १५ खुल्या नझुल जागेवर अंदाजे १५०० घरे.

२. शिट नं.११, ब्लॉक नं. १२३ हिंदुस्थान लालपेठ कॅालरी वाड नं.१ खुल्या नझुल जागेवर अंदाजे १८०० घरे  (अनाधिकृत व बिनामंजूरीने बांधलेली).

३. विठइल मंदीर वार्ड क्रं.१६ खुल्या नझुल जागेवर अंदाजे ४०० घरे (अतिक्रमीत व बिनामंजूरी बांधलेली घरे)

४. बाबूपेठ वार्ड नं. २ शिट नं. १८ ब्लॉक नं. १२४ खुल्या नझुल जागेवर अंदाजे ५०० घरे (विनामंजूरी व अतिक्रमीत घरे)

५. गंजवार्ड वार्ड नं. ३ (विनामंजूरी अतिक्रमीत घरे) नझुल जागेवर अंदाजे ५०० घरे.

नोटः किती किती लोकांवर कार्यवाही करण्यात आली. आपले कार्यालयांत सर्व रेकार्ड उपलब्ध आहे. जसे मतदार यादी, प्लॅाटसच्या शिट, रजिस्टर्स, तलाठी रेकार्ड).

६. दिनांक १७.४.२००३ ला नोटीसचे उत्तर दिले (नोटीस २८.३.२००३) त्या नोटीसच्या उत्तराची (C.O. ला दिलेले) सत्यप्रतिलीपी त्यावरील आदेश, कार्यालयीन टिपणीची नक्क्ल तसेच स्टॅन्डींग कमेटीच्य आदेशाची नक्कल (कालावधी १७.४.२००३ ते ३०.४.२००३) स्टॅान्डींग कमेटीमध्ये अध्यक्ष श्री कोडाप सभापती, श्री पुटटेवार साहेब, सभापती ...

७. नगरसेवक संजय गेडाम प्र.नं.८ सौ. माधूरी मडावी नगरसेवक, सौ.लिलाबाई बळवंतराव कडुकर, नगरसेवक प्रभाग नं. ७, यांची बांधकामाबाबत दाखले दिनांक १०.३.२००३ व ११.३.२००३ ला दाखल केले त्यावर कोणती कार्यवाही केली. त्यावरील कार्यवाही रिपोर्ट कार्यालयीन टिपणी व आदेशाची नक्कलच्या सत्यप्रतिलीपी पुरविण्यात याव्यात (दाखला देवराव तानबाजी आंबटकर यां नांवानी दिलेले आहे)

८. दिनांक २९.३.२००३ ला आपला दिनांक २८.३.२००३ चा नोटीस मिळाल्यानंतर दिनांक २९.३.२००३ ला तक्रार अर्जाच्या नकला मिळण्याकरीता अर्ज केला त्यावर आपणाकडून नकला पुरवठा करण्याचा आदेश घेतला काय. नकला पुरविल्या काय. त्यावरील अर्जाची सत्यप्रतिलीपी, आदेशाची सत्यप्रतिलीपी व कार्यालयीन टिपणीची सत्यप्रतिलीपी पुरविण्यात यावी.

९. दिनांक २५.२.२००३ ते ३०.५.२००३ पर्यंत तक्रार अर्ज सादर केला तेव्हापासूनची कार्यालयीन टिपणीची सत्यप्रतिलीपीचा पुरवठा करण्यासाठी नगरसेवकाचा तक्रारअर्ज.

**<u>सहपत्र -२</u>**

अ) : बाबुपेठ पाण्याचे टाकीसमोरील रोडचे बाजूला नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळेच्या मागील जागा शाळेकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर (नझुल) अनाधिकृत व बिनामंजूरी दुकानाची बांकामे केली आहेत शिट नं. २२ ब्लॉक नं. १२३ प्लॉट नं. ५५ दोन दुकाने अंदाचे १२ x २० फुट (१२X१० फुटचे एक) (सन २००५) जवळपास याबाबत काय म्हणणे आहे,माहिती पुरवावी.

ब) नगर रचना विभाग नगर परिषद, चंद्रपूरयांचेकडून घरबांधणीचा नकाशा मंजूर केलेला आहेत काय किंवा बिनामंजूरीने बांधलेले आहे याबाबत माहिती पुरवावी.

क) नियमानुसार व कायदयानुसार (मुनिसिपालीटी ॲक्ट नुसार) कार्यवाही होत नाही काय माहिती पुरवावी.

ड) याशिवाय नगर रचना विभाग नगर परिषद चंद्रपूर यांचेकडून राखीव जागा सुरक्षित ठेवण्याबाबत (अवैध व अतिक्रमीत बांधकाम याबाबत कार्यवाही केली काय ) कोणत्या प्रकारची काळजी घेण्यात आली जेणेकरुन शाळा बांधकामाकरीता अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत माहिती पुरवावी. (नेताजी शाळेपासून ते गुरुदेव चौक )

२ (अ) बाबुपेठ पाण्याचे टाकीसमोरील रोडचे बांधकाम नेतारी सुभाष चंद्र बोस प्राथमिक शाळेच्या मागिल जागा शाळेकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर (नझुल) अनाधिकृत व बिनामंजूरी दुकानाची बांधकामे केली आहेत. शिट नं. २२ ब्लॉक नं. १२३ प्लॉट नं.    दोन दुकारे (अंदाजे १२ x २० फुट एक सन २००४ याबाबत काय म्हणणे आहे (माहिती पुरवावी )

(ब) दुकान बांधण्याची नगर परिषदेकडून परवानगी घेतली काय परवानगी घेतली असल्यास माहिती पुरवावी.

(क) नियमानुसार व कायदयानुसार (म्युनिसिपालीटी ॲक्ट १९६५ नुसार ) कार्यवाही होऊ शकत नाही काय. माहिती पुरवावी.

(ड) कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्याबाबतचे कायदेशिर कारण कळवावे.

(ई) नगर रचना विभाग, नगर परिषद, चंद्रपूर यांनी राखीव जागा सुरक्षित ठेवण्याबाबत काही काळजी घेतली काय. माहिती पुरवावी.

३. नझुल जागेवर बाबूपेठ वार्ड नं. १, २ व ३ मध्ये अंदाजे ५००० धरांचे वर अनाधिकृत व बिनामंजूरी धरे लोकांनी बांधलेले आहे. त्यात (महसुलचा पटटा नसलेले) असे एखादे तरी धर नझुल जागेवर परवानगी घेवून बांधलेले असतील तर त्याची सत्यप्रतिलीपी पुरविण्यात यावी. (शिट नं. २९ ब्लॉक नं. १३३, शिट नं. २४ ब्लॉक नं. १२९, शिट नं. २० ब्लॉक नं. १२५, शिट नं. १३, ब्लॉक नं. ११५, शिट नं. २५ ब्लॉक नं.१२६, शिट नं. १८ ब्लॉक नं. १२४  कालावधी ५ ते १० वर्षे). याबाबतची माहिती नझुल शिट मतदार यादी व इतर संपूर्ण रेकार्ड आपलेकडे उपलब्ध आहे.

४. शिट नं. २२ ब्लॉक नं. १२३ नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळा, बाबूपेठ पाण्याचे टाकीजवळ, गुरुदेव चौकात नगर परिषद चंद्रपूरनी बाबूपेठला पिण्याचे पाणी पुरवठा करण्याकरीता एक १०x १० फुट चे शेड तयार केले होते व त्या शेडमध्ये पाण्याची मशीन (पंप) ठेवून पाणी पुरवठा कसा होतो ते शेड कुठे गेले. लिहाव केला. एखाद्या व्यक्तीना दिले याबध्दलची माहिती पुरवावी अन्यथा त्याचा गैरव्यवहार झाला याबाबत खुलासा करण्यात यावा.

**<u>सहपत्र - ३</u>**

१. नगर सेवक १) प्रकाश तोटावार २) दुर्गेश कोडाप (हिंदुस्थान लालपेठ कॅालरी ३) अजय खंडेलवार, भीवापूर वार्ड ४) अरुण बुरडकर, विठठल मंदीर वार्ड ५) नामदेव पिंपळे, बाबुपेठ वार्ड ६) राजू नंदनवार, गंजवार्ड या सर्वाचा नगर सेवक म्हणून किती किती वर्षाचा कालावधी झालला आहे त्याचा दाखला पुरविण्यांत यावा. यात वरील नगर सेवक किती वेळा निवडूक लढविली व निवडून आले याबाबत कालावधी देण्याची कृपा व्हावी.

२. शिट नं. २२ ब्लाक नं. १२३, बाबुपेठ पाण्याचे टाकीचे पश्चिम दिशेला उत्तर दक्षिण सिमेंट रोडचे बांधकाम करण्यांत आलेले आहे त्यांत खालील प्रमाणे माहिती पुरवावी. (नेताजी चौकाजवळील राजूरकर यांचे घरापासून ते दासरवार यांचे घरापर्यंत) कालावधी अंदाजे ४ महिने ( १.११.०५ ते ३१.१२.०५)

अ) सदरील रोडवर घराची अतिक्रमणे आहेत ते काढून रोडचे बांधकाम करण्यांत आले आहेत काय? याबाबतची माहिती पुरविण्यात यावी अन्यथा दाखला देण्यात यावा.

ब) अतिक्रमणे न काढताच बांधकाम करण्यात आलेले आहेत काय, याबाबत दाखल देण्यात यावा.

क) त्यांचेवर कार्यवाही करण्यांत आलेले आहेत काय. कारवाई करण्यांत आली नाही तर काय केले याबाबतचा अहवाल पुरवठा करण्यात यावा. पाण्याचे टाकीचे कुंपनाला लागु नये."

४. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.५.२००६ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्याप्रमाणे मुद्येनिहाय माहितीच्या बध्दल उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००६ राजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १०.८.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला असून सदरच्या प्रथम अपीलामध्ये मुद्येनिहाय तपासणी करण्यात आली असून अपीलकर्ता त्यांना माहिती प्राप्त न झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा प्रकारे निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसते.सदरच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २०.४.२००७ रोजी आपण माहितीच्या अधिकारा अंतर्गत केलेल्या अर्जाचे संदर्भात माहिती पुरविण्याचे दृष्टीकोनातून नगर परिषदेकडे

उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाचे अवलोकन करण्यासाठी दिनांक २४.४.२००७ ला सकाळी ११.०० वाजता माझ्या कक्षात उपस्थित राहावे, असे मुख्याधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ३.७.२००७ व १.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे व दिनांक १७.८.२००५ व ३.९.२००५ च्या अर्जाप्रमाणे अनुक्रमे दिनांक १.१.२००८ व २८.१.२००८ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, त्यावरही अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, मुद्या क्रमांक ८ चे उत्तर बरोबर नाही. तसेच मुद्या क्रमांक १,२,३ व ११ चे उत्तर अन्यथा माहिती बरोबर नाही असा त्यांनी शेरा दिलेला आहे. परंतु, मुद्या क्रमांक ८ च्या संदर्भामध्ये जी उत्तरे दिलेली आहे त्यात दिनांक २.२.२००६ ला झालेल्या सुनावणीची प्रत दिनांक ११.६.२००६ ला देण्यात आली. त्या आदेशाची प्रत पुरविण्यात येत आहे. दिनांक ११.६.२००६ च्या पत्राची वेगळी प्रत उपलब्ध नाही, असे कळविण्यात आले आहे. त्यानंतर मुद्या क्रमांक १,२,३ च्या संदर्भामध्ये त्यांनी जो पूर्वी अर्ज केलेला होता त्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यामुळे आदेशाची प्रत पुरविता येत नाही असे कळविलले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती त्या स्वरुपात ती त्यांना कळविण्यात आलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचे बहुतांश मुद्ये हे कपोल कल्पित व गृहितकांवर आधारित असे दिलेले आहे. जर-तर च्या संदर्भात त्यांनी प्रश्न विचारलेले आहे व अशा प्रश्नांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे कोणाचेही समाधान होत नाही व माहिती पुरविणे सुध्दा शक्य होत नाही. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मध्ये माहिती या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. सदरच्या व्याख्येमध्ये माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल,अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा अहवाल, कागदपत्रे, नमूने, प्रतीमाने (माडेल) कोणतेही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधार सामुग्री याचा समावेश होतो. व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येमध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहाणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेख्यांच्या टिप्पण्या, टिपणी, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामुग्रीचे प्रमाणित नमूने घेणे व इलेक्ट्रॉनिक

प्रकारातील माहिती असेल तर मुद्रीत प्रती प्रिन्ट आऊट मार्फत माहिती मिळविणे अशा अधिकाराचा समावेश होतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी ज्या नझुल प्लॉट वरील १५०० घराच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे ते १५०० घरे शासकिय माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे अनधिकृत घरे आहेत व त्यामुळे त्या घराच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे कागदपत्र हे नगरपरिषदेमध्ये उपलब्ध नाही. व अनधिकृत घरे असेल तर त्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागतात व त्यामुळे प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देताना टॅक्स घेतला जातो. त्याबाबतची माहिती देता आली असती. परंतु तशा प्रकारची माहिती ही त्यांच्या माहिती मागण्याच्या मुद्यांमध्ये दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांचे दिलेल्या उत्तराने समाधान झालेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा पुन्हा प्रश्नांच्या स्वरुपात माहिती विचारलेली दिसून येते. त्यातही जी कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दिनांक २८.१.२००८ ला माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यासंदर्भात सुध्दा ते समाधानी नाही. परंतु कोणत्याही प्रकारचे ठोस आक्षेप त्यांना न घेता मोघम आक्षेप घेतलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे ती माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती बरोबर आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**अपील क्रमांक १०९०/२००७**: मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००६ रोजी सहपत्र १ ते ४ मध्ये दिल्याप्रमाणे माहिती अधिकारी , नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते.

"**सहपत्र-१** : १. दिनांक १८.३.२००६ ला दिलेल्या अर्जाची नक्कल, कार्यालयीन टिपणी व आदेशाची नकल्लेचा पुरवठा करण्यात यावा.

२.(अ). बाबुपेठ पाण्याचे टॉकी समोरील रोडचे बाजूला नेताजी सुभाषचंद्र बोस प्रा.शाळेच्या मागील जागा शाळेकरीता राखीव आहे. त्या जागेचा नकाशा नेताजी शाळेपासून ते गुरुदेव चौकावरील शिट नं. २२ ब्लाक नं. १२३, (राखीव सन १९७६ पासून ).

२ (ब) नेताजी प्रा. शाळेसाठी १९७५ पासून राखीव जागा आहे. त्यावर आजतागायत कोणती कार्यवाही केली. कार्यवाही केली नसल्यास कार्यवाही कां नाही केली कारण द्यावे.

२ (क) नेताजी प्रा. शाळेसाठी राखीव जागेवर घरे बांधण्यांत आली व सन २००४-२००५ मध्ये दुकाने बांधण्यांत आली (अनाधिकृत) (बिनामंजूरी) यावर कार्यवाही कां नाही. कलम ५३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नचना अधिनियमान्वये कार्यवाहीस पात्र आहे. कार्यवाही करण्यात आली नाही, कारण द्यावे.

३. शिट नं. २२, ब्लाक नं. १२३ नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळा बाबूपेठ पाण्याच्या ऑाकीजवळ गुरुदेव चौकात नगर परिषद चंद्रपूरने बाबूपेठला पिण्याच्या पाण्याचा पाणी पुरवठा करण्याकरीता १० x १० चे ५(७ शेड बांधण्यांत आले होते. त्यापैकी एक शेड गुरुदेव चौक येथे बांधण्यात आले होते त्या शेडमध्ये पाण्याची मशीन (पंप) ठेवून पाणी पुरवठा करीत होते ते शेड कुठे गेले. लिलाव केला, एखाद्या व्यक्तीला दिले, गैरव्यवहार झाला, तसेच लोखंडी २ इंच पाईप लाईन टाकण्यांत आली होती याबाबतची माहिती पुरवावी अन्यथा खुलासा करण्यात यावा. ( १८.३.२००६ चे अर्जात चुकीचे उत्तर दिले. शेड बांधण्याचे वेळेस S.D.O. साहेब प्रशासकीय अधिकारी होते.)

४. नगर पालीकेनी जे शेड बांधले होते त्या शेडवर नवीन बांधकाम करण्यात आलेले आहेत व संबंधीत कनिष्ठ अभियंता हे दिनांक ८.१२.२००५, १.२.२००६, १८.३.२००६ चे अर्जात करीत आहे. यावर योग्य माहितीचा पुरवठा करण्यांत यावा अन्यथा यावर खुलासा करण्यांत यावा. (टाला टूलमचे उत्तर देवून व चुकीचे उत्तरे देवून अर्जाचा निकाल लावणे योग्य नाही).

५. नगर परिषदेनी चुंगी नाके बांधले होते व तसाच चुंगी नाका बाबुपेठ नेताची चौकात बांधला होता त्या चुंगी नाक्याचा लिलाव करण्यांत आला काय तो आज अस्तित्वात आहे किंवा नाही यावर खुलासा करण्यांत यावा व तो कोणाच्या ताब्यात आहे.

६.नगर सेवक १) प्रकाश तोटावार २) दुर्गेश कोडाप हिदुस्थान लालपेठ कॉलरी ३) अजय खंडेलवारण भीवापूर वार्ड ४) अरुण बुरडकर विठठल मंदीर वार्ड ५) नामदेवराव पिंपळेख बाबुपेठ वार्ड ६) राजू नंदनवार, गंजवाड यांची नगर सेवकांची यादी सन १९९१ व १९९६ व अरुण बुरडकर यांचा कालावधी पुरवठा करण्यांत यावी. (नेहमी चुकीचे उत्तर १.२.०६ चे अर्जात मा. आयुक्त यांनी सूचना प्रदान केल्यानंतर तोच प्रकार उचित नाही).

७. शिट नं.२२, ब्लॉक नं. १२३ नेताजी सुभाषचंद्र बोस शाळा बाबुपेठ पाण्याच्या टॉकीसमोर प्राथमीक शाळा ते गुरुदेव चौक, २००४-०५ मध्ये नवीन दुकाने बांधण्यात आले व ते बिनापरवानगीने बांधण्यात आलेले आहेत. हा प्रश्न ८.१२.२००५, ११.२.२००६, १८.३.२००६ चे अर्जात व ६.३.२००६ चे उत्तरात ८.१२.२००५ चे अर्जावरील उत्तर मुद्या क्रं. ४ मध्ये तुमचा म्हणण्याप्रमाणे माहिती पुरवठा केल्यानंतर दिनांक १८.३.२००६ चे अहवालात सदर बाबतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे पुरवठा करु शकत नाही. याकरीता कोणती माहिती पाथ्हजे आहे याचा खुलासा करण्यांत यावा. ( ५३ टाऊन प्लॉनिंग ॲक्ट दंड पात्र नाही काय)

७ (ब) वरील ब्लॉक व शिट नं. प्रमाणे नवीन दुकाने अनाधिकृत व बिनापरवानगीने बांधण्यांत आलेली आहेत ही माहिती अभिलेख्यावरुनच काढण्यांत आलेली आहे आपले कार्यालयाने नझुल शिट मतदार यादी  व इतर इतर संपुर्ण रेकार्ड उपलब्ध असतांना माहिती उपलब्ध नाही यावर श्रीमान वाघमारे साहेब नगर रचनाकार यांनी क अभियंता श्री बोरीकर यांना माहिती दिली व ती त्यांचे कार्यालयाकडे गेडाम यांनी काढून २०.४.२००६ ला दिली असता कोणती माहिती उपलब्ध पाहिजे याबाबत खुलासा करण्यांत यावा. (जाणून बुजून माहितीचा पुरवठा करीत नाही हे मुख्याधिकारी साहेब यांनी पडताळून पाहावे) ५३ टाऊन प्लॉनिंग ॲक्ट लागू पडत नाही काय, व कार्यवाहीस पात्र नाही काय, खुलासा करण्यात यावा.

८. नगरसेवक राजू मधुकरराव नंदनवार, गंजवार्ड चंद्रपूर प्रभाग नं. १३ यांनी घर कोणत्या वर्षी बांधले, त्याचा दाखला देण्यात यावा.

९. नगर सेवक अरुण बुरडकर प्रभाग नं. १६ विठठल मंदीर वार्ड यांचा किती वेळा निवडणुक लढविली व किती किती वेळा निवडून आले, याचा दाखला देण्यांत यावा( अर्ज दिनांक १.२.२००६ व १८.३.२००६ मध्ये चुकीची माहिती पुरवठा केलेली आहे. तशी दिशाभूल करणारी माहितीचा पुरवठा करण्यांत येवू नये.

१०. नगर सेवक श्री अरुण खंडेलवार, भीवापूर वार्ड प्रभाग नं. १० यांनी भीवापूर वार्ड मध्ये जे बिनापरवानगीने घर बांधलेले आहे ते घर व महादेव मंदीर वार्ड राधाकृष्ण चौक येथे जे घर बांधण्यांत आलेले आहेत ते घरे ही राखील जागेत आहे. ती राखीव जागा १९८३ पासून आहे यावर कोणती कार्यवाही केलेली आहे. त्याबाबतचा दाखला देण्यांत यावा. नगर परिषदेच्या नगर

सेवकांना राखीव जागा असे किंवा नाही यांना अनाधिकृत घरे बांधण्याचा अधिकार नगर परिषदेनी दिलेला आहेत काय, यावर खुलासा करण्यांत यावा.

११. नगर सेवक श्री प्रकाश तोटावार व श्री दुर्गेश कोडाप प्रभाग नं.९ हिंदुस्थान लालपेठ कॅालरी यांनी राखीव जागेत घरे बांधलेली आहेत ती राखीव जागा १९८३ पासून आहे त्याबाबतचा दाखला देण्यात यावा. दोन्ही नगर सेवकांनी घरे अनाधिकृत बांधलेली आहेत. त्यांना नगर परिषदेनी घरे बांधण्याची परवानगी दिली किंवा नाही मग राखीव जागेवरील बांधकामावर नगरसेवक म्हणून कार्यवाही नाही काय, खुलासा करण्यात यावा.

१२. श्री नामदेव पिंपठे, नगरसेवक बाबूपेठ वार्ड नं. २ यांनी राखीव जागेत घर बांधलेले आहे त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली. नगरसेवक म्हणून माफ आहे काय. राखीव जागा १९८३ पासून आहे. खुलासा करण्यात यावा.

१३. दिनांक २.६.२००६ ला सुनावणी ठेवली व त्यांत श्री नवले बाबू यांनी सुनावणीचे दिवशी श्री वाघमारे साहेब याची व श्री बोरीकर साहेब कनिष्ठ अभियंता यांची सही घेतली त्या सभेचा हाजरी नोटीसाची प्रत मिळावी.

१४. सन २००२ ते जुलै २००६ पर्यंत किती मुख्याधिकारी साहेब यांनी काम केलेले आहे त्याबाबतची माहिती ( Deputation and Regular C.O.) १५. सन २००२ ते जुलै, २००६ पर्यंत किती लोकांना A.O. म्हणून काम केले त्यांची माहिती पुरवावी. १६. सन २००२ ते जुलै, २००६ पर्यंत किती रचनाकार अधिकारी यांनी काम केले त्याची माहिती पूरवावी. १७. दिनांक २.६.२००६ चे सुनावणीचा नोटीस श्री वाघमारे साहेब, श्री बोरीकर साहेब व माझे नावानी काढला त्याची सत्यप्रतिलीपी देण्यात यावी. "

५. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.७.२००६ राजी सहाय्यक माहिती अधिकारी नगर परिषद, चंद्रपूर यांनी " आपला अर्ज संदिग्ध स्वरुपाचा असून आपणास काय अपेक्षित आहे ते स्पष्ट होत नाही. तरी प्रत्यक्ष कार्यालयात येवून नस्तीचे अवलोकन करावे. त्यानंतर मागणी केलेली माहिती पुरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी." असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप घेताना मला त्रास देण्याचे उद्येशाने माझा अर्ज विनाकारण काहीही

हुजर घेवून त्रास देत आहे. अडीच महिन्यानंतर आज पत्र दिनांक ६.१०.२००६ प्राप्त झाले असा आक्षेप घेतलेला आहे.  सदरच्या प्रकरणात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. मात्र, दिनांक २४.४.२००७ रोजी माहितीच्या अधिकाराबाबतची कागदपत्रे पाहाण्यासाठी उपस्थित राहाण्याबाबत त्यांना एक पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राचे अनुषंगाने दिनांक १.१.२००८ व दिनांक २८.१.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर, वर नमूद केल्याप्रमाणे अपील क्रमांक १०८९/२००७ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच आक्षेप घेतलेला दिसून येतो व वरील अपीलाच्या संदर्भामध्ये जे विवेचन केलेले आहे ते विवेचन याही अपीलाच्या संदर्भात लागू होत असल्यामुळे अपीलकर्त्याचे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०८९/२००७ व १०९०/२००७ यामध्ये नियमाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २८.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६४४/२००८**

**१) श्री सुभाष नत्थुजी येमदे**
**रा.अ/७, जलविहार रिंगरोड, नागपूर-१६**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २९.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००५ रोजी माहिती अधिकारी म्हणून मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे अर्जदार तथा तत्कालीन उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद लघु सिंचन उपविभाग, उमरेउ यांचे गोपनिय पत्र क्रमांक १९, दिनांक २६.२.२००१ अन्वये करण्यात आलेली कार्यवाही, अशा प्रकारची माहिती स्पीड पोस्ट द्वारे पाठविण्यात यावी अशी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भात

सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००५ रोजी ज्या गोपनिय पत्राच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे ते सदरचे गोपनिय पत्र हे त्यांनी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना संबोधीत केलेले दिसून येते. व ही बाब त्यांना माहिती असावयास पाहिजे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता लघु सिंचन यांचेकडे मागणे आवश्यक होते. कोणत्याही पत्राच्या संदर्भामध्ये पत्र ज्यांना संबोधून दिलेले असते ते त्या अधिका-याच्या कार्यवाहीकरीता असते. ज्यांना प्रतिलीपी दिली असते त्यांना ते माहिती करीता पाठविण्यात आलेले असते व त्यामुळे सदरच्या पत्राच्या अनुषंगाने जर अपीलकर्ता यांना कार्यवाही अपेक्षित असेल तर ती माहिती त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडेच मागावयास पाहिजे होती. परंतु, त्यांनी ती मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचेकडे मागितलेली असल्यामुळे पुन्हा त्याबाबतचा पत्रव्यवहार झालेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्या संदर्भातील माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध झालेली दिसून येत नाही. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३१.३.२००६ रोजी कार्यकारी अभियंता यांनी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १८.४.२००६ रोजी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या बध्दलीची माहिती पाठविलेली दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. यावरुन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेबरोबर पत्रव्यवहार सुरु होता असे दिसून येते. दिनांक २६.६.२००६ रोजी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना दिलेले पत्र यावरुन सुध्दा माहिती कोणती उपलब्ध करुन द्यावी याबध्दलचा उल्लेख दिसून येतो. मात्र सदरच्या पत्राप्रमाणे कार्यवाही झ ालेली नाही असे दिसून येत असून मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे अंतर्गत लेखा परीक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी अहवाल सादर केलेला दिसून येतो. त्या अहवालाची प्रत दाखल केल्याचे दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांना मात्र माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम

अपीलाच्या दोनही पक्षकाराच्या उपस्थितीत सुनावणी घेवून कारण मिमांसा देणारा निर्णय दिला असता तर त्याच स्तरावर ही माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली असती. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. यापूढे कोणत्याही अपीलाच्या संदर्भामध्ये दोनही पक्षकाराच्या उपस्थितीत सुनावणी घेवून कारण मिमांसा देणारा निर्णय देण्याची दक्षता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घ्यावी.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी मध्ये प्रत्येक अर्जाची माहिती उपलब्ध करुन देण्यास, अपीलाचा निर्णय देण्यास कालावधी हा निश्चित केलेला आहे. व त्या कालावधीतच ती कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक असते. अशाप्रकारे कालहरण करुन उत्तरे देणे किंवा पत्रव्यवहार करणे हे अपेक्षित नाही. मात्र अपीलकर्ता यांचा मुळातच संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली नसल्यामुळे हा विलंब झालेला आहे, असा वर निष्कर्ष काढलेला आहे व त्यामुळेच सदरच्या प्रकरणामध्ये दिनांक २६.११.२००५ रोजी ज्या मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून माहिती मागितलेली आहे त्यांना दोषी धरता येत नाही. परंतु, अपीलकर्ता यांना माहिती मात्र उपलब्ध करुन देणे हे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २६.१.२००५ च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत रजिस्टर पोस्ट द्वारा माहिती विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २९.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५५५/२००८**

**१) श्री सुरजलाल भागवत पटले**
**मु.सातोना, पो.वडेगांव, ता.तिरोडा, जिल्हा गोंदिया.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त**
**(नगर पालिका प्रशासन) नागपूर,**
**आयुक्त कार्यालय, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद तिरोडा, ता. तिरोडा, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २९.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक२४.११.२००६ रोजी "नगर परिषद, तिरोडा येथे कार्यरत असतांना मृत्यू झालेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांना सेवेत सामावून घेण्यासाठी विलंबाचे कारणे बाबत. न.प. तिरोडा येथे वर्ग ४ ची मंजूर पदे किती या पदावर कार्यरत कर्मचा-यांची नांवे व त्यांच्या नियुक्तीची तारीख दि. २७.३.२००१ ला नौकरी मिळावी म्हणून संपावर बसलेल्या व्यक्तीा सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाकडे केलेल्या कार्यवाही संबंधातील कागद पत्रांच्या सत्यप्रती. शासनाकडून मिळालेली मंजूरी अथवा नामंजूर केलेल्या शासन आदेशाचे सत्यप्रती त्या उपोषण कर्त्या सात व्यक्तींना सेवेत सामावून घेंण्यासाठी सध्या सुरु असलेल्या कार्यवाहीचे इतिवृत्त. न.प. मध्ये अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याची कर्मचा-याबाबतची माहिती." माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, तिरोडा यांनी खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली. १) सध्या या

परिषदेमध्ये रिक्त पदे नाहीत. २) जकात कर्मचा-यांचे समायोजन करणे बाकी आहे. ३) कर्मचारी आकृतीबंद आराखडयानुसार सेवेत असलेले कर्मचारी अतिरिक्त ठरत आहे. ४) परिषदेच्या संभाव्य अनुकंपा प्रतीक्षा यादीमध्ये आपले नांव १२ व्या क्रमांकावर आहे. ५) परिषदेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी जास्त प्रमाणात असल्यामुळे रिक्त पदे भरता येत नाही.

४. अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.२.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात आलेले असून त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दिनांक ९.३.२००७ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. त्यातही उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक ४.१२.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे ती अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती पेक्षा वेगळी असल्यामुळे निश्चितपणे दिशाभुल करणारी व खोटी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येतात. व त्यामुळे शास्तीस पात्र आहे. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या माध्यमातून जी माहिती उपलब्ध झाली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती खोटी व दिशाभुल करणारी आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जातील एकुण ६ मुद्याच्या संदर्भामध्ये मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली आहे. व त्यामुळे दिनांक ९.३.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती खोटी किंवा दिशाभुल करणारी आहे असे म्हणता येणार नाही. मात्र, जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे

.ती वर नमूद केल्याप्रमाणे खोटी व दिशाभुल करणारी असल्यामुळे सदरचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.११.२००५ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती ही खोटी व दिशाभुल करणारी आहे असे सकृत दर्शनी सिध्द होत असल्याने संबधीत माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे रुपये ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. परंतु, संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे शास्ती लादण्यापूर्वी ऐकुण घेणे हे आवश्यक असले तरी आज त्यांची बदली झालेली असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे हे आयोगास शक्य नसल्यामुळे प्रादेशिक संचालक यांनी सदरच्या शास्तीची वसुली संदर्भामध्ये चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्दची शास्ती ही वसुल करुन त्याप्रमाणे ३ महिन्यांच्या आंत आयोगास अहवाल सादर करावा.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २९.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४४६/२००८**

**१) श्री संजय सुखदेवजी बोंबटकर**
**३/४६ रघुजीनगर, नागपूर-९**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव**
**महिला शिक्षण संस्था, शारदा महिला विद्यालय,**
**ओमनगर, मिरचीबाजार, उमरेड रोड, नागपूर -९**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका**
**(स्वाक्षरीचे आर्थिक व प्रशासकिय अधिकार)**
**गणेशनगर कन्या विद्यालय, ५४७, आझमशाह ले आऊट, नागपूर-९ उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३०.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश २००२ चे कलम, ११ (१) अन्वये अपील दाखल केली आहे. सदरचे अपील हे दिनांक ६.३.२००७ च्या आदेशा विरुध्द दाखल केलेले आहे. व माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधीत आहे त्याचे नांव शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर असे नमूद केले आहे. माहिती अधिका-याचा तपशिल अध्यक्ष/सचिव, प्राचार्या, महिला इन्स्टीटयूट ऑफ गारमेंट टेक्नॉलॉजी, मु.अ.गणेशनगर कन्या विद्यालय, नागपूर असे अपील मेमोमध्ये नमूद केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. उत्तरवादी तर्फे ॲड. अे.एस. गिरडकर हे हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये अपील मेमो मध्ये ज्या दिनांक ६.३.२००७ च्या आदेशाचा उल्लेख केला आहे त्या आदेशाची प्रत दाखल केलेली नाही. व त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद यांना आयोगाकडून नोटीस काढण्यात आलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २०.१२.२००६ रोजीचा माहितीचा अर्ज विचारात घेण्यात यावा. परंतु, सदरचा अर्ज अपीलकर्ता यांनी दाखल केलेला

दिसून येत नाही. मात्र, दिनांक ९.२.२००७ व २१.१२.२००६ चा अर्ज दाखल केलेला दिसून येते. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे कलम ६ (१) प्रमाणे एक अर्ज दाखल करुन एका अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही किंवा माहिती विलंबाने उपलब्ध झाली इ. कारणे जर असेल व उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसेल तर कलम १९ (१) प्रमाणे त्याच सार्वजनिक प्राधिकरणतील वरिष्ठ अधिका-यांकडे प्रथम अपील सादर करावे लागते व त्या अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील कलम १९ (३) अन्वये दाखल करावयाचे असते. याबाबत अधिनियमामध्ये मुदती दिलेल्या आहेत. व त्यामुळे एकाच द्वितीय अपीलाच्या सुनावणी मध्ये अनेक अर्ज हे विचारात घेता येत नाही. व त्यातही अपीलकर्ता यांनी ज्या अर्जाच्या संदर्भामध्ये सुनावणी घ्यावी असे म्हटलेले आहे तो दिनांक २०.१२.२००६ चा अर्जच दाखल केलेला नाही. व ज्या शिक्षणाधिरी यांच्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे तेही आज हजर होऊ शकले नाही कारण ब प्रपत्र व निर्णय नसल्याने त्यांना  आयोगाकडून नोटीस काढण्यात आलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे राज्य माहिती आयोगाकडील सदरचे अपील हे सुनावणीस घेता येत नाही. अपीलकर्ता यांनी यापूढे त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करावयाचे असल्यास क्रमशः तारीख निहाय कागदपत्रे दाखल करणे आवश्यक ठरते व त्यांच्या अपीलाची सुनावणी घेणे शक्य होईल. व त्यामुळे त्यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्ये कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दाखल केलेले नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३०.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५८९/२००८**

**१) श्री मुरलीधर पुंडलिकराव सहारे**
**द्वारा श्री अशोक पातताणे, बीनाकी मंगळवारी**
**सिध्दार्थ विद्यालयासमोर, नागपूर -१७.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक**
**शिक्षक सहकारी बँक गांधी सागर, महाल नागपूर-४४००१८.**

**३) जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक**
**शिक्षक सहकारी बँक, शाखा कमाल टॉकीज चौक,**
**नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३०.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. परंतु उत्तरवादी यांचे वकील हजर नसल्यामुळे त्यांनी मुदत मागितलेली आहे. सदरच्या प्रकरणामध्ये दिनांक १०.१०.२००७ रोजी सुनावणीस सदर अपील ठेवण्यात आले होते. परंतु उत्तरवादी यांचे वकील श्री एन.जी. जेथा यांनी पुढील तारीख नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवडयात देण्यात यावी अशी विनंती केली असल्यामुळे त्याप्रमाणे दिनांक २७.११.२००७ रोजी सदरचे अपील सुनावणीस ठेवण्यात आले होते. त्यावेळेस उत्तरवादी यांनी जबाब दाखल केला होता व त्या लेखी जबाबाचे उत्तर देण्यासाठी अपीलकर्ता यांनी मुदत मागितली होती. त्यानंतर दिनांक १०.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी लेखी जबाब दाखल केला होता. पुन्हा उत्तरवादी यांचे वकीलांनी मुदतवाढ मागितली. व आज पुन्हा अपील सुनावणीस ठेवण्यात आले असून सुध्दा उत्तरवादी यांचे ॲडव्होकेट हजर झाले नाही किंवा खुलासा दाखल केला नाही त्या कारणास्तव पुन्हा मुदतवाढ अर्ज सादर केला आहे. व सदरचा अर्ज हा अमान्य करण्यात येत आहे. अशा

प्रकारे प्रत्येक अपीलामध्ये मुदतवाढ देण्यात आल्यास आयोगाकडील कोणतीही अपीले निकाली निघणार नाही व प्रलंबित अपील तसेच प्रलंबित राहातील. त्यावर पुन्हा अनेक अपीलकर्ता हे आयोगाच्या कार्यालयात येवून त्यांची अपीले सुनावणीस लागत नाहीत म्हणून तक्रारी करीत असतात. याबध्दल मात्र ज्यांचे अपील सुनावणीस लागते त्यांना त्याची जाणिव नसते. उत्तरवादी यांना पुरेशी संधी दिनांक १०.१०.२००७ ते ३०.५.२००८ पर्यंत दिलेली असल्यामुळे सदरचा मुदतवाढीचा विनंती अर्ज हा नामंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००६ रोजी शाखा व्यवस्थापक तथा जन माहिति अधिकारी, शिक्षक सहकारी बँक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक माहितीचा तपशिल : " माहितीचा विषय- अर्जदाराचे वडील श्री पुंडलिकराव सिताराम सहारे यांचा दिनांक २६.३.२००६ ला मृत्यू झाला. तत्पुर्वी त्यांनी स्वत:चे नांवे मुदत ठेव म्हणून दि. १२.८.२००४ ला एकुण रुपये ४२,९७२/- व दिनांक ६.१२.२००४ ला एकुण रुपये १५,९००/- आपले शाखा बँकेत जमा करुन ठैवले आणि अशाप्रकारे सदरहु प्रमाणे रक्कम जमा करते वेळी त्यांनी नामनिर्देशित व्यक्ती म्हणून अर्जदाराचे नांवे नाम निर्देशित पत्र तयार करुन ठेवले. त्याचप्रमाणे मुदत ठेवी रक्कमेचे दिनांक ९.१२.२००५ ला नवीकरण तथा नुतनीकरण करतेवेळी कोणत्याही इतर व्यक्तीच्या नांवे वारसदार म्हणून कागोपत्रे तयार करण्यात आले नव्हते किंवा अशाप्रकारे कागदोपत्रावर नोंद घेण्यात आली नव्हती. परंतु दिनांक १२.५.२००६ चे अर्जानुसार मुदत ठेवी रक्कमेच्या संबंधात अर्जदारानी प्रत्यक्षात कागदोपत्रांची पाहणी व तपासणी केली असता इतर अन्य व्यक्तीच्या नावानी मुदत ठेवी रक्कमेच्या कागदोपत्रावर दिनांक ११.११.२००५ ला वारसदार म्हणून नोंद घेतल्याचे अर्जदाराला आढळून आले. येणेप्रमाणे माहितीचा विषय आहे. " परंतु सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. व तसे अपीलकर्ता यांनी सुध्दा सांगितले. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय

दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे. व सोबत सहकार आयुक्त यांचे दिनांक ८.२.२००६ चे परिपत्रक दाखल केलेले आहे.

" **Written Submission of Non Applicant Bank**- The non-applicant Bank submits its written submission as under-

१) That as per Circular of State Commission & Registrar of Co-operative Societies Pune, dated ०८-०२-०६, which is in respect of Right to information Act, २००५. That as per said Circular the Co-operative Banks to whom no grant has been given by Government are not covered and are exempted from Right to Information Act, २००५.

२) The non-applicant Bank is Co-operative Bank and had not taken any Government grant therefore the Bank is not covered under the Code of Right to Information Act, २००५.

३) That as per above said position the non applicant Bank therefore, unable to supply the information as demanded by the present applicant, which amounts to breach of circular dated ०८-०२-०६. The non applicant Bank accordingly given reply to the applicant Murlidhar Sahare on २२-०९-२००६ to his application dated १८-०९-२००६ which Bank received on २०-०९-२००६."

सदरच्या खुलासा व परिपत्रकाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००७ रोजी खुलासा दाखल केला आहे. तो खालीलप्रमाणे -

" १) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ चे नियम ३ नुसार माननीय श्री प्र.गो. लाबडे, शाखा व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक, शाखा कमाल टॉकीज चौक परिसर, नागपूर-१७, यांना अर्जदारातर्फे दिनांक ३.८.२००६ ला टपालाद्वारे अर्ज सादर करण्यांत आले होते आणि सदर तारखेच्या अर्जातील परिच्छेद ३ चे उप परिय्छेद १ चे आधाराने उप परिच्छेद ३ चे मधील अनुक्रमांक १ ते ४ पर्यंतची कागदोपत्रासहित माहितीची मागणी करण्यांत आली होती. परंतु, माहितचा अधिकार अधिनियम २००५ चे अनुषंगाने ठराविक मुदतीत कागदोपत्रासहित माहिती देण्यासंबंधात मा. गैरअर्जदार यांचे वतीने लेखीपत्राद्वारे अर्जदाराला नकारार्थी किंवा होकारार्थी अभिप्राय कळविण्यात आले नाही.

२) दिनांक ३.८.२००६ चे अर्जाबाबत कागदोपत्रासहीत माहिती देण्यास मा. गैरअर्जदार इच्छुक व उत्साही नाहीत आणि त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे बाबत असलेले महत्व आणि मौलीक तत्व व सिध्दांत कशाप्रकारचे आहेत याकडे मा. गैरअर्जदार यांचेकडून दुर्लक्ष आणि टाळाटाळ करण्यांत येत आहे असे अर्जदाराचे लक्षात येताच मा. श्री डी.अे.अलोनी, प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक, गांधीसागर, नागपूर यांना अपीलार्थी तर्फे दिनांक १८.९.२००६ ला टपालाद्वारे अपील सादर करण्यात आली. परंतु मा.श्री डी.अे. अलोणी, प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक गांधी सागर, नागपूर यांचेकडून सुध्दा दिनांक ३.८.२००६ चे अर्जाबाबत काळजीपुर्वक व दक्षतापुर्वक दखल घेण्यात आली नाही आणि दिनांक १८.९.२००६ चे प्रथम अपील संबंधात ठराविक मुदतीत कागदोपत्रासहीत माहिती देण्यासबंधात मा. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक, गांधी सागर, नागपूर यांचे वतीने लेख्रीपत्राद्वारे अपीलार्थीला नकाराथ्री किंवा होकारार्थी अभिप्राय कळविण्यात आले नाही.

३) दिनांक १८.९.२००६ चे प्रथम अपील संबंधात कागदोपत्रासहीत माहिती देण्यास मा. गैरअपीलार्थी इच्छुक व उत्साही नाही आणि त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे बाबत असलेले महत्व आणि मौलिक तत्व व सिध्दान्त कशा प्रकारचे आहे याकडे गैरअपिलार्थी यांचेकडून जाणूनबुजून दुर्लक्ष आणि टाळाटाळ करण्यांत येत आहे असे अपिलार्थीच्या लक्ष्यात येताच आदरणीय द्वितीय अपिलीय प्राधिकारी तथा राज्य माहिती

आयुक्त,नागपूर विभाग, नागपूर यांना टपालाद्वारे दिनांक १८.१०.२००६ ला अपिलार्थी तर्फे अपिल सादर करण्यांत आली.

४) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ (१) प्रमाणे सरकारी यंत्रणे बरोबरच शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, सार्वजनिक बँक तथा अधिकोष आणि स्वयंसेवी संस्था यांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कायदा लागु असल्यामुळे मा. गैरअर्जदार आणि मा. गैरअपिलार्थी यांचेवतीने आ. द्वितीय अपिलीय प्राधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचे समक्ष दिनांक २७.११.२००७ ला दाखल करण्यांत आलेले लेखी निवेदन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे नुसार समर्थनीय व कायदेशीन नसून रद्य करण्यास काहीच हरकत नाही.

५) मा.गैरअर्जदार आणि गैरअपिलार्थी यांचे वतीने आ.द्वितीय अपिलीय प्राधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे समक्ष दाखल करण्यांत आलेले दिनांक २७.११.२००७ चे लेखी निवेदनाच्या अनुषंगाने आ. द्वितीय अपिलीय प्राधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांचे वतीने अपिल क्रमांक ५४३/२००७ व ५४४/२००७ चे बाबत पारीत करण्यात आलेले निर्णय आदेश महत्वाचे व मोलाचे असून सदरहु आदेशाचे अनुषंगाने मा. गैरअर्जदार आणि मा. गैरअपिलार्थी यांचे दिनांक २७.११.२००० चे लेखी निवेदन रद्य करण्यास काहीच हरकत नाही.

६) सार्वजनिक संस्थाना माहितीचा अधिकार कायदयाच्या कक्षे बाहेर ठेवण्याची सवलत देवू नये अशा प्रकारचे आदेश केंद्रीय माहिती आयोगातर्फे विविध मंत्रालयांना देण्यांत आले आहे.ही बाब लक्षात घेता मा. गैरअर्जदार व गैरअपिलार्थी यांचे दिनांक २७.११.२००७ चे लेखी निवेदन माहितीच्या अधिकार कायदयानुसार कायदेशीर व समर्थनीय नाही. यास्तव दिनांक २७.११.२००७ चे लेखी निवेदन रद्य करण्यास काहीच हरकत नाही.

७) अर्जदार तथा अपिलार्थी चे वतीने दिनांक ३.८.२००६ चे अर्जानुसार आणि दिनांक १८.९.२००६ चे अपिल नुसार करण्यांत आलेली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ व उप कलम १ ते १० पर्यंत असलेल्या अंतर्गत तरतुदीच्या कक्षेत येत असलेली बाब नाही त्यामुळे कागदोपत्रासहीत माहिती उपलब्ध करुन देण्यास काहीच हरकत नाही.

करीता, आदरणीय द्वितीय अपिलीय प्राधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना सदर लिखित युक्तीवादाच्य टिप्पणीद्वारे अर्जदार तथा अपिलार्थी तर्फे नम्रतापुर्वक निवेदन करण्यांत येत आहे की, दिनांक ३.८.२००६ चे अर्जानुसार कागदोपत्रासहीत माहिती उपलब्ध करुन देण्यास माननीय गैरअर्जदार आणि मा. गैरअपिलार्थी यांना बाध्य करण्यांत यावे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायदयाचे संरक्षण आणि पालन करण्याचे दृष्टीने सदरहु कायदयाचे अंतर्गत तरतुदीनुसार मा. गैरअर्जदार व मा. गैरअपिलार्थी यांचे विरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत यावी, अशी अर्जदार अपिलार्थी आदरणीय द्वितीय अपीलीय प्राधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना नम्र प्रार्थना आहे. "

उत्तरवादी यांचे तर्फे जो खुलासा दाखल करण्यात आलेला आहे त्या खुलाशा मध्ये सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ८.२.२००६ च्या परिपत्रकाचा उल्लेख करण्यात आला आहे. सदरच्या परिपत्रकाचे अवलोकन केले असता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींच्या अनुषंगाने "शासकिय प्राधिकरण" या व्याख्येमध्ये समावेध होणा-या सहकारी संस्था साठी सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे. सदरच्या सुधारित आदेशामध्ये शासकिय प्राधिकरण या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. परंतु, शासकिय या शब्दाच्या ऐवजी सार्वजनिक प्राधिकरण अशी व्याख्या अधिनियमात दिलेली आहे. व त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या अनुषंगाने सहकारी पत संस्था व नागरी सहकारी बँकाना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष देण्यात येत नसल्यामुळे हा नियम लागू होत नाही असे त्या परिपत्रकात म्हटले आहे. व त्यामुळे सदरचे परिपत्रकाचा आधार घेवून उत्तरवादी यांनी सदरचा अधिनियम हा शिक्षक सहकारी बँक मर्या. यास लागू होत नाही असे खुलाशात म्हटले आहे. पुन्हा उत्तरवादी यांनी बँक ही सहकारी बँक असून शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी किंवा मदत घेत नाही असेही त्यांनी म्हटलेले आहे. व त्यामुळेच सदरची बँक ही शासकिय प्राधिकरण नसून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देवू शकत नाही अन्यथा दिनांक ८.२.२००६ च्या परिपत्रकाचे उल्लंघन

होईल,असे त्यांनी म्हटले आहे.व तशा प्रकारचे उत्तर अपीलकर्ता यांना दिनांक २२.९.२००६ रोजी देण्यात आलेले आहे.

अपीलकर्ता यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जो खुलासा सादर केलेला आहे त्यात अपीलकर्ता यांना लेखी होकारार्थी किंवा नकारार्थी अभिप्राय कळविण्यात आलेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या खुलाशातील परिच्छेद ४ मध्ये अधिनियमाचे कलम ४ (१) प्रमाणे सरकारी यंत्रणा,शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, सार्वजनिक बँका यांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम लागु असल्यामुळे गैर अर्जदार यांचे वतीने द्वितीय अपीलात दिनांक २७.११.२००७ ला दाखल करण्यात आलेल्या लेखी निवेदन समर्थनिय व कायदेशिर असून रद्य करण्यास काहीच हरकत नाही असे,म्हटलेले आहे. अधिनियमाचे कलम ४ (१) प्रमाणे कोणत्याही संस्थेचा उल्लेख त्यात केलेला नाही. त्यात पुन्हा अपील क्रमांक ५४३/०७ व ५४४/०७ मध्ये आयोगाने दिलेल्या निर्णयाचे उदाहरण दिलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या कलम ८ उपकलम (१) ते (१०) प्रमाणे असलेल्या अंतर्गत तरतुदींच्या कक्षेत येत असलेली बाब नाही. त्यामुळे कागदपत्रासहीत माहिती उपलब्ध करुन देण्यास काहीच हरकत नाही अशी विनंती केली आहे.

अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी दाखल केलेल्या खुलाशांचा विचार केला असता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था यांनी जे परिपत्रक काढलेले आहे त्याला अधिनियमाच्या तरतूदी मध्ये कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना काढलेले आहे ते त्यांचे मत असू शकते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेची व्याख्या देण्यात आलेली आहे. "सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ (क) संविधानाद्वारे किंवा त्यानुसार; (ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे; (ग) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या अन्य कायद्याद्वारे; (घ) समूचित शासनाने काढलेल्या आदेश, सूचना द्वारे किंवा अध्यादेशा द्वारे स्थापन करण्यात आलेला किंवा गठीत करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वायत्त संस्था असा आहे व त्यात, (एक) समूचित शासनाची मालकी असलेले, त्याचे नियंत्रण असलेले किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे

मोठया प्रमाणात वित्तीय पुरवठा केला जातो अशी निकाय (दोन) समूचित शासनाकडून निधीद्वारे त्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तीय पुरवठा केला जातो अशी अशासकिय संघटना याचा समावेश आहे. अशा प्रकारची व्याख्या आहे. सदरच्या व्याख्येमध्ये अनेक पर्याय दिलेले आहेत व त्यापैकी एका पर्यायी निकषाशी जरी एखादे प्राधिकरण असले तर त्या प्राधिकरणाचा त्या व्याख्येत समावेश होईल. या प्रत्येक पर्यायाच्या निकषाबरोबर सहकारी संस्थेच्या संदर्भामध्ये तपासणी करणे आवश्यक आहे. कोणतीही सहकारी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतूदीप्रमाणे पंजीबध्द करण्यात येते व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा राज्य विधान मंडळाने तयार केलेला कायदा आहे. व त्यामुळे कोणत्याही प्रकारची सहकारी सस्था ही सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येतील राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे असल्यामुळे सदरचा अधिनियम सहकारी बँकाना सुध्दा लागू होतो. एखादी सहकारी संस्था स्थापन करावयाची असल्यास महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम, १९६० मध्ये त्याकरीता तरतूदी करुन निकष दिलेले आहेत. व त्या निकषाच्या प्रमाणेच सहकारी संस्था ही सहकार आयुक्तांकडे पंजिबध्द करणे आवश्यक ठरते. सहकार खात्याने सहकारी संस्था स्थापन करण्यास मान्यता दिल्यानंतरच ती संस्था स्थापन करता येते. त्यामध्ये सहकारी संस्थेमध्ये जे सभासद असतात त्या सभासदाचे भाग भांडवल असते. सहकारी संस्था ही सहकारी बँक असेल तर सभासदाच्या भाग भांडवलावरच ती स्थापन होते. त्यानंतर त्या बँकेचे कामकाज हे त्या बँकेमध्ये जे ठेवीदार ठेव ठेवतात त्या ठेवीदाराच्या रकमेच्या निधीवरच संपूर्ण व्यवहार होत असतात.. त्यामुळे सभासद व ठेवीदार याचा अर्थ हा सर्व जनतेचा निधी असतो. सार्वजनिक निधी हा कोणत्याही एका व्यक्तीचा निधी नसतो किंवा फक्त संचालक मंडळाचा निधी नसतो. व म्हणूनच सार्वजनिक निधीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाचे सहकारी बँकेवर नियंत्रण असते. सहकारी बँकेस अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे दर वर्षी सर्वसाधारण सभा घेवून त्यामध्ये ऑडीट रिपोर्ट मान्य करुन घ्यावा लागतो व तो ऑडीट रिपोर्ट हा सहकार खात्याकडे दाखल करावा लागतो. त्याचप्रमाणे सहकारी बँकेमध्ये जे पदाधिकारी असतात त्या पदाधिका-यांची निवडणुक सुध्दा सहकार खात्याच्या अधिका-यांच्या नियंत्रणाखाली होत असते व तशी प्रक्रिया झाली नसेल तर शासनास सदरच्या सहकारी बँकेचे

संचालक मंडळ बरखास्त करण्याचे अधिकार आहेत. बँकेमध्ये गैरव्यवहार असतील तर त्याकरीता प्रशासक नियुक्तीचे अधिकार शासनास आहे. त्यामुळे सहकारी बँकेवर संपुर्ण शासनाचे जे नियंत्रण आहे व ते शासनाचे नियंत्रण हे सार्वजनिक निधीचे संरक्षणच करीत आहे. व याचा अर्थ सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टीने हे सर्व नियंत्रण दिसून येते. व त्यामुळे सहकारी बँक ही अधिनियमाच्या वर नमूद केलेल्या सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येमध्ये जरी शासनाकडून निधी मिळत नसला तरी येते.

अर्थातच, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास कलम १० प्रमाणे माहितीचे पृथ्थकरण सुध्दा करता येते किंवा कलम ८ प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद सुध्दा देण्यात आलेले आहेत. बँकाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास प्रत्येक ठेवीदाराची माहिती ही उपलब्ध करुन देता येणार नाही. कारण ठेवदीर हे बँकेकडे विश्वासाने ठेव ठेवत असतात व ती त्यांची वैयक्तिक माहिती आहे. परंतु बँकेच्या प्रशासकिय बाबीसंबंधी माहिती तसेच कर्ज थकबाकी, असेल तर त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. कारण कर्ज थकबाकी असेल किंवा बेकायदेशिर कर्ज मंजूर केलेले असेल तर ठेवी धोक्यात येतात व ठेवीदाराचा निधी म्हणजे सार्वजनिक निधीचा गैरवापर होतो. याचा अर्थ तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे हे सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टीने आवश्यक ठरते व त्यामुळे नागरी सहकारी बँकाना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू केला पाहिजे हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही त्यांच्या वडीलाच्या ठेवीच्या नामनिर्देशन संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे वडील हे मृत्यू पावलेले आहे असे त्यांचे अर्जावरुन दिसून येते. व त्यामुळे त्यांच्या वडीलाच्या ठेवीच्या संदर्भामध्ये नामर्निदेशन कोणाचे आहे ही जर माहिती त्यांना आवश्यक वाटत असेल तर ती त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत असु नये. तसेच वडील मृत्यू पावले नसते तर मात्र वर नमूद केल्याप्रमाणे ते ठेवीदार असल्यामुळे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता आली नसती. परंतु ठेवीदार मृत्यू पावल्यानंतर बँकेतील ठेव ही ठेवीदाराच्या नामनिर्देशीत व्यक्तीस किंवा वारसास परत करणे अगत्याचे असते. व अपीलकर्ता हे मृत्यू

पावलेल्या ठेवीदाराचा मुलगा असल्यामुळे त्याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे हे वर निष्कर्ष काढल्याप्रमाणे संयुक्तिक राहील. मात्र, उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांचे अर्जाचे संदर्भामध्ये कोणतेही उत्तर

दिलेले नसेल किंवा सदरचा कायदा लागु होत नाही असे उत्तर दिलेले असेल तर ते सुध्दा सदभावनेने सहकार आयुक्तांच्या परिपत्रकामुळे त्यांनी दिलेले असल्यामुळे त्यांना कलम २० प्रमाणे दोषी धरता येणार नाही. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशता मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे ही अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३०.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५६१/२००८**

**१) श्री बबन गोविंदराव पुनसे,**
**निंभोरा (देलवाडी ) ता. तिवसा, जि. अमरावती.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी**
**अमरावती (राष्ट्रीय फलोद्यान ), ता.जि. अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी**
**तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तिवसा**
**ता. तिवसा, जिल्हा अमरावती.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३१.५.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२००७ रोजी विशेष पॅकेज अंतर्गत कै. वसंतराव नाईक पंतप्रधान लाभधारक कास्तकारांच्या वाटपाबाबतची माहिती मिळण्याबाबत. विशेष पॅकेज अंतर्गत (पंतप्रधान पॅकेजचे निंभोरा (देल) येथील एकुण किती कास्तकारांना विशेष पॅकेजचे अनुदान मिळाले आहे. तसेच मिळणा-या लाभधारकाचे निकष काय. त्याकरीता कोण कोणत्या अटी आहेत. प्रत्येकी कोणत्या प्रकारचे अनुदान मिळाले आहे याचा सविस्तर खुलासा मिळण्याबाबत. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.२.२००७ रोजी अर्जाचा संदर्भ १५.२.२००७ असा देवून तालुका कृषि अधिकारी, तिवसा करीता अपीलकर्ता यांना १) विशेष पॅकेज अंतर्गत मौजा निंभोरा (दे) येथील एकुण ६४ शेतक-यांची निवड करण्यात आलेली आहे. २) विशेष पॅकेज अंतर्गत निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.-

१) महसुल रेकार्ड प्रमाणे शेतक-यांचे ८ अ नुसार क्षेत्र (कमी क्षेत्रानुसार जास्त क्षेत्राकडे)

२) महसुल रेकार्ड प्रमाणे यांचा २०,००० रुपया पर्यंतचा उत्पन्नाचा दाखला.

३) विशेष पॅकेज अंतर्गत अर्ज ७/१२, ८ अ नकाशा

मुद्या क्रमांक ३ या पॅकेज अंतर्गत निवडलेल्या शेतक-यांना कोणत्या प्रकारचे अनुदान मिळाले आहे. लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे साहित्य वाटप करण्यात आले.

| अ.क्रं. | साहित्याचे नांव | नग | शेरा |
|---|---|---|---|
| १) | निविष्ठा | ३१ | सदर साहित्याचे वाटप |
| २) | बहुउद्येशिय ॲलन कल्टीव्हेटर | १६ | प्रत्यक्ष लाभार्थ्यांना करण्यांत |
| ३) | ॲलन कल्टीव्हेटर २४ इंची | १२ | आले आहे. |
| ४) | पावरस्प्रे | १४ | |
| ५) | नॅपसॅक स्प्रे पंप | १६ | |
| ६) | बैलजोडी | ०६ | |
| ७) | केरोसिन पंप | ०२ | |
| ८) | परसबाग | ३० | |

सदरच्या साहित्याचे वाटप प्रत्यक्ष लाभार्थ्यांना करण्यात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता याचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००७ रोजी जिल्हा कृषि अधिक्षक (राष्ट्रीय फलोद्यान) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये कृषि अधिका-यांनी स्पष्ट खुलासा दिला नाही. प्रत्येकाला काय मिळाले म्हणून.. .. या वाटपामध्ये भ्रष्टाचार झाला बैल बंडया इतर वस्तु चोरी गेल्या आहेत. विरोधात तक्रार. एक एक माणसांना काय काय मिळाले व कार्यवाही करीत, असे कारण दिलेले आहे. परंतु प्रथम अपीलामध्ये माहिती काय मिळाली व त्याबध्दल त्यांचे समाधान काय झाले नाही अशा प्रकारचे कारण दिलेले नाही. पुन्हा नवीन मुद्या उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते व त्यामुळे कदाचित माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्या पुर्वीच त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली होती, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००८ रोजी तहसिलदार यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. त्यानंतर दिनांक ६.१२.२००७ रोजी सुध्दा अर्ज दाखल केलेला दिसून येतो. परंतु या अर्जाच्या संदर्भामध्ये आज कोणत्याही प्रकारची चौकशी करता येत नाही. त्यानंतर पुन्हा लाभार्थ्यांची यादी मिळण्याकरीता अर्ज दाखल केला होता, असे माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यांना तशी माहिती सुध्दा दिलेली आहे.

४. अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झालेली आहे तरी सुध्दा त्यांची काय तक्रार आहे असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, यामध्ये लाभार्थ्यांची नांवे दिलेली नाही व गैर प्रकार झालेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.२.२००७ च्या अर्जामध्ये लाभार्थ्यांची नांवे मागितलेली नव्हती व गैर प्रकाराच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नाही. त्याकरीता जे सक्षम अधिकारी असतील त्या सक्षम अधिका-याकडे अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात तक्रार करणे व न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.२.२००७ (१५.२.२००७) च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३०.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४८३/२००८**
**अपील क्रमांक १४८४/२००८**

**१) श्री नामदेवराव गंगाधरराव नागोसे**
**मु.पो.वडधामणा, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी , शिक्षण विभाग (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३१.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे. अपीलकर्ता दिनांक ३.५.२००८ रोजी सुध्दा सदरच्या अपीलाच्या सुनावणीस विना अनुमती गैरहजर होते.

२. **<u>अपील क्रमांक १४८३/२००७</u>** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००६ रोजी मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) स्वामी विवेकानंद हायस्कुल वडधामना ता. हिंगणा जि. नागपूर या शाळेच्या अनुदानावरील वर्षे १९९३-९४ ते सन २००५-०६ पर्यंतचे ऑडीट रिपोट संपूर्ण दस्ताऐवजासह देण्यात यावे.

२) दि.१३.१०.२००६ ला अर्जदार श्री नामदेवराव नागोसे आणि अन्य चार सदस्यांनी गैरअर्जदार श्री एकनाथ पिसे आिा मुख्याध्यापिका यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत अर्ज केला होता. त्या अर्जानुसार आपण कोणती कार्यवाही केली किंवा कसे. कार्यवाही करणार काय. कार्यवाही करीत नसल्यास कारणे देण्यात यावी.

३) दिनांक ७.१२.२००६ च्या पत्रानुसार आपा कु. सेलुकर स्वामी विवेकानंद हायस्कुल वडधामण यांचा थकीत व चालू पगार रिलीज करणार काय. करीत असल्यास त्याची कारणे." माहिती प्रत्यक्ष/टपालाने (रजिस्टर पोस्टाने) घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१.२००७ रोजी मुद्या क्रमांक २ व ३ मध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे. माहितीचे अधिकारात प्रश्नार्थक माहिती विचारण्याची तरतूद नाही. त्यामुळे प्रश्न १ मधील दस्तऐवज देण्यात येतील. कार्यालयात येवून भेटावे असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १७.३.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. वास्तविक अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.१२.२००६ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे उत्तर दिलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा त्यांना निर्णय कळविण्यात आलेला आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये किंवा प्रथम अपीलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आली नाही, असे नमूद केले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचेकडील जावक नोंदवहीमध्ये सदरचे पत्र पाठविल्याचे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मात्र, अपीलकर्ता यांनी स्वतःच माहितीच्या अर्जामध्ये प्रत्यक्ष/रजिस्टर पोस्टाने माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये ऑडिट रिपोर्ट उपलब्ध असून तो कार्यालयात येवून घेवून जावा असे कळविलेले आहे व त्याकरीत अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष माहिती घेण्याकरीता कार्यालयात संपर्क साधला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रं. २ मध्ये दिनांक १३.१०.२००६ रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. त्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये माहिती छायांकित

प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्याबाबत अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपील क्रमांक १४८४/२००७ :** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००७ रोजी मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे- " आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन

१) आम्ही आपणास दिलेले पत्र क्रं. १/२००७, दिनांक २.१.२००७ च्या पत्रानुसार आपण व अधिक्षक वेतन पथक रविनगर, नागपूर यांनी काय कार्यवाही केली ती माहिती द्यावी.

२) आपण मा. मुख्याध्यापिका ( सुश्री हेमलता गोविंदराव सावरकर ) स्वामी विवेकानंद हायस्कुल वडधामणा यांचे वेतन रोखणार काय. रोखत नसल्याची कारणे देण्यात यावी.

iii) मा. मुख्याध्यापिका बोगस शाळा समिती प्रमाणे शेडयुल I वर नसलेल्या सदस्यानुसार कार्य करतात ते आपणास मान्य आहे काय. मान्य असल्यास कोणत्या नियमानुसार (नियम क्रं. क्लाज नुसार देण्यात यावा). माहिती प्रत्यक्ष किंवा रजिस्टर पोस्टाने घेणार " असे नमूद केलेले दिसून येते.

४. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २६.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा अधीक्षक यांनी अपीलकर्ता यांना अर्जातील मुद्दा क्रमांक १ बाबत माहितीसाठी अधीक्षक वेतन पथक कार्यालय, रविनगर, नागपूर यांचेकडे अर्जाप्रमाणे कार्यवाही तसेच मुद्दा क्रमांक २ व ३ बाबत केंद्रिय माहितीचा अधिकारात प्रश्न विचारण्याची तरतूद नाही. आपणास नेमके कोणते दस्तऐवज पाहिजे आहे ते मागितल्यास या कार्यालयाकडे उपलब्ध असल्यास आपणास उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १७.३.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला परंतु, उडवाउडवीची उत्तरे दिली असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी, अशी त्यांची विनंती आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१.२००७ च्या अर्जातील

मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मुद्या क्रमांक १ मध्ये त्यांनी कार्यवाही विचारली आहे. मुद्या क्रमांक २ व ३ मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारचे प्रश्न विचारलेले आहे. त्यामुळे मुद्या क्रमांक १ प्रमाणे कार्यवाही बध्दल माहित उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले आहे. व त्यांनी दिनांक २.१.२००७ रोजी त्यांना उत्तर दिलेले आहे. त्यांनी काय कार्यवाही केली, त्याबध्दलची माहिती द्यावयाची आहे व अधीक्षक वेतन पथक यांचेकडे सुध्दा माहिती उपलब्ध करुन घेवून त्याबध्दलची माहिती ही अपीलकर्ता यांना द्यावयास पाहिजे. मुद्या क्रमांक २ व ३ मध्ये विनंती केल्याप्रमाणे माहिती अधिकारी यांचे कोणत्याही प्रकारे अभिप्राय येतील अशा प्रकारचे प्रश्न विचारता येत नाही. माहिती अधिकारी हे सार्वजनिक प्रकरणात असलेले त्या त्या स्तरावरील माहितीचे परिरक्षक असतात. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील ते अधिकारी असतीलच असे नाही. व त्यामुळे माहिती अधिकारी यांचे अभिप्राय निर्णय प्रक्रियेबाबत हे अपेक्षित नाही. त्यामुळे त्या संदर्भात अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलात जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे.

६. अपीलकर्ता यांनी माहिती प्रत्यक्ष किंवा रजिस्टर पोस्टाने मागविलेली असल्यामुळे त्यांनी अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये माहिती प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता त्याचं सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४८३/२००७ अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ३०.१२.२००६ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.१२.२००६ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ च्या संदर्भामध्ये माहिती त्यांना कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपील क्रमांक १४८४/२००७ हे अंशता मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.१.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात माहिती कागदपत्राच्या स्वरुपात विना मुल्या उपलब्ध करुन देण्यात यावी. व अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३१.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**